म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. १८४०
REFBK-0017756

१६८० ५१६८८

११।६।८०

निबंध

अनुक्रम ५१६५८ ... पुणे

९८२० वि: निबंध

नों. दि: १४।६।८०

निबंध

१६८०

॥ श्रीगणराजः समर्थः ॥

श्रीवल्लभाम्बा स्वानन्देशो विजयते ।

# श्रीगणेशगीतेचें श्रेष्ठत्व
## अथवा
# श्रीयोगामृतशास्त्राचें स्वरूप

[ 'अंकुश' मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेला निबंध ]

संग्राहक व प्रकाशक :

श्रीगाणेशवरिष्ठ गाणपत हेरंबराज बालशास्त्रीशर्मा केसकर,

श्रीक्षेत्र मोरेश्वर, संपादक 'अंकुश' पो. मोरगांव, जि. पुणें.

REFBK-0017756

रा. रा. त्र्यंबक हरी आवटे, 'इंदिरा' प्रेस, २७० सदाशिव पेठ, पुणें शहर.

( सर्व हक्क स्वाधीन )

गाणेशग्रंथमाला ] किंमत ~~सव्वा~~ १॥ रुपया [ पुस्तक विसावें.

# गणेशभक्तांना अत्यंत उपयोगी पुस्तकें.

१. **श्रीगणेशगीतेचें श्रेष्ठत्व** अथवा **योगामृतशास्त्राचें स्वरूप**— 'अंकुश' मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेला हा सुंदर निबंधलेख, स्वतंत्रपणें संग्रहाला योग्य व नित्य परिशीलनाला अत्यंत अवश्यक असल्यामुळें, निराळा बांधवून पुस्तकरूपानें विक्रीस तयार आहे. प्रत्येक गाणेशभक्ताला-प्रायः नित्य श्रीगणेशगीतेचा पाठ करणाऱ्यांना व तिचें मुख्य प्रमेय समजूं इच्छिणारांना, सदरहु पुस्तक फार उपयोगी आहे. यांत गणेशगीतेचें मुख्य प्रतिपाद्य, तिची पुरातन परंपरा, तिचें वैशिष्ट्य इत्यादि फार स्पष्ट व सप्रमाण आलेलें आहे. तसेच या निबंधाच्या शेवटीं, 'अंकुशां-' तून प्रसिद्ध झालेला 'गाणेश—ज्ञेय' पुराणें, हा लहानसा लेखही जोडिला आहे. त्याजवरून,—श्रीगणेशगीतेच्या श्रेष्ठत्वासंबंधीं वगैरे जीं पुराणेतिहासादिकांतील वचनें प्रमाणार्थ उध्दृत केलीं गेलीं आहेत, त्यांचें प्रामाण्य व महत्त्व कळून येणारें आहे. किंमत सव्वा रुपाया.

२. **श्रीमयूरेशविजय**—भाग पहिला-**'बाललीलाकाण्ड—पूर्वार्ध—'** —श्रीमयूरेशचरित्राचा तत्वविवेचनात्मक स्वतंत्र निबंधग्रंथ किंमत साडेतीन रुपये.

३. **श्रीचिंतामणिक्षेत्रमहिमा**—गाणेश क्षेत्रमहिमा निरूपणरूप असा, वऱ्हाडांतील 'कदंब' नांवाच्या एका प्रमुख गाणेश क्षेत्राचें वर्णन करणारा ग्रंथ; यांत देवेन्द्राच्या मिषानें, जीवमात्रांना अवश्य भोगाव्या लागणाऱ्या मायामोहविलासाचें सूक्ष्म स्वरूप, स्पष्ट वर्णिलें आहे. किं० १ रु० ६ आणे.

४. **श्रीविघ्नेशाष्टक स्तुति—सटीक—सविवरण**—यांत श्रीगणेशाच्या पूर्ण स्वरूपाचें वर्णन आलेलें असून, त्याचें ज्येष्ठराजत्व व पूर्ण ब्रह्मत्व स्पष्ट दर्शविलें आहे. किं० रु० १. सर्वांना ट. ख. निराळा.

५. **श्रीगाणेशमठादर्श**—यांत शुद्ध वैदिक गाणेश संप्रदायाचा इतिहास, त्याची मूळ आचार्यपरंपरा आणि वैशिष्ट्य हीं वर्णिलीं असल्यानें, प्रत्येक गाणेशमार्गीयाच्या संग्रहीं तें असणें जरूर आहे. किंमत एक रुपया. ट. नि.

**सूचना**—श्रुति-स्मृति-प्रोक्त **गाणेश धर्माचें स्वरूप**, यांच्या परिशीलनानें, अगदीं स्पष्ट व सोज्ज्वल असें निःसंदिग्धपणें प्रत्ययाला येतें, हा या सर्वांचा विशेष आहे.

पत्ता—**मॅनेजर 'अंकुश'**—पो० मोरगांव, जि० पुणें.

७९१५६
१६००
१७७५५

॥ श्रीस्वानंदेशो गणराजः समर्थः ॥

# श्रीयोगामृत शास्त्राचें स्वरूप

अथवा

# श्रीमद्गणेश–गीतेचें श्रेष्ठत्व.

## [ श्रीमद्गणेशगीतेचें विशेष स्वरूप स्पष्ट दर्शविणारा लहानसा निबंध ]

हा निबंध लेख श्री ब्र. गा. म. **श्रीमदंकुशधारी** सद्गुरु योगीन्द्र महाराज यांनीं लिहिला असून, तो सुमारें ८।९ वर्षांपूर्वी ' आचार्य ' नामक पाक्षिक पत्रांतून प्रसिद्ध झालेला आहे. कै. लो. बा. गं. टिळक यांच्या 'गीता-रहस्य ' नामक सुप्रसिद्ध ग्रंथांत जीं अनेक वादग्रस्त अथवा भ्रामक समजुतीचीं स्थळें आहेत, त्यांपैकीं **श्रीगणेशगीतादि** गीतांचा अपकर्ष दर्शविणाऱ्या मुद्यासंबंधीचें विवेचन–यथार्थ स्वरूपबोधन करणारें असें विवेचन–सदरहु लेखांत आलेलें आहे. श्रीगणेशगीतेचें नित्य पठण करणाऱ्या अथवा परिशीलनादि रूपानें तिचें अध्ययन करणाऱ्या जिज्ञासु भाविकांना, गणेशभक्तांना वगैरे, गीतेचें विशेषत्व काय आहे, हें समजणें अवश्य आहे; आणि तें कार्य सदर निबंधाच्या द्वारें सहज साध्य आहे. तसेंच पुष्कळ गणेशभक्ताकडून तशी सूचनाही आली आहे. म्हणून तो निबंधलेख या अंकापासून दिला जात आहे; तो त्यावेळीं जसा प्रसिद्ध झाला तसाच दिला आहे.

## ( लो. टिळक व ' नकली ' गीता ? )

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनीं श्रीमद्भगवद्गीतेचें जें भलें मोठें ' रहस्य ' प्रसिद्ध केलें आहे, त्यामुळें सर्वत्र लोकांत अनुकूल व प्रतिकूल टीका इत्यादिकांनीं मोठी खळबळ उडालेली आहे व तिचा परिणामही सामान्य जनतेवर आपआपल्यापरी होत आहे. तो परिणाम घडवून आणणाऱ्या अनेक मुद्यांपैकीं श्रीमद्भगवद्गीतेवांचून इतर सर्व गीता तिच्याच ' नकला ' असून, त्या सर्व तिच्या मागाहून झालेल्या आहेत; आणि म्हणूनच त्या निस्तेज व शिळ्या आहेत. ' हा एक मुद्दा आहे. वास्तविक प्रमाण-

रहित व एकदेशीय अतएव भ्रामक अशा मुद्यासंबंधें विचार करण्याचें फारसें प्रयोजन नाहीं; तरी पण कर्तृतः महत्त्व पावलेल्या या मुद्याचा अथवा विपरीत कल्पनेचा परिणाम त्या त्या मार्गांच्या परप्रत्ययनेय अनुयायांवर विशेषतः कालानुसार झालेल्या शुद्ध सांप्रदायलोपामुळें, आपल्या मार्गाविषयीं अनिश्चित-बुद्धि असलेल्या गाणपत मार्गीयांवर झाल्यावांचून कदापि राहणार नाहीं, व राहातही नाहीं असा अनुभव दिसतो. शिवाय अशा तऱ्हेच्या भ्रामक समजुती साहजिकपणेंच रूढ होणें व वाढत जाणें हें कालगौरवाला अनुसरून प्रबल झालेल्या आभासमार्गाचें—यथार्थ स्वरूपाच्या विकृतीचें—अर्थातच परिणामीं विनाशगतीचेंच द्योतक असतें—आहे हें स्पष्टच आहे. आणि गीतारहस्यांतील टीकास्पद मुद्याच्या निमित्तानें जरी प्रस्तुत विचार करण्याची प्रवृत्ति आहे, तरी ती तत्काल-निमित्तक अतएव प्रासंगीकच असून, तिचें खरें निमित्त कारण वरीलप्रमाणें आभासमार्गाला अनुसरणारा परिणाम—अर्थात तशी विपरीत समजूत—गणेशगीतेविषयीं व तिच्यांतील तत्वोपदेशाविषयीं गणेशभक्तांच्या ठिकाणीं सुद्धा असलेल्या भलत्याच कल्पना—हेंच होय. आणि म्हणून यद्यपि रहस्यकारांच्या अशा लिहिण्यानें इतर गीतांची **स्वयंसिद्ध महति** तिळमात्रही कमी होणार नाहीं. हें खरें आहे; तथापि वर लिहिल्या-प्रमाणें परिणाम होणें सर्वथा अनिष्ट असल्यामुळें, त्या गीतांचें यथार्थ स्वरूप, म्हणजे त्यांना मूलभूत असलेल्या योगामृतशास्त्राचें स्वरूप, प्रकट करून व तद्विरुद्ध आक्षेपांचें निरसन करून त्या उपर्युक्त परिणामाला आळा घालणें, हें अत्यंत अवश्य असें प्राप्तकर्तव्यच आहे; आणि त्यालाच अनुसरून या लहानशा लेखांत विचार करण्याचें योजिलें आहे.

## श्रीयोगामृतशास्त्राचें स्वरूप

प्रथमतः सर्व गीतांना मूल प्रमाणभूत अशा 'योगामृत शास्त्रा'चें स्वरूप समजणें अवश्य आहे. करितां त्याची परंपरा सांगून नंतर क्रमानेंच तदंतर्गत श्रीगणेश गीतादिकांविषयीं विवेचन करूं. 'गीता' हा शब्द एकंदर ज्ञानपर ग्रंथांस लाविलेला असतो, अशी रहस्यकारांची कल्पना आहे; परंतु तसेंच केवळ गृहीत धरिलें तर कोणत्याही ज्ञानपर ग्रंथांस 'गीता' असेंच म्हणावें लागेल, आणि त्यामुळें सिद्धांतरूप अशा 'गीता'—शास्त्राचें महत्त्वच

राहणार नाहीं. शिवाय सर्वच ज्ञानपर ग्रंथांस ' गीता ' हा शब्द लाविलेला असता असें ही दिसत नाहीं; ' गीता ' हें स्वतंत्र शास्त्र असून तें अद्वैत सिद्धांताचें एक प्रधान अंग आहे. अद्वैत सिद्धांत यथावत् कळण्याकरितां, श्रुति, स्मृति, तंत्रिणी, मीमांसा व योगिनी अशा पांच विद्या प्रवृत्त झाल्या असून, त्या अखिल ज्ञानघनस्वरूपिणी जी महाबुद्धि, तिच्या अंशभूत अशा मुली आहेत. यांच्या परिपूर्ण जाणण्यानेंच सर्व सिद्धांतांचें ज्ञान होणें शक्य आहे. चौदा विद्या, सोळा विद्या किंवा अठरा विद्या इत्यादि भेदानें जीं विद्यास्थानें सांगितलेलीं आहेत, तीं सर्व या पांच विद्यांच्या अंतर्गतच होत, ' गीताशास्त्र ' हें या पंचविद्यांपैकीं ' योगिनी ' नामक पांचव्या विद्येच्या उपांगत्वानें वर्णिलेलें आहे. आणि त्यासच ' योगामृत शास्त्र ' अशी संज्ञा आहे. त्यांमध्यें पूर्ण-अद्वैत ज्ञानाच्या सिद्धीकरितां सोपानभूत अशा दहा गीता सांगितलेल्या आहेत. त्या कैवल्यसिद्धीकरितां उपास्यभूत अशा विष्णु, शिव, शक्ति, सूर्य व गणेश, या पंचायतन देवांच्या नावांनीं युक्त असून, त्या प्रत्येकीचे पूर्व व उत्तर असे दोन विभाग आहेत. पूर्वगीता व उत्तरगीता अशा त्यांच्या संज्ञा त्या त्या शास्त्रीय संप्रदायांत प्रसिद्धच आहेत. म्हणूनच प्रत्येक गीतेच्या शेवटीं संकल्पांत ' योगशास्त्रे ' अगर ' योगामृतशास्त्रे ' असें पद असतें, हें सर्वश्रुत आहेच. या दोन विभागांमधील ' पूर्वगीता ' साधन सिद्धीकरितां व ' उत्तरगीता ' अनुभवसिद्धीकरितां म्हणून सांगितल्या गेल्या आहेत.

एकंदरींत या दहा गीतांपैकीं आद्य कल्पोद्भव अशा श्रीगणेशपुराणांत ' गाणेश पूर्वगीता ' आणि आद्यन्तकल्प-वृत्तबोधक व केवळ उपनिषत्स्वरूप अशा श्रीमन्मौद्गल महापुराणांत ' योगोत्तर गीता ' वर्णिली आहे; तसेंच आदित्य पुराणांत ' सौर पूर्वगीता ' व सौर[1] महापुराणांत ' सौरोत्तर गीता ' आलेली असून, अनुक्रमें औशनस व भागवत[2] या दोन पुराणांत ' देवीगीता-

---

१ हल्लीं छापिलें गेलेलें सौरपुराण, कोणत्याही अठरा पुराणांपैकीं एक असें पुराण नसून तो ' सौरसंहिता ' नामक एक ग्रंथविभाग आहे. सौरपुराण निराळेंच आहे.

२ हें ' भागवत ' महापुराणांतर्गत ' श्री देवीभागवत ' होय, हल्लीं विशेष प्रसिद्ध असलेलें बोधदेवकृत व पांचरात्रमतानुयायी असें ' श्रीमद्भागवत ' नव्हे.

द्वय, ' शिवरहस्य व पद्मपुराण यांत ' शैव गीताद्वय ' आणि महाभारतांत श्रीकृष्णानीं अर्जुनाला उपदेशिलेल्या दोन्ही गीता, वैष्णवमार्गाला अनुसरणाऱ्या अशा, विष्णूच्या दोन गीता म्हणून, निबद्ध झालेल्या प्रसिद्ध आहेत. त्यांपैकीं भगवद्गीता ही ' पूर्वगीता ' असून, ' उत्तरगीता ' त्याच नांवानें आलेली आहे. एवंच अशा निरनिराळ्या ठिकाणीं आलेल्या या दहा गीतांचें ' मूळ योगामृत' शास्त्र हें असून, त्याच्या यथावत् परिचयावांचून पूर्णाद्वैतरूप सिद्धांताचें ज्ञान होत नाहीं व अर्थात् पूर्ण सिद्धीही पण मिळत नाहीं, असा नियम आहे. त्यालाच अनुसरून, अद्वैत सिद्धांताच्या स्थापनेकरितां कालनियतीप्रमाणें वेळोवेळीं जे जे आचार्य पुरुष होऊन गेले, त्यांनीं त्यांनीं त्यावेळच्या लोकांच्या अधिकाराला अनुरूप अशा आपआपल्या सिद्धान्तांचें स्थापन करितांना, सर्वसिद्धांतप्रतिपादक अशा आपल्या प्रस्थानत्रयांत तिसऱ्या प्रस्थानाच्या जागीं यांचीं [ या वरील गीतांची ] योजना केलेली आहे, ती शास्त्रप्रसिद्ध आहे. त्यांपैकीं द्वापार युगाच्या शेवटीं भगवान् श्रीवेदव्यासांनीं स्थापन केलेल्या आपल्या सर्वसिद्धांतरूप अशा अद्वैत–प्रस्थानत्रयांत दशोपनिषदें [ ईशकेनादि ], ब्रह्मसूत्रें [ ब्रह्मकांड व देवकांड यांसह ], आणि गीतादशक म्हणजे वरील दहागीता यांची योजना केलेली आहे; ती फारच योग्य असून, सर्वसिद्धांतरूप असल्यामुळें, अद्वैतज्ञानाच्या परिपूर्ण सिद्धीलाअत्यंत अवश्यक आहे, इतकेंच नव्हे तर अद्वैतसोपान–परमकाष्ठाभूत अशा पूर्ण योगसिद्धीला–ब्रह्मभावसिद्धीला ती फारच पोषक आहे. परंतु पुढें कलियुगाच्या आरंभीं कालगौरवाला अनुसरून जेव्हां वेदविरुद्ध अशा नानाप्रकारच्या मतांचा अगदीं सुळसुळाट झाला व अद्वैतसिद्धांताचा सर्वथा लोप होऊन तशा जिज्ञासु अधिकारी जनांचाही प्रायः अभावच झाला, तेव्हां तत्कालीन स्थितीला उपयोगी व पुरुषार्थाला मूळभूत अशा धर्मसिद्धांत--प्रवृत्तीला पोषक, असा मार्ग–म्हणजे अविद्यानाशपूर्वक विद्याप्रवेशसिद्धीरूप, केवळ–सामान्यतः–अद्वैतसिद्धांत प्रवेशभूत, असा मार्ग–प्रवृत्त करण्याकरितां, कलियुगांतील युगाचार्य, **श्रीमदाद्य शंकराचार्य** यांनीं, कालमान व अधिकारीमान हें ध्यानीं आणून, वरील व्यासप्रस्थानापैकीं दुसऱ्या नऊ गीता सोडून वरील सर्वसाधारण मार्गाला सर्वथा अनुरूप अशा, फक्त भगवद्गीतेचाच मात्र

स्वीकार केला; कां कीं, ती सोपानभूत–अशा मतपंचकास आरंभभूत असून धर्मपुरुषार्थाचाच प्रामुख्यानें पुरस्कार करणारी आहे; आणि स्वधर्मनिष्ठा हाच पूर्ण ज्ञानाचा पाया आहे. तसेंच वरील इतर गीतांबरोबर व्यासाच्या दुसऱ्या प्रस्थानांतील देवकांडही साहजिकपणेंच मागें पडलें; कारण ज्ञानाचा मूळ पाया जी स्वधर्मनिष्ठा, तीच जर विचलित झालेली व अद्वैतसिद्धांतांच्या जिज्ञासेचाच जिथें पत्ता नाहीं, तिथें अनुभवालाच साधक अशा मार्गांची अथवा मार्गबोधक ग्रंथांची प्रवृत्ति व प्रसिद्धि कशी असणार? एवंच असें हें (दशोपनिषदें, ब्रह्मसूत्र, व भगवद्गीता एतद्रूप) प्रस्थानत्रय, अद्वैतसिद्धांताचें बोधक प्रस्थान म्हणून, वरील कारणांकरितां, प्रवृत्त होऊन त्यावरच श्रीमदाचार्यांनीं भाष्य लिहिलें आणि या कारणानेंच मुख्यतः भगवद्गीतेची विशेष प्रसिद्ध झालेली आहे म्हणून तेव्हढ्यावरून इतर गीतांचें महत्त्व–विशेष किंवा यथार्थसिद्धिसाधकत्व मुळींच कमी होत नाहीं! कां कीं, यांची प्रवृत्ति किंवा प्रसिद्धीच मुळीं स्वधर्मनिष्ठेच्या योगानें अधिकारसंपन्न झालेल्या जिज्ञासूंवर व तशा क्रियानिष्ठ साधकांवर अवलंबून असते, हें उघड आहे. ही गोष्ट लक्षांत येण्याकरितांच शास्त्रप्रसिद्ध अशी श्रीयोगामृतशास्त्राची ( गीताशास्त्राची ) मूळ परंपरा थोडक्यांत कथन केली आहे.

या परंपरेचा विचार करितां, हें निर्विवाद सिद्ध होतें कीं, वरील गीता 'वेगवेगळ्या मतप्रवर्तकांनीं आपल्या विशिष्ट संप्रदायांच्या पूर्ततेकरितां रचिल्या आहेत !' असें नसून, त्या सर्व अनादिसिद्ध व अपौरुषेय अशा **योगामृत शास्त्रांतच** सांगितल्या आहेत; आणि त्याच पुढें पुराणविद्या–प्रवर्तक महर्षींनीं आपआपल्या पुराणांतून ग्रथित केल्या आहेत. हें योगामृत शास्त्र पूर्वीं सृष्ट्यारंभीं वेदपुरुषानें, प्रणवात्मा जो गणेश त्यानें–महाविष्णूला पालन कार्यावर नियोजित केलें, त्यावेळींच–त्याला उपदेशिलें असल्याचें सांगितलें आहे. यांचें प्रत्यंतर ' पुरा सर्गादि–समये त्रैगुण्यं त्रितनूरहं । निर्माय चैनमवदं विष्णवे योगमुत्तमम् ॥ १ ॥ अर्यम्णे सोऽब्रवीत् सोपि मनवे निजसूनवे । ' इत्यादि ( ग. गी. अ. ३ ) या वचनांत मिळत असून त्याचाच अनुवाद– ' इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययं । विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ॥ १ ॥( भ. गी. अ. ४ ) या वचनांत आलेला आहे. वरील दोन्ही

गीतेंतील श्लोकांपैकीं ' निर्माय चैनमवदं ' हें पद फार महत्त्वाचें असून, पुढें सदरील योग विष्णूला उपदेशिला असल्याचें सांगून पुढील परंपराही सांगितली आहे; तीच भगवद्गीतेशीं जुळती आहे. दोनही गीतेंतील विशेषत्व[1] हें अशा रीतीचें आहे. हीच गोष्ट जरा स्पष्टपणें महापुराणांपैकीं आद्य अशा ब्राह्मपुराणाच्या उत्तरखंडांत आलेली आहे. त्यांतील अध्याय १[2] मध्यें वाल्मिकी ऋषींच्या चरित्र प्रसंगानें, त्यांनीं श्रीगणेशाचें फार मोठें आराधन करून, तो प्रसन्न झाल्यानंतर, त्याची स्तुती केल्याचा जो उल्लेख आलेला आहे, त्याठिकाणीं त्या वाल्मिकीकृत ' कव्यष्टक ' नामक स्तोत्रांत, असा एक श्लोक आहे;

" विधात्रे त्रयीमुख्य-वेदांश्च **योगम्** ।
**महाविष्णवे** चागमान् शंकराय ॥
दिशन्तं च सूर्याय विद्यारहस्यं–।
कविं बुद्धिनाथं कवीनां नमामि ॥ १ ॥ "

भावार्थ–' ज्यानें ब्रह्मदेवाला वेदादि विद्या दिल्या, महाविष्णूला संपूर्ण योगशास्त्र दिलें, शंकराला नाना प्रकारचे आगम दिले, आणि सूर्याला विद्यारहस्याचा उपदेश केला; त्या बुद्धिपति गणेशाला, कवींच्याही कवीला मी नमस्कार करितों.'

---

१ यावर कित्येक आधुनिक पदवीधर सुक्षितांचा असा एक आक्षेप असल्याचें दिसून येतें कीं, ' गणेशगीतारचणारानेंच तिचें श्रेष्ठत्व व पुरातनत्व सिद्ध करण्याकरितां अशी कल्पना केलेली आहे. ' परंतु हा आक्षेप शुद्ध काल्पनिक-प्रमाणशून्य व विपरीत तर्कानेंच युक्त असल्यानें असत्य आहे, हें तिचें मूलभूतत्व प्रतिपादणाऱ्या अनेक प्रमाणांवरून, शास्त्रीय दृष्ट्या शोधन केल्यास सहज कळून येईल·

२ हल्लीं आनंदा० छा० छापिलेल्या ब्राह्म पुराणांत हा श्लोक अथवा ही कथाच आढळत नाहीं, इतकेंच नव्हेतर, दुसऱ्या ठिकाणीं उल्लेखित असलेलीं प्रकरणेंच्या प्रकरणेंच त्यांत नाहींत ! उलट वेदविरुद्ध धर्माचेंच उपपादन आहे, याचें कारण प्रायः ' शुद्ध संप्रदायलोप ' व पाखंड मतांचा सुळसुळाट ' हेंच दिसतें ! कारण द्रविड देशांत पुष्कळशीं पुराणें शुद्ध आढळतात. हाच प्रकार पद्मपुराण, ब्रह्मांडपुराण, इत्यादिकांत असून, त्यांत शिवगीता, गणेशसहस्रनाम इत्यादि सुप्रसिद्ध मोठमोठी प्रकरणेंच नाहींत ! द्राविड पुस्तकांतून तीं आहेत.

यांत वरील गोष्ट स्पष्टच आलेली असून, अनेक उपनिषदादिकांतूनहीं भगवान श्रीगणेशापासूनच महाविष्णूला योगशास्त्राची प्राप्ति झाल्याचें वर्णन आढळतें. आतां इतर कांहीं ज्ञानपर ग्रंथांना क्वचित् जो ‘ गीता ’ शब्द लाविला जातो, तो नुसता लाक्षणिक अतएव एकदेशी आहे, असें समजावें; त्याचा वरील गीताशास्त्राशीं किंवा योगामृत शास्त्राशी प्रत्यक्ष संबंध मुळींच नाहीं.

गीतारहस्य पृष्ठ ३–४ यांत रहस्यकार म्हणतात कीं, ‘ ती ( श्रीगणेशगीता ) थोड्या शब्दभेदानें भगवद्गीतेचीच ‘हुबेहुब नक्कल आहे’ असे म्हणण्यास हरकत नाहीं ! ’ या त्यांच्या म्हणण्यास नुसत्या तर्काखेरीज दुसरा कोणता पुरावा आहे ? दोनही गीतांत कांहीं विषय–जे सर्वसाधारण आहेत, महत्त्वाचे नव्हेत असे–एकसारखे आले आहेत, म्हणून ती ‘ हुबेहूब नक्कल ’ होते कीं काय ? उदाहरणार्थः–उपनिषदांत ‘ सत्यं वद ’ असें सांगितलें आहे, मनुस्मृतींत ‘ सत्यं ब्रूयात् ’ असें म्हटलें आहे; पुराणांतूनही त्याचा अनुवाद प्रसंगानें केला गेला आहे, व पुढें समर्थांच्या मनाच्या श्लोकांत व वामनपंडीत, भक्तराम इत्यादिकांच्या मनोबोधांतही तो विषय सांगितला आहे. पण एवढ्यावरून ह्या सर्व अनुक्रमें ‘ हुबेहूब नकला’च आहेत, असें म्हणतां येईल काय? मुळींच नाहीं ! असाच प्रकार श्रीगणेशगीता व भगवद्गीता यांच्याविषयीं आहे कांहीं ठिकाणीं वरील विचारसरणी-प्रमाणें सामान्यतः साम्य–सारखेपणा दिसला–आणि शास्त्रीय नियमाप्रमाणें व वेदान्त परिभाषेला अनुसरून, उपदेश–धर्मपोषक असा तो दिसणारच ! तरी या दोन्ही गीतांतील प्रतिपाद्य विषय अगदीं एकच–एकाच पद्धतीनें उपदेशिलेले आहेत; असे नसून, जिज्ञासा, अधिकार व हेतु इत्यादिकांना अनुसरून अगदीं भिन्न, म्हणजे विरुद्ध अगर स्वतंत्र नव्हे तर आरंभ आणि अंत एतद्रूप असे, उपदेशिलेले आहेत; भगवद्गीतेचा विषय, ‘ शोकमोहनिरास, अविद्यानाश, होऊन विद्येची–ज्ञानाची प्राप्ति व्हावी, ’ हा आहे; म्हणजे पूर्ण अद्वैत सिद्धीला प्रवेशभूत–साधनीभूत असा आहे; तर श्रीगणेशगीतेचा मुख्य प्रतिपाद्य विषय, त्याच्या पुढील अनुभवाचा त्याच्या परिपूर्ण सिद्धीचा, असा ‘ अद्वैतपरम काष्ठारूप, विद्याऽविद्याशांतिरूप पूर्णयोग ’ हा आहे. तेव्हां ‘ गणेशगीता ही भगवद्गीतेचीच हुबेहूब नक्कल आहे’

हें रहस्यकारांचें अनुमान—नुसता तर्क—शास्त्ररहस्यदृष्ट्या अगदीं चुकीचा अतएव भ्रांतिमूलकच ठरतो ! हीच गोष्ट पुढील साकल्य विवेचनावरून चांगलीच लक्ष्यांत येईल. आतां या दोनही गीतांच्या उपदेशाचें प्रयोजन व उपदेश्यांचा अधिकार पाहूं !

## श्रीभगवद्गीतेचें प्रयोजन.

अर्जुन हा शोकमोहांनीं युक्त होऊन, 'धर्मसंमूढ-चेतस्' झाला, म्हणजे स्वकीय आप्तेष्टांच्या वियोगदुःखानें भ्रांत होऊन, तो, जेव्हां परम उज्वल अशा आपल्या क्षात्रधर्माला विसरला, स्वधर्मापासून च्युत झाला; व उलट अधर्म तोच धर्म असें त्याला वाटूं लागलें, तेव्हां, त्याची तशी जिज्ञासा स्पष्ट नव्हती तरी, सर्वसामान्य सुखहेतुक प्रवृत्तीच्या मुळाशी तशी जिज्ञासा, परम सुखरूप अशा मोक्षाविषयींची जिज्ञासा, असावयास पाहिजे, आणि असतेच असें जाणून, श्रीकृष्णांनी, त्याचा तो मोह घालवून, नानाप्रकारच्या ज्ञानोपदेशानीं, त्याला स्वधर्मनिष्ठ केलें; (कारण स्वधर्मनिष्ठ पुरुषच ज्ञानाचा अधिकारी होतो ) म्हणजेच अर्जुनाच्या निमित्तानें अशा प्रकारच्या शोक-मोहाक्रांत जीवांना, त्या शोकमोहरूप अविद्याबंधापासून त्यांनीं मुक्त होऊन, परम निःश्रेयसपदाला सहज प्राप्त व्हावें, याकरितां, धर्मप्रभु अच्युत जो भगवान श्रीकृष्ण, त्यानें अशा द्विविध धर्माचा उपदेश केलेला आहे. सारांश 'अविद्यानाशपूर्वक ब्रह्मज्ञानप्राप्ति' हेंच श्रीभगवद्गीतेचें प्रयोजन असल्याचें ठरतें. भाष्यकार श्रीमदाद्यशंकराचार्य यांनींही भाष्याच्या आरंभीं असाच उपक्रम केलेला आहे. आतां या अन्वयेंच श्रीमद्गणेशगीतेचें प्रयोजन काय आहे, तें थोडक्यांत पाहून तिच्या स्वरूप-विशेषत्वादिकांविषयीं विचार करूं.

## श्रीमद्गणेशगीतेचें स्वरूप व महत्व.

वर सांगितल्या प्रमाणें सर्व गीतांना मूलभूत असलेलें 'योगामृतशास्त्र,' श्रीस्वानंदनाथाकडून ज्याला प्राप्त झालें आहे, त्या श्रीमहाविष्णूनें, आदि नारायणानेंच योगामृतशास्त्राचें सारसर्वस्व अशी ही गीता, 'श्रीगणेशगीता' या नांवानें, अगदीं आरंभीं ब्रह्मदेवाला उपदेशिली; आहे, इतकेंच नव्हे तर ही श्रीगणेशगीता ज्या पुराण—विभागांत ग्रथित केली गेली आहे, तो पुराण—विभागही, एकरूप असलेल्या अखिल पुराणसंहितेचें सारसर्वस्व, आदिपुराण,

अशा स्वरूपानें, त्याला–ब्रह्मदेवाला महाविष्णूनेंच कथिला आहे; त्याचें कारणही असें झालें कीं, अगदीं पूर्वकालीं विश्वसृष्टीच्या आरंभीं, विश्वविलासकार्याच्या इच्छेनें प्रेरित झालेला, जो प्रभु सगुण गणेश, कार्यमूर्ती, त्रिगुणशांतिरूपिणी महामायेचा नियंता, त्रिगुणात्मा सर्वगुणसमष्टि, श्रीगुणेश, त्याच्या शरीरापासून भिन्न भिन्न रूपानें विश्वकार्याचें निर्वहण करणारे, पृथक पृथक् गुणांचा अभिमान धारण करणारे, ब्रह्मा–विष्णु–शिवादि देव उत्पन्न झाले; त्याच्याच कृपेनें त्यांना सर्व प्रकारचें सामर्थ्य मिळालें; आणि त्याच प्रभूच्या इच्छेला अनुसरून, ते शिवादि देव विश्वकार्य करूं लागले. त्यांच्यापैकीं रजोगुणाचा अधिष्ठाता ब्रह्मदेव, सृष्टिकार्याचें यथायोग्य निर्वहण झाल्या नंतर, स्वतःच्या स्थितीविषयीं व पूर्ण शांतीविषयीं विचार करूं लागला. मूळ रजोगुणाचें अधिष्ठातृत्व म्हणजे मोहाचें पात्रच ! आणि त्यांत विश्वकार्यकर्तृत्वाचा अभिमान ! ! त्यामुळें त्रस्त झालेला, अतएव रजोगुणोक्रांत असा–अज्ञानानें परिपूर्ण असा ब्रह्मदेव त्या मोहापासून मुक्त होण्याकरितां, परमात्म्याकडून प्राप्त झालेल्या संपूर्ण वेद–शास्त्रपुराणेतिहासादि ग्रंथांचा विचार करून, व तदुक्त साधनांचें अनुष्ठान करून, तो अनुक्रमें ज्ञानचक्षूस व योगचक्षूंसही प्राप्त झाला; म्हणजे नाना प्रकारच्या ज्ञानोपासनादि साधनांनीं त्याच्या चित्तांतील रजस्तमोविकार अगदीं निःशेष नष्ट झाल्यामुळें, म्हणजेच त्याचें चित्त अगदीं निर्मळ व निश्चळ अतएव सार्वभौमधर्मयुक्त–ब्रह्मधर्मक्षम असेंच झाल्यामुळें, पूर्ण योगशांतींच्या सिद्धीकरितां अवश्य सांगितलेल्या योग साधनाविषयीं, प्रत्यक्ष ब्रह्मोपासनाविषयीं, तो पूर्णपणें पात्र झाला; तेव्हां त्या पूर्ण योगशांतिसिद्धिहेतुक-अशा महत्साधनाच्या संपादनाकरितां, त्याचे परमगुरुवर्य जे आदिनारायण, महाविष्णु, त्यांना शरण जाऊन, यथोक्त धर्मांनीं त्यानें प्रश्न केला कीं, ‘ हे भगवान् ! या विश्वकार्यामुळें, अर्थात् रजोगुणाचा अभिमान माझ्या ठिकाणीं पूर्णपणें राहिल्यानें, मी फारच श्रांत झालों आहें, आणि यद्यपि अनेक साधनांच्या बलानें व मोठ्या विवेकानें, त्या अभिमानाचा त्याग करण्याचा प्रयत्न केला तरी तो कायमचा नाहींसा होत नसल्यामुळें, ‘ मी जगत्कर्ता, जगदीश्वर, परमैश्वर्यवान् सर्वांचा पितामह, सर्व विश्वाचें मूळ कारण, ’ इत्यादि प्रकारचा मोह मला वारंवार होतो; आणि पुनः शांति–अशांतीचें चक्र सुरूं

होऊन, नाना भ्रम व नाना दुःखें ठरलेलींच असतात ! यास्तव या असल्या महा भ्रमाचें पूर्ण निरसन होऊन, शाश्वत सुखरूप परम शांति मला प्राप्त व्हावी, एवढ्याकरितां मी आपणांस शरण आलों आहें; तरी मज शिष्याचें आपण संतारण करावें. '

अशी प्रार्थना श्रवण करून, नारायणानें त्याला–ब्रह्मदेवाला सर्वसारभूत अशा शोडषोपनिषदुपबृंहणरूप आदि–पुराणाचा–आदि कल्पोद्भव अशा गाणेश महापुराणाचा उपदेश करून, तदन्तर्गत पूर्व गीतेनें पूर्ण योगमार्ग कथन केला; आणि साधनाविषयीं आज्ञा केली. तेव्हां त्या आज्ञेला अनुसरून, ब्रह्मदेवानें त्या श्रीगीताशास्त्रांतील पूर्ण योगसाधनांचें अवलंबन करून, त्यांच्या साधननिष्ठेच्या बळानें नानाविध योगभूमींचें आक्रमण केलें; आणि पूर्णयोग-शांति संपादन केली याप्रमाणें या श्रीगणेशगीतेची फार पुरातन, व मूळभूत अशी परंपरा आहे. श्रीविष्णूकडून प्राप्त झालेलें ' गाणेश महापुराण ' ब्रह्मदेवानें, दोन विभागांनीं, अनुक्रमें भृगु व लोमश या दोघांना उपदेशिलें; आणि त्यांपैकीं ब्रह्मदेवांनीं भृगूला जो विभाग-कथन केला, तो ' भार्गवी-संहिता' रूपानें असलेला विभागच–पुढें भृगूनीं सोमकांत राजाला सांगितलेला ' गणेशपुराण ' या संज्ञेनें सर्वत्र भूलोकावर प्रसिद्ध झाला असून, दुसरा विभाग जो लोमश नामक ' मूक ' मुनींना सांगितला, तोच त्यांनी संवरण नामक राजाला सांगितलेला, ' गणेशोपपुराण ' म्हणून प्रसिद्ध आहे; मूक ऋषींना ' अंकुश ' अशी संज्ञा–त्यांच्या सर्व सिद्धान्तबोधकत्वामुळें–प्राप्त झाली होती; म्हणून त्यांनी उपदेशिलेल्या विभागाला ' अंकुश ' पुराण असें म्हणतात; एवंच मूळ गाणेश कल्पोद्भव असें ' गाणेश महापुराण ' अशा रीतीनें, भार्गवीसंहितारूप ' गाणेश पुराण ' आणि अंकुशीसंहितारूप ' अंकुशपुराण ' अथवा ' गणेशोपपुराण ' या द्विविध स्वरूपानें शास्त्रप्रसिद्ध असें आहे. भृगु महर्षींना प्राप्त झालेलें ' गणेश पुराण ' त्यांना मध्यंतरी शापामुळें सर्वतोपरी मूढत्व आल्यानें, विसरलें गेलें होतें; तें पुन्हां व्यासमहर्षींकडून त्यांना मिळालें, व नंतर सोमकांताच्या द्वारें तें सर्वत्र प्रसिद्धीला आलें; अर्थात् व्यासप्रोक्त असं तें पुराण–भार्गवसंहितारूप–' गणेशपुराण ' व्यास-शिष्य जे ' लोमहर्षण ' नामक सूतमुनी, त्यांनी–उपदेश संप्रदाय क्रमानें–

प्रवृत्त केलेल्या अष्टादश महापुराणांत आदिस्थानीं ग्रथित केलें; आणि दुसरें नंतर उपदेशिलें—अर्थात् या क्रमाला अनुसरून, तें ‘ अंकुशपुराण ’ त्याच्या म्हणजे गणेशपुराणाच्या उपपुराणस्थानीं नियुक्त झालें. शिवाय ही कथा अगदीं आद्य कल्पारंभींची असल्यानें, आणि प्रति सृष्टीच्या आरंभी, आदि युगांत, ‘ ब्रह्मदेव ’ स्वतःच व्यासपदावर आरूढ होत असतात. असा नियम असल्यानें, एकदां ब्रह्मदेवानें व पुन्हां ‘ व्यास ’ पदस्थ ब्रह्मदेवानें, असें एकच गणेश पुराण—भार्गवीसंहितारूप—पुराण दोन वेळा भृगूंना सांगितलें आहे; म्हणून आणि त्यांतच—‘ श्रीगणेशगीता ’ ही ग्रथित झालेली आहे, म्हणून एवंगुणवैभवविशिष्ट अशा त्या गणेशपुराणाला विशेष महत्व व आद्यत्व प्राप्त झालेलें आहे. अशी याची व यामध्येंच असलेल्या श्रीगणेशगीतेची मूळस्वरूपस्थिति असून, तिचें महत्त्वही या स्वरूपावरून चांगलें लक्षांत येते.

आतां सदरच्या गणेशगीतेचा व गणेशपुराणाचा संप्रदाय, ब्रह्मदेवाकडून व्यासो-नारायणांना कसा मिळाला, त्याची पूर्वपीठिका पाहूं. आदि द्वापार युगाच्या शेवटीं, धर्मसंप्रदायाचें संगोपन करणाऱ्या सर्व देवांनी, कलियुगांत स्तब्धता, कुटिलता पाखंडप्रियता इत्यादि—दोषांनीं युक्त असे नाना प्रकारचे दुष्ट लोक होतील व ते धर्माचा नाश करितील, असें जाणून ते धर्मप्रभु—धर्माचे पालक जे वैकुंठवासी महाविष्णु, त्यांना शरण गेलें, व पुढील संभाव्य आपत्तीच्या नाशाकरितां, त्या सर्व देवांनी त्यांची प्रार्थना केली. तेव्हां ते भगवान व्यासरूपानें अवतीर्ण झाले. पुढें आपल्या अवतारकृत्याला अनुसरून, ते—व्यासमहर्षी—वेदादि विद्यांचे विभाग करूं लागले असतां, त्यांना आपल्या विद्या—ज्ञानादिकांच्या अभिमानामुळें, सर्व विघ्नांचें हरण करणाऱ्या व सर्व प्रकारच्या सिद्धी देणाऱ्या श्रीविघ्नराजाचें, केवळ प्रणवस्वरूप अतएव ज्ञानमूल अशा गणेशाचें, विस्मरण झालें; नव्हे त्यांनीं श्रीगणेशाचें उल्लंघनच केलें! ‘ मी विष्णूचा अंश—अवतारी पुरुष—केवळ धर्मकार्याकरितांच अवतीर्ण झालों आहे, तर—मला कसलें विघ्न होणार आहे? आणि इतर सामान्य जीवाप्रमाणेंच जर मंगलाची अपेक्षा धरून मी मंगलाचरण केलें, तर मग अवतारी पुरुषांत व इतरांत फरक तो काय राहिला? ’ अशा अहंकारवशतेमुळेंच

त्यांनीं श्रीगणेशाच्या आराधनाकडे दुर्लक्ष केलें; त्यामुळें त्यांचें सर्व ज्ञान नष्ट झालें, आणि भ्रांतिमुळें त्यांना चांगलें वाईट कांहींच समजेना, किंवा कोणताच निश्चय करितां येईना ! तेव्हां याचें कारण काय असावें, हें समजून घेण्याक-रितां ते सत्यलोकीं ब्रह्मदेवाकडे गेले; आणि त्यांना साष्टांग नमस्कार करून, मोठ्या विनयानें त्यांनीं प्रश्न केला; ' हे भगवन् ! साक्षात् नारायणस्वरूप अशा मला आज एकाएकीं इतकें मूढत्व कोठून उत्पन्न झालें ? अगदीं कांहींच समजेनासे झालें आहे ! अशी भ्रांति-होण्यासारखें पातक तरी माझ्या-कडून कोणतें झालें आहे ? हें समजावें अशी इच्छा धरून, आपणांस शरण आलों आहे ! ' हें ऐकून ब्रह्मदेवांनीं नाना प्रकारांनीं त्यांचें समाधान केलें; आणि त्यांच्या अभिमानाची जाणीव त्यांना पूर्णपणें पटवून त्या अभिमानामु-ळेंच उत्पन्न झालेल्या भ्रांतिरूप विघ्नाच्या नाशाकरितां श्रीविघ्नराजाचें आराधन करण्याचा उपदेश केला. त्याकारितां सांगोपांग गणेशोपासनामार्गाचा बोध करून, तदंगत्वानेंच पूर्णोंकार प्रतिपादक अशा—पूर्वीं श्रीविष्णूकडून श्रवण केलेल्या—श्रीगाणेश महापुराणाचा व तदंतर्गत श्रीगणेशगीतेचा उपदेश केला. त्यांच्या आज्ञेप्रमाणें साधनांचें अवलंबन करून वेद व्यासांनीं गीतानुशासनाप्रमाणें पूर्ण योगानुभव संपादन केला आणि कृतकृत्य होत्साते ते अवतारकृत्य संपादन करण्यास पूर्ण समर्थ झाले.

नंतर त्यांनीं वेदशाखा भिन्न करून, तदुक्त यज्ञादि कर्मांनीं शुद्धचित्त झालेल्या अधिकारी जनांना, क्रमानें पूर्ण शांति प्राप्त व्हावी, एवढ्याकरितां, साधननिष्ठाबोधक अशीं ब्रह्मादि अठरा पुराणें रचिलीं. त्यांनांच, प्रथम उपदे-शिल्यामुळें ' महापुराणें ' अथवा प्रतिमन्वंतरांत तीं प्रवृत्त होत असल्यानें, ' मनुपुराणें ' अशी संज्ञा आहे. अनंतर गाणेशादि अठरा कल्प पुराणांचा ( कल्पारंभी जीं भृगु—मरिचि इत्यादिकांकडून प्रकट झालेलीं, केवळ एकरूप अशी होती. त्यांचा) विभाग करून, ब्राह्मादि महापुराणांतील ज्ञानसाधनानें व तदुक्त अनुभवानें पात्र झालेल्या आपल्या शिष्यांना—अर्थात त्यांच्या मिषानें तशा अधिकारी जनांकरितां, त्यांचा उपदेश केला. महापुराणांनंतर या कल्प पुराणांचा उपदेश—पात्रतेच्या क्रमाला अनुसरून—झालेला असल्यानें, त्यांना त्या कल्पपुराणांना 'उपपुराणें' अशी संज्ञा केवळ उपदेशक्रम—लक्षणेचें द्योतक

म्हणूनच आलेली आहे; अर्थात् तेवढ्यावरून कनिष्ठत्वाची शंका येण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. ही पुराणोपपुराण व्यवस्था लक्षांत येण्याकरितां आणखी पुष्कळच विवेचन करावयास हवें; परंतु स्थलादिकांच्या अभावामुळें, आणि मुख्यतः प्रस्तुत विषयाला उपयुक्त अशी दिशा, एवढ्या विवेचनावरून सहज स्पष्ट होणारी असल्यानें, येथें एवढेंच पुरें करणें इष्ट आहे. असो; एवंच अशा रीतीनें पुराणोपपुराणांची व्यवस्था लागल्यानंतर सामान्यतः धर्माधर्म व्यवस्थेकरितां, व्यासांनीं महाभारत रचिलें व त्यांतच प्रसंगानुसार ' श्रीभगवद्गीता ' ग्रथित केली; अर्थात् तीहि महाभारतकालीं **व्यासांनींच** रचलेली नव्हे! अशी या दोन्हीं गीतांची मूळ शास्त्रसिद्ध परिणालिका आहे. सनातन वैदिक धर्माच्या सिद्धांताला मूळाधारभूत असलेल्या, अखिल विद्यासिद्धांतांचें सांगोपांग संशोधनपूर्वक सूक्ष्म पर्यालोचन केल्यास, ही गोष्ट सहज लक्षांत येते, केवळ तर्कावरून शास्त्रप्रमाणसिद्ध असा हा विषय कसा कळणार, वळणार, आणि मग तो वळवितां तरी कसा येणार ?

हा एकंदर विषय पुष्कळ ठिकाणीं पुष्कळ प्रकारांनीं आलेला आहे, त्यांतूनही मुख्यत्वेंकरून ब्राह्मपुराण—उत्तरखंड, मारीच, मौद्गल इत्यादि पुराणांतून व ' ब्रह्मानंदसुखोदय ' संज्ञक महेतिसांतील ' ज्ञानामृत ' ' विनायक रहस्य ' इत्यादि प्रकरणांतून वर्णिलेला आहे. श्रीगणेशगीतेच्या आरंभींच्या श्लोकावरूनही हा कथासंदर्भ चांगलाच लक्षांत येतो. श्रीगणेशपुराणाच्या उपदेश-परंपरेसंबंधींचें विवेचन वर येऊन गेलेलें आहेच. त्यांतील श्रीगणेशपुराणांतील—उत्तर खण्डांत ज्या अध्यायापासून श्रीगणेशगीतेला सुरवात झाली आहे, त्याच्या पूर्वींच्या अध्यायांत, सिंदूरासुराच्या नाशाकरितां अवतीर्ण झालेल्या श्रीगजाननांनीं, केवळ चार वर्षांचेंच वय असलेल्या त्या वरेण्याच्या पुत्रानें, सिंदूराचा नाश केल्यानंतर, वरेण्याच्या पूर्णयोगजिज्ञासेला अनुसरून, त्याला श्रीमद्गणेशगीतेचा यथाविधि उपदेश केल्याची कथा वर्णिली आहे. श्रीगणेशगीतेचें महत्तमत्व आणि तिच्या श्रोत्याचें व वक्त्याचें सर्वश्रेष्ठत्व व परम श्रेष्ठ असें पात्रभूतत्व पूर्णपणें ध्यानांत येण्याकरितां ती कथा सविस्तर कळणें फार जरूर आहे; म्हणून तिचा सारांश—या विषयाच्या सविस्तर ज्ञानाला उपयोगी असाच—यापुढें दिला आहे.

पूर्वकालीं कोण्या एका प्रसंगीं सृष्टी—कृत्याचें यथायोग्य संपादन केल्यानंतर, जगत्पितामह ब्रह्मदेव, मोठ्या समाधानपूर्ण अंतःकरणानें स्वस्थ होत्साते, आपल्या लोकांमध्यें निद्रावश झाले होते; इतक्यांत त्यांच्या भेटीकरितां कैलासाधिपति महादेव त्याठिकाणीं आले, व त्यांनीं ब्रह्मदेवाला उठविलें; तोंच त्यांना एक मोठी जांभई आली, आणि तिच्या बरोबर एक सुंदर पुरुष उत्पन्न झाला. शंकरांच्या भेटीचे कार्य होऊन, ते स्वस्थलीं निघून गेल्यानंतर, ब्रह्मदेवानें त्या पुरुषाला ' तूं कोण, कोठून आलास, काय कार्य आहे ? ' वगैरे प्रश्न केले, त्यावर त्या पुरुषानें, ' मी आपणांपासूनच उत्पन्न झालों असून माझ्या स्थलाविषयीं किंवा कार्यादिकांविषयीं मीं कांहींच जाणीत नाहीं ! ' असें सांगून, व पुनः साष्टांग नमस्कार करून मोठ्या विनयानें ' आपणच काय ती आज्ञा करावी ! ' अशी त्यांची प्रार्थना केली; तेव्हां ब्रह्मदेवांना मोठा आनंद झाला. अगोदर त्या पुरुषाचें अत्यंत—आरक्त सुंदर स्वरूप व पूर्ण सुगंधानें संपन्न असें त्याचें शरीर पाहूनच त्यांना अत्यंत मोह झालेला होता, तशांतच ती सविनय प्रार्थना ऐकून; 'हा जसा बाह्यतः सुंदर व सुवासनापूर्ण आहे, तसेंच याचें अंतःकरणही पण सुवासना—परिपूर्ण दिसतें, ' असें वाटून फारच मोहित झालेले ते ब्रह्मदेव त्याला म्हणाले, ' बाळा ! तूं माझाच पुत्र आहेस, हें सत्य आहे; अर्थात् माझ्याप्रमाणेंच तूंही मोठा सामर्थ्यवान व अलौकिक पुरुष आहेस ! तुझे अंतर्बाह्य सुवासनापूर्णत्वच याची साक्ष पटवीत असून, या विशिष्ट ऐश्वर्याचें द्योतक अशा ' सिंदूर ' या अभिधानानें तुझी सर्वत्र ख्याति होईल. तसेंच तुझ्या या विनयादिकांनीं मला फारच संतोष झालेला आहे, म्हणूनच मी तुला असा वर देत आहे कीं, या सर्व ब्रह्मांडाला—अर्थात् या ब्रह्मांडांतील सर्व लोकांना—जीवांना या जगदीश्वरांनाही—सर्वथा अजिंक्य होत्साता, तूं मोठ्या बलानें त्यांना जिंकून, सर्व ब्रह्मांडाचा राजा—सार्वभौम होशील ! तुला कोणापासून किंचिन्मात्रही भय कधींही प्राप्त होणार नाहीं, किंबहुना जगदीश्वर म्हणून प्रसिद्ध असलेले, माझ्यासुद्धां सर्व देव, ईश्वर वगैरे अगदीं तुझ्या स्वाधीनच राहतील ! कां कीं, कोणीही भिन्न भावधारी जीव असो कीं ईश्वर असो, तो भिन्नाहंकारानें युक्त अतएव भिन्न-भानरूप अशा मायेच्या आधीन असल्यानें, सद्वासनेनें किंवा असद्वासनेनें

युक्त असतो. सदसद्वासनारूपत्व हेंच मायेचें स्वरूप असून, तिच्या या विश्वविलासकार्याचें प्रतिबिंबच तूं आहेस, असें मी समजतों; याला अनुसरून या वरदानाला पोषक, असें मीं आणखी सांगतों कीं, 'मोठ्या रागारागानें तूं ज्याला कोणाला म्हणून आलिंगन देशील, तो तत्काळ भस्मसात् होऊन जाईल ! ! हें अगदीं पक्कें समज ! केवळ पुत्रस्नेहामुळें हें सर्व मी तुला दिलें आहे'

'सिंदूर' या नांवांतील तत्त्वही पण मायेच्या या विशिष्ट विलासाचें दर्शक आहे; तें लक्ष्यांत येण्याकरितां जरा स्पष्ट खुलासा करणें जरूर आहे. कोणत्याही वस्तूवर अग्नीचा व कांहीं विशिष्ट वनस्पतींचा संस्कार झाला असतां, भस्म व सिंदूर अशा तिच्या दोन अवस्था होत असतात; भस्मरूप अवस्थेंत त्या वस्तूचें नाम व रूप हीं नष्ट झालीं तरी, तिच्या भिन्नत्वाचें ज्ञापक असा वर्ण व गंध, म्हणजे रूप—विकार व नामविकार, अंशतः तरी कायम राहतोच; म्हणजे तन्मयत्वरूप उपाधिच तिचें भिन्नत्व दर्शवितें. परंतु सिंदूररूप अवस्थेंत त्या सर्वांचा परिपूर्ण लोप होत असतो. मूळवस्तूचा वर्ण वा गंध कोणताही असो, तो या अवस्थेंत पूर्णपण लीन होऊन, एकच वर्ण व गंध—सर्वाभेदरूप असाच—उरत असल्याचें प्रत्ययाला येतें. ही लौकिकांतील नैसर्गिक प्रक्रिया, मायापरिणामाचेंच उपलक्षण आहे—नामरूपादिकांनीं भिन्न भिन्न भासणारी, मिथ्याभूत, अतएव विनाशशील महामाया, जेव्हां परब्रह्म स्वरूपांत लीन होते, तेव्हां तिच्या दोन अवस्था होत असतात, एक नाना विध-भेदांचें शून्यत्व म्हणजे सर्वाभेदरूपत्व प्रत्ययाला येण्याची अवस्था कीं, ज्या अवस्थेंत नाना प्रकारचे भेद—नामांनीं किंवा रूपांनीं निर निराळे भासत नाहींत, तथापि केवळ तत्त्वरूपानें असल्याचें ज्ञात होतात, अशा रीतीनें अभेदरूप मायापरिणामाचा आभास होतो; केवळ ब्रह्मस्वरूपच प्रत्ययाला येत नाहीं, अशी अवस्था, व्याकृतरूप भेद नसल्यानें 'अव्याकृत' संज्ञेला पात्र असलेली तन्मयत्व उपाधिरूप अवस्था होय. वरील भस्मरूप अवस्थेच्या लक्षणांशीं तिचें साम्य असल्यानें, त्या 'अव्याकृत' मायावस्थेला 'भस्म' अशी संज्ञा आहे, आणि दुसरी, त्या अभेदत्वाचाही—निरास पावणारी पूर्ण शांतिरूप, परब्रह्मस्वरूपाशीं अगदीं

समरसत्त्वाला पावलेली, केवळ ब्रह्मभावरूपच अशी, ' त्रिगुण—शांतिरूपा मूळ प्रकृति ' या संज्ञेला पात्र असलेली अवस्था होय. हिला ' सिंदूर ' अशी शास्त्रिय संज्ञा आहे. कारण मायेच्या या अवस्थेंत तिच्या उपाधीचा व उपाधि-धर्मांचा पूर्ण निरास होत असून, केवळ ब्रह्मधर्मच सर्वत्र प्रतीत होत असतो, ' अहंब्रह्मास्मि ' रूप वृत्ति, हेंच केवळ मायेच्या निरुपाधिक उपाधींचें स्वरूप त्या ठिकाणीं कथनमात्र असतें, म्हणूनच ती पूर्ण शांतिरूप मायावस्था म्हटली जाते. सारांश ब्रह्मभुक्ता महामाया हीच सिंदूररूपा असून तशा ऐश्वर्याचें द्योतक, सदसद्वासनासमष्टीचें द्योतक, असें मायाविलास पूर्ण अभिधान, ब्रह्मदेवानें त्या पुरुषाला दिलें; हें तथ्य आहे. अर्थात अशा सर्व श्रेष्ठ ऐश्वर्यानें युक्त असलेला, तो पुरुष, एका सद्ब्रह्मस्वरूपावांचून सर्वांचेंच अतिक्रमण करणारा, सर्वांनाच अजिंक्य असून, द्वंद्व भावशून्य अशा केवळ ब्रह्मरूपालाच जिंक्य होता; हेंही स्पष्ट आहे. ब्रह्मदेवाच्या द्वारानें त्याला मिळालेलें विशिष्ट वरदान याचेंच निदर्शक आहे. प्रत्यक्ष तत्त्वमसि-स्वः-रूप, केवळ ब्रह्मस्वरूप, श्रीस्वानंदेश गणेश, सिंदूरवर्णाकृति, व सिंदूरप्रिय असल्याचें वर्णिलें असून, केवळ ब्रह्मभावसिद्धीच्या हेतूनें अथवा अन्य मिषानेंही त्याचें आराधन करणाऱ्या गाणपतांना, योगी—अयोगी वगैरे सर्व प्रकारच्या गणेशोपासकांना, सिंदूरोध्दूलनादिकांचें विधान अत्यंत अवश्य असल्याचें सांगितलें आहे; त्या विधानांतील तात्पर्य व परमात्म्याच्या सिंदूरप्रियत्वाचें रहस्यही वरील विवेचनावरून लक्ष्यांत येण्यासारखें आहे. अस्तु !

' ब्रह्मदेवांनीं आपणांवर फार मोठी कृपा करून हा अत्यंत दुर्लभ असा सर्व श्रेष्ठ व अमोघ वर आपणांस दिला आहे ! ' हें पाहून त्या ' सिंदूर-' नामधारी पुरुषाला फार मोठा आनंद झाला; पण लागलीच शंकाही आली कीं, आपण तपश्चरण वगैरे कांहींच न करितां, या एवढ्या वरदानाला कसें पात्र झालों ? तशा विकल्पयुक्त स्थितींतच तो पुरुष ब्रह्मदेवाला नमस्कार करून, स्वेच्छेनें कोठें तरी जाण्याकरितां उद्युक्त झाला ! वास्तविक अगदीं सहजासहजीं, हा एवढा मोठा वर—त्रैलोक्य विजयाचाच अधिकार तो—त्या पुरुषाला, ब्रह्मदेवानें एकदम कसा दिला ? अशी शंका उद्भवणें अगदीं साहजिक आहे; परंतु त्याच्या उत्पत्तीकडे लक्ष्य देतां, ती तेव्हांच निरस्त

होते ! ब्रह्मदेवाच्या एका विशेष वृत्तीपासूनच त्याचा उद्भव झालेला आहे. ज्या जगत्सर्जनरूप सामर्थ्याच्या जोरावर ब्रह्मदेवाचें जगदीशत्वरूप कार्य चाललें आहे. त्याच्या मूळाशी असलेला त्यांचा अभिमान, हाच त्या वृत्तीचें मूळ असून, 'मी या सर्व विश्वाचा स्रष्टा आहे व माझ्या सामर्थ्यामुळें याच्या उत्पत्तीची योजना अगदीं यथापूर्ण आहे.' असली अहंकारपूर्ण समाधानस्थिती—आढ्य स्थिति, हें तिचें—त्या वृत्तीचें स्वरूप आहे. अशा स्थितींतच त्या पुरुषाची उत्पत्ति झालेली असल्यानें, त्यांच्या त्या सामर्थ्याचें असद्भावरूप प्रतिबिंब—अहंभावाची प्रतिकृति—असाच तो होता; एकेक गुणाचे धारक असे हे ब्रह्मदेव—विष्णु—शिवादि ईश्वर, जरी—विश्वकार्याचें निर्वहण करून, विश्वेश्वरत्वाला पावलेले असतात, तरी ते संपूर्ण विश्वकार्यापैकीं एक एकच कार्य करणारे असल्यानें, त्याचे घटक म्हणूनच ठरलेले आहेत; त्यांना पूर्ण स्वतंत्रत्व नसून सर्वस्वतंत्र अशा श्रीगणेशाच्याच सत्तेनें त्यांना सत्ताधीशत्व प्राप्त झालेलें आहे. परंतु त्यांना जेव्हां या स्वस्थितीची विस्मृति पडते, व ते आपणाला सर्व—स्वतंत्र मानूं लागतात, तेव्हां त्यांच्या ठिकाणीं असलेली परमात्म्याची सत्ताच, विकृत रूपानें विरुद्ध रूपानें—आसुरभावानें-त्यांच्यापासून पृथक स्वरूप धारण करून, त्यांना नाना प्रकारें विघ्न करिते; आणि त्यांच्या पदापासूनही पण भ्रष्ट करिते ! असा नियम आहे. सर्वेश्वर श्रीगणनाथाच्या विघ्नराजस्वरूप सत्तेचेंच हें निदर्शन आहे. नाना प्रकारच्या दैत्यांच्या नाशाकरितां, जेव्हां जेव्हां म्हणून श्रीगणेशाचे अवतार झालेले आहेत; तेव्हां तेव्हांच्या त्यांनीं मारिलेल्या दैत्यांची स्थिति-उत्पत्ति वगैरे वरील नियमाला अनुसरूनच असल्याचें सर्वत्र शास्त्रांत आढळून येते. तस्मात् सिंदूरासुराची स्थिति वरील नियमाप्रमाणेंच असल्यामुळें, ब्रह्मदेवांनीं दिलेल्या वरांच्या मिषानें त्याला जें सामर्थ्य सहज प्राप्त झालें तें सहज-सिद्ध असेंच होतें; हें उघड आहे ! आणि म्हणूनच, ब्रह्मादि देवांनाही तो अनिवार्य झाला व त्याच्या निवारणाकरितां प्रत्यक्ष श्रीगणेशालाच अवतार धारण करावा लागला ! !

असो, मागें सांगितल्याप्रमाणें तो सिंदुरासुर विकल्पयुक्त अंतःकरणानें चालूं लागला असतां, एकाएकी त्याला एक विचार सुचला; तो मनांत म्हणाला कीं, ब्रह्मदेवानें दिलेला हा वर खरा खुरा फलदायकच आहे कीं नुसती माझी समजूत

केली? याचें प्रत्यंतर पाहिलें पाहिजे; आणि प्रयोग करून पहावयाचा तर तोही ब्रह्मदेवावरच करून पहावा; एकदम धांवत जाऊन त्यालाच आलिंगन द्यावें, म्हणजे जर त्या वरांत खरेपणा असेल तर तात्काळ दिसेल, नाहींतर खोटेपणाबद्दल आपण लागलीच त्याला शासन करूं! असें म्हणून तो सिंदुरासुर तसाच परत फिरला, आणि मोठ्यानें गर्जना करीत करीत आपले दोन्ही बाहू पसरून, मोठ्या वेगानें, तो ब्रह्मदेवाकडेच धांवला. तें पाहतां बरोबर ब्रह्मदेव भीतीनें व आश्चर्यानें अगदीं थक्क होऊन गेले! आपणांस वाटलें काय, आपण केलें काय, आणि हें झालें काय? याचा त्यांना काहींच बोध होईना. पण अधिक विचार करण्यास वेळ कुठें होता? तो 'सिंदुरासुर' अगदीं जवळच येऊन ठेपला; तेव्हां लागलीच ' 'पामरा दुष्टा! मोठ्या पुत्रवात्सल्यानें मीं तुला हें फार मोठें सामर्थ्य दिलें; आणि ज्या अर्थीं तूं परत माझ्यावरच उलटलास? त्याचा प्रयोग मजवरच करूं लागलास? त्या अर्थीं तूं अत्यंत कृतघ्न दुरात्मा आहेस! तुझ्या अंतरंगांत एवढा सुद्धा सदंश नसून, असद्भावनेचा केवळ मूर्तिमंत पुतळा आहेस! तस्मात् दैत्यप्रकृतीलाच तूं योग्य असून दैत्याप्रमाणें उन्मत्त झालेल्या तुझा नाश, परमात्मा, सर्वेश्वर गणनाथ लौकरच करील! हें सत्य समज;' असा शाप देऊन, मोठ्या घाईघाईनें ब्रह्मदेव तेथून पळतच निघाले, ते वैकुंठांमध्यें विष्णूकडे आले; दैत्यही पाठोपाठ आलेला होताच! तो एकंदर प्रकार कसा काय झालेला आहे, हें जाणून विष्णूंनीं ब्रह्मदेवाचें सांत्वन केलें, आणि त्या सिंदुरासुराला चार युक्तीच्या गोष्टी सांगून त्याला शंकराकडे पाठवून दिलें. तो दैत्य तसाच तेथून निघाला, तो कैलास लोकामध्यें आला आणि पाहतो तर शंकर ध्यानस्थ बसले असून, त्यांच्या वामांगावर एक फारच सुंदर स्त्री आहे; तेव्हां 'या नग्न तपस्व्याशी आपणास काय करावयाचें आहे? ही परमसुंदर स्त्री, आपणास फारच योग्य आहे, केवळ स्त्रीरत्न आहे, तर तिलाच घेऊन जावें, म्हणजे झालें!' असा विचार मनांत आणून, सिंदुरासुरानें तात्काळ पार्वतीला उचलून घेतलें, आणि मोठ्या वेगानें तो आकाशमार्गानें निघून गेला! भीतीनें व्याकुळ झालेली पार्वती मोठमोठ्यानें आक्रोश करून शंकरांचा धांवा करू लागली, आणि शिवगणांनींही पण, त्या बलाढ्य दैत्यापुढें त्यांचें कांहींच न चालल्यामुळें, मोठा को-

७११५८ १६८० १९/१/५८ २६१५८

लाहल केला; तेव्हां शंकर भानावर आले, आणि त्या दैत्याची एकंदर हकीगत ऐकून, मोठ्या रागानेंच ते त्याच्या अंगावर धांवून गेले; दोघांचेंही फारच मोठें युद्ध झालें! वरबलानें तो दैत्य सर्वांनाच अजिंक्य असल्यानें त्याच्यापुढें शंकरांचें बल कांहींच चालेना, व ते फारच व्याकुल होऊं लागले! तें पाहून पार्वतीनें श्रीगणेशाचा धांवा केला. तेव्हां श्रीगणेश द्विजरूपानें तेथें आले, व त्या उभतांच्या मध्यें आपला परशु गुप्तपणानें धरून त्याच्या प्रहारानें दैत्याचा पराभव करविला! पराभूत झालेला दैत्य पार्वतीला सोडून निघून गेला, नंतर देवी पार्वतीच्या प्रार्थनेवरून श्रीगणेशानें आपलें दिव्य स्वरूप प्रकट करून दर्शन दिलें. आणि 'देवि गिरिजे! पूर्वी त्रेतायुगामध्यें श्रीमयूरेश अवताराच्या वेळीं तुला आश्वासन दिल्याप्रमाणें आज हें माझें दर्शन तुला होत आहे; आणि आतां लौकरच त्या दुष्ट सिंदूरासुराच्या नाशाकरितां तुझ्या घरीं मी अवतार घेईन!' असें सांगून तत्क्षणींच अंतर्धान केलें. देवी पार्वतीहि शंकरासहवर्तमान आपल्या ठिकाणीं निघून गेली.

इकडे सिंदूरासुरानें भूलोकावर येऊन, आपल्या वरबलानें सर्वत्र दिग्विजय करून, आपलें राज्य स्थापिलें. मोठमोठे दैत्य त्याला येऊन मिळाले; इंद्रादि देवांना व ईश्वरांनाही त्याचें अमोघ वरसामर्थ्य अगोदरच कळून आलेलें असल्याळें, ते सर्वजण आपआपल्या स्थानांच्या त्याग करून अरण्यांत वगैरे निघून गेले. अर्थातच सिंदूरासुर अखिल ब्रह्मांडांचा राजा झाला आणि आपल्या इच्छेप्रमाणें व प्रकृतिधर्माप्रमाणें त्यानें आपला कारभार सुरू केला. पुढें सिंदूराच्या पीडेनें त्रस्त झालेल्या देवादिकांनीं त्याचा नाश करण्याबद्दलची प्रार्थना केल्यावरून, आणि देवी पार्वतीला पूर्वी दिलेल्या आश्वसनाला अनुसरून, एवंगुणविशिष्ट अशा त्या सिंदूरासुर नामधारी दैत्याच्या नाशाचें आपलें अवतारकृत्य संपादण्याकरितां, म्हणजे या मिषानें पूर्वी विवेचन केल्याप्रमाणें सिंदूर शब्दानें व अर्थानें उपलक्षिला जाणारा जो अखिल मायाविलास, त्याचा नाश करून पूर्णशांतिदायी अशा आपल्या योगज्ञानरूप वीर्याचा प्रकाश करण्याकरितां, श्रीस्वानंदेश–गणेश शिव–पार्वतीच्या घरीं, प्रत्यक्ष ब्रह्मरूपबोधक अशा शुंडादंडादि चिन्हाला धारण करणाऱ्या बाळस्वरूपानें प्रकट झाले; आणि त्यांस म्हणाले, 'तुम्हांस पूर्वी वर दिल्याप्रमाणें सांप्रत मी

तुमचा पुत्र झालों आहे; तथापि माझ्या अवतारकृत्याला अनुलक्षून आतां मला येथें राहतां येत नाहीं; भूलोकावर जंबुद्वीपस्थ भारतवर्षांतील माहिष्मती ( महेश्वर ) नामक नगरीच्या ठिकाणीं सांप्रत वरेण्य नांवाचा एक राजा राज्य करीत आहे; त्याची स्त्री ' राणी पुष्पिका ' सध्यांच प्रसूत झाली असून, तिचें मूल कोणा दुष्ट राक्षसीनें हरण करून नेलें आहे. प्रसूति वेदनामुळें बेशुद्ध झालेल्या तिला ही गोष्ट मुळींच कळलेली नाहीं; वरेण्य राजा फार मोठा अधिकारी असून, माझा भक्त आहे. त्यानें आपल्या पत्नीसहवर्तमान पूर्व जन्मामध्यें, पुष्कळ काळपर्यंत केवळ शुष्क अशा वृक्षपत्रांचेंच भक्षण करून, फारच कडकपणें माझें आराधन केलें असून, त्याजवर प्रसन्न होऊन ' मी तुझा पुत्र होऊन तुझ्यावर पूर्ण अनुग्रह करीन' असा वरही पण मी त्याला दिला आहे. त्या वरदानपूर्तीचा काळ सांप्रत प्राप्त झाला आहे. सिंदूरासुराचा नाश करून नृपश्रेष्ठ वरेण्यावर अनुग्रह करणें, हेंच या अवतारांतील मुख्य कार्य आहे ! तस्मात् आतां मला येथून उचलून, त्या पुष्पिकेच्या सूतिका–सदनांत तिच्या समीप फारच गुप्तपणें नेऊन ठेवा, म्हणजे राजपत्नी पुष्पिका व राजा वरेण्य हीं दोघें मला आपला पुत्र समजून–माझें संगोपन करतील व अशा रीतीनें सर्व कांहीं यथायोग्य होईल.' असें प्रभूंचें भाषण ऐकून शिवानें लागलीच नंदीच्या करवीं त्यांच्या आज्ञेप्रमाणें सर्व व्यवस्था करविली. त्यावेळीं पार्वतीला फारच दुःख झाले; परंतु शंकरानीं तिचें समाधान केलें. हा प्रभूचा अवतार ' गिरिजागर्भ–समुद्भव' म्हणून प्रसिद्ध असून तो पर्यली–काननामध्यें ( वैजनाथ–परळी म्हणून प्रसिद्ध असलेल्या ठिकाणीं ) झाला आहे. तें श्रीगणेशाचें एक प्रमुख क्षेत्र असून पुराणांत छप्पन्न क्षेत्रांमध्यें त्याचें परिगणन केलें आहे; असो !

शिवाच्या आज्ञेप्रमाणें नंदिकेश्वरानें त्या बालवेषधारी प्रभु गजाननाला वरेण्याच्या राजवाड्यांत नेऊन ठेविल्यानंतर थोड्याच वेळांत राजपत्नि पुष्पिका सावध झाली; आसपास जवळच असलेल्या तिच्या सख्याही तिच्या जवळ आल्या. आणि पाहतात तों महाराणीला पुत्ररत्न झालें आहे. त्यायोगानें त्यांना व राजपत्नीला मोठा आनंद झाला. परंतु तें बालक लोक-विलक्षण अशा गजवक्त्रादिकांनी युक्त आहे, असें लक्षांत येतांच त्यांना फारच आश्चर्य वाटलें व

भीति उत्पन्न झाली! राणीनें तर भीतीनें किंकाळीच फोडिली! अंतःपुरांत एकाएकी सुरू झालेला तो आकांत कानावर येतांच, राजा वरेण्य व त्याचे प्रधान वगैरे मंडळी त्याठिकाणीं आली. त्यांनीं तो एकंदर प्रकार पाहिला; परंतु त्याचा यथार्थ बोध कोणासच होईना! अगोदर जीवस्वभावाला अनुरूप असा मिथ्याभिमानरूप मोह व भीति, विकल्प इत्यादिकांचें साम्राज्य! आणि तशांत प्राकृत वेषधारी श्रीस्वानंदनाथाच्या मायेचें—त्यानें घातलेलें—आवरण यांच्या जबरदस्त प्रभावामुळें, एकाएकीं घडून आलेला तो प्रकार पाहून, राजा वरेण्य व त्याची ती प्रधान वगैरे सर्व मंडळी, अगदीं मूढ होऊन, त्यांना प्रभूचें स्वरूप मुळींच जाणतां आलें नाहीं! यांत कांहीं नवल नाहीं!! अनुकूल अशी कल्पना तर त्या कोणाच्या ठिकाणीं उद्भवली नाहींच; पण उलट 'हें कांहीं तरी भयंकर अरिष्ट आलें असून, तें सर्वस्वाच्या नाशालाच कारण होणारें आहे; कां कीं, असल्या विचित्र स्वरूपाचें मूल कोणाला कधीं झाल्याचें ऐकिवांतही नाहीं! ही फारच विलक्षण व विपरीत गोष्ट आहे;' अशीच सर्वांची समजूत झाली! आणि नंतर राजपुरोहित, मंत्री वगैरेंच्या अनुमतानें, 'या मुलाला कोठें तरी लांब फार भयंकर अशा अरण्यांत सोडून द्यावें,' असें ठरवून वरेण्यराजानें, आपल्या सेवकांना तशी आज्ञा केली. नंतर राजपत्नीचें सांत्वन करून राजा व सर्व मंडळी आपआपल्या ठिकाणीं निघून गेली. वरेण्य राजाच्या आज्ञेप्रमाणें राजदूतांनीं, त्या मुलाला—बालवेषधारी प्रभु गजाननाला—फार दूर अशा भयंकर अरण्यांत एका सरोवराच्या जवळ नेऊन ठेविलें; हेतु हा कीं, कोणीहि हिंस्र पशु पाणी पिण्याकरितां येतील, ते तात्काळ त्या मुलाला भक्षण करितील! दैवयोगाची गति आणि शुभाशुभ संस्कारांच्या परस्पर विरोधाची स्थिति, किती विलक्षण आहे, पहा! वरेण्यराजाच्या परम श्रेष्ठ अशा पूर्वपुण्याच्या प्रभावामुळें, श्रीगणनाथाच्या पूर्ण कृपाप्रसादाच्या प्राप्तीचा—साक्षात् फलरूप योग—अशा रीतीनें सहजासहजीं प्राप्त झाला असतां, त्याच्या उपभोगाचा काल अद्यापि आला नसल्यामुळें, तेवढीच संधि मिळून त्याच्या—अवशिष्ट अशा असत्संस्कारलेशांनीं व त्याच्या संगतीं असलेल्या इतर जनांच्याही असत्संस्कारांनीं, त्याच्या बुद्धीवर मोहाचें आवरण घालून, त्याला फार मोठें विघ्न केलें! हा कालमायाविलासच होय, आणि त्याला मूळकारणही पण प्रभु

मयूरेशाची इच्छाच होय ! ! कारण याच एका अवताराच्या मिषानें गाणपत-शिरोमणी जे 'पराशर' महामुनि, त्यांच्या इच्छेचीहि पूर्ति व्हावयाची होती ! केवळ स्वेच्छेनेंच अवतार धारण करणाऱ्या प्रभूचें हे लीलाविहारवैचित्र्यच आहे. भक्त लोकांच्या वासनापूर्तींचें मिष व दिव्य नियति यांचा आश्रय केवळ निमित्तमात्रच केला जात असतो, हेंच तथ्य एकंदरींत लक्षांत घेण्यासारखें आहे. अस्तु

राजदूतांनीं 'बालगजाननास' त्या अरण्यांत सोडून दिल्यानंतर, तेथून जवळच रहात असलेले 'पराशर' नामक महामुनि सरोवरावर आले असतां त्यांनीं त्या मुलाला पाहिलें. त्याबरोबर त्यांना पराकाष्ठेचा मोह उत्पन्न झाला. आणि श्रीगणेशाच्या कृपेनें त्यांना त्या बालगजाननाचें यथार्थ स्वरूपही पण कळून आलें. तेव्हां लागलीच त्याला उचलून घेऊन ते आपल्या आश्रमांत गेले आणि आपल्या 'वत्सला' नामक पत्नीच्या स्वाधीन करून ते तिला म्हणाले, 'श्रीस्वानंदनाथाच्या पूर्ण कृपेचें फल असें हें पुत्ररत्न आपल्यास फारच मोठ्या दैवयोगानें अगदीं सहज लाधलें आहे; हा प्रभूचा लीलावेषच आपल्या दिव्य अवताराची साक्ष पटवीत आहे; मोठ्या प्रेमानें व भक्तिबलानेंच आपण याचें संगोपन केलें पाहिजे' तें ऐकून त्यांच्या पत्नीलाही अत्यंत आनंद झाला, आणि मोठ्या वात्सल्यानेंच तिनें त्या बालप्रभूस आपल्या पोटाशी धरून स्तनपान दिलें. याप्रमाणें मुनिश्रेष्ठ पराशरांची पुत्रकामनारूप इच्छा पूर्ण झाली. मुनींच्या आश्रमामध्यें असतांना श्रीगजाननास मूषक वाहन प्राप्त झाले. कोणी क्रौंच नामा गंधर्व, भृगु महर्षींच्या अवमानामुळें व सौभरी महर्षींच्या पत्नीचा अभिलाष धरल्यानें, त्या उभयतांच्या शापाला पात्र होत्साता मूषकयोनीला प्राप्त झाला होता; द्वापार युगांतील श्रीगजानन अवताराच्या वेळीं तुझा उद्धार होईल, असा त्याला उःशाप होता. तोच क्रौंच गंधर्व भल्या मोठ्या मूषकाच्या रूपानें, पराशरांच्या आश्रमामध्यें इकडे तिकडे फिरून, सर्वत्र वस्तूंचा नाश करीत करीत फारच पीडा देऊं लागला. त्यायोगानें मुनिराज फारच त्रासून गेले, हें जाणून श्रीगजाननानें पाशाच्या सहाय्यानें त्या मूषकाला आपल्याजवळ खेंचून आणून, व त्याच्या सामर्थ्याचा गर्व नाहींसा करून त्याला आपलें वाहन केलें; 'मूषक' शब्द मिथ्या भासमान होणाऱ्या जीव-शिवादिरूप आत्मसत्तेचा वाचक असून, तिच्या व्यापकत्वरूप अथवा सर्वान्तर्यामित्वरूप विहाराचा तो निदर्शक आहे; गमनागमनादि

विहारशून्य अशा परब्रह्मस्वरूपाचा विश्वविलासरूप—व्यवहार, म्हणजे विश्वाच्या ठिकाणीं व ब्रह्माच्या ठिकाणीं नाना प्रकारच्या उपाधिरूपानें व्यापकत्वरूप—गमनागमनरूप-असा त्या शुद्ध ब्रह्मस्वरूपाचा विहार, त्या सर्वात्म-सत्तेच्या-मुळेंच होत असतो; म्हणून वेदांनीं साक्षात् ब्रह्मस्वरूप अशा गणेशाला 'मूषक वाहन' असें म्हटलें आहे. या विशिष्ट ऐश्वर्याचें निदर्शक असें मूषकवाहत्व—या प्रत्यक्ष ब्रह्मस्वरूप अवतारांत दर्शविलें आहे. परस्त्रीचा व त्यांतही गुरुवत् पूज्य अशा मुनींच्या पत्नीचा अभिलाष, म्हणजे आत्यंतिक कामवशत्वाचें व मोहमूढत्वाचेंच द्योतक आहे, तर गुरुजनांचा अपमान, ही अहंकार वशतेची परमावधि होय; सर्वस्वीं अधःपाताचेंच हें मूळकारण असून, जीवांच्या जीव-भावाचें—निदर्शन आहे; केवल निर्मोह अशा शिवात्मस्वरूपाला विसरून व परमात्मसत्तेच्या द्वारें सर्व विलास चालला असतां, त्याची प्रतारणा करून केवल मायामोहांत मग्न असणाऱ्या जीवभावाचीच ही निशाणी होय! आणि या एकंदर आत्मचौर्यरूपी महादोषाचा नाशही पुन्हा श्रीगणेशाच्याच सत्तेनें होणारा आहे! हेंच एकंदर तत्व या अवतारवैभवावरून स्पष्ट होतें!

अशा रीतीनें पराशर मुनींच्या आश्रमांत कांहीं काल गेल्यानंतर आपल्या वयाच्या चौथ्या वर्षीं, मूषकावर आरूढ होऊन, व मुनीची आज्ञा घेऊन, प्रभु गजानन 'सिंदूरासुरा-'च्या नगराला गेले, आणि त्यांनीं त्याचा नाश करून देवादिकांचें अपेक्षित पूर्ण केलें. सर्वत्र मोठा आनंदी आनंद होऊन राहिला. त्यावेळीं भूलोकांवर राज्य करीत असलेल्या प्रमुख राजांमध्यें प्रमुख असलेला, वरेण्यराजा त्याठिकाणीं आला, व त्यानें त्या प्रभूची यथायोग्य सांगोपांग पूजा केली; नंतर अखिल ब्रह्मांडालाही अजिंक्य असलेल्या त्या सिंदूरासुराच्या नाशामुळें प्रत्यक्ष प्रत्ययाला आलेलें, श्रीस्वानंदनथाचें तें दिव्य लीलावैभव जाणून, आणि लागलींच, विपरीत कल्पनांच्या भरीं भरून, केवळ मूढपणानें, ज्या बाळाचा आपण त्याग केला; तो बाळ दुसरा कोणी नसून, आपल्या भक्तिबळाचें फल देण्याकरितां, आणि बालवेषानें आपलें कोड पुरवि-ण्याकरितां आलेला—प्रत्यक्ष गणराज होय; हें पाहून तर तो—राजा वरेण्य—फारच खेद करूं लागला! आपल्या मूर्खपणाची परमावधीच झाली, असें वाटून, पश्चातापानें त्याचें अंतरंग जळूं लागलें; आणि त्याला आपल्या सर्व-

स्वतःचाच अगदीं तिटकारा आला ! तशा स्थितींतच श्रीगजाननाचे दोन्ही पाय घट्ट धरून, मोठ मोठ्यानें रुदन करीत करीत तो म्हणूं लागला ! ' देवाधिदेवा, गणनाथा ! काय हो माझें मूढत्व हें ! किती तरी मी अभागी ! खरोखर माझ्या दुर्दैवभोगाला सीमाच उरली नाहीं. देवा, या वृथा मायामोहानें मी सर्वस्वी नागवला गेलों कीं हो ! प्रत्यक्ष महनिधान, माझ्या घरीं अगदीं सहजा सहजीं आलें असतां, म्यां महामूढानें अगदां दूर लोटून दिलें ! नाथा, मी आपला भक्त म्हणवितों. आणि आपलें स्वरूप मला वळून येऊं नये ? केवढा हा जीवत्वाभिमान, आणि कसलें हें मायामोहवशत्व ! आणि हा एवढा प्रतिबंध तरी मला कशामुळें झाला बरें ? कीं, श्रीगणनाथाच्या–आपल्या–या लीलाविहाराच्या निदर्शनाचा योग, माझ्या पुत्रत्वाला येऊन, मला नाना प्रकारच्या बाललीलांनीं संतोषविण्याचा परम योग प्राप्त झाला असतां, त्याच्या उपभोगाला मीं सर्वथा पारखें व्हावें ? खरोखर, हा अंतस्ताप आतां माझ्यानें मुळींच सहन करवत नाहीं ! पण असा अधम, चाण्डाळ, पापी, दुर्मति मी अजून दग्ध कसा होऊन जात नाहीं, हें असलें अत्यंत पापसंस्कारी शरीर तरी आतां कशाकरितां टिकून राहावें ? आणि भगवन्, ' माझ्यावर आपण कृपानुग्रह करावा ! ' असें म्हणण्याचा अधिकार तरी आतां मला कुठें उरला आहे ? देवा, देवा काय करूं आतां ? पण कितीही काहीं असलें तरी, मज पाप्याची सर्वस्व गति पतितपावन समर्थ आपणच आहांत ! तेव्हां ' काहीं काल माझ्या संनिध राहून माझ्या पूजेचा स्वीकार करावा, आणि माझा अखिल मायामोह निरस्त व्हावा व वरील प्रकारच्या मूढत्वाचा प्रसंग मजवर कधीं सुद्धा येऊं नये, इतकेंच नव्हे, तर माझा जीवस्वभाव, शिवत्वभाव व साक्षीत्व भाव पूर्णपणें लीन होऊन, आपल्या परिपूर्ण स्वरूपामध्यें पूर्णयोगभावानें मीं लीन व्हावें; एवंच अशी पूर्णयोगसिद्धि मला मिळावी; या करितां कांहीं उपदेश करावा ' अशी या पामर दासाची प्रार्थना आहे; तेवढी पूर्ण करावीच '

सर्वथा अनुतप्त आशा वरेण्यराजाची ती व्याकुल स्थिति पाहून व त्याची प्रार्थना ऐकून, प्रभूंना मोठें कौतुक वाटलें व संतोष झाला ! ते त्याला म्हणाले; ' बा वरेण्या ! स्वस्थ हो; मायामोह विलासाचें प्रतिचित्र असलेल्या जीवभावाची ही रीति अगदीं स्वाभाविक आहे; तेवढ्या करितां इतका त्रागा करण्याचें किंवा इतकें उदास होण्याचें प्रयोजन काय ? सांप्रत तुला प्राप्त झालेली

स्व—स्थितीची जाणीव यथाकालच असून, योग्य आहे. शिवाय झालेला हा सर्व प्रकार माझ्या इच्छेनेंच घडून आलेला असल्यानें, तुला फारशी चिंता करण्याचें कारण नाहीं ! कां कीं, ही पूर्वीची नियतीच ठरलेली आहे ! पूर्वीं एका काळीं कोण्या एका विशेष प्रसंगानें, शिव, शक्ति, सूर्य व ब्रह्मदेव यांनीं एकाच वेळीं—मी त्यांचा पुत्र व्हावें अशी याचना केलेली होती—ती पूर्ण होण्याचा योग याच अवतार प्रसंगीं होता ! त्यांपैकीं शिव शक्तींची इच्छा पूर्ण झाल्याचें स्पष्टच आहे कर्मनिष्ठ पराशर मुनि हे ब्रह्मदेवाचे अंश असून, सांप्रत माझ्या दर्शन—पूजनादिकांनीं तुझ्या अविद्यबंधाचा—जीवत्वभावाचा नाश झाल्यानें, जीवात्म्याचें लक्ष्यभूत असलेला, जगदात्मा भास्कर, त्रिगुणाहंकृतिरूपी, व त्रिगुणाभेदात्मा असा हिरण्य पुरुष, आपल्या सूक्ष्मांशानें तुझ्या ठिकाणीं प्रविष्ट झाला आहे; म्हणूनच यावेळीं माझ्या पूर्ण स्वरूपाचा यथार्थ प्रकाश तुझ्या ठिकाणीं प्रतीत झाला आहे; पूर्व जन्मींच्या तुझ्या तपश्चरणानें, या अशा महद्योगाला अवश्य साधनीभूत असलेलें तुझें पात्रभूतत्व, सिद्धच होतें; परंतु कांहीं अवशिष्ट कर्मदोषामुळें, तुझे हें दुसरें जन्मधारण झाल्यानें, तें पात्रभूतत्व आजवर निरुद्ध होतें, तें माझ्या इच्छेला अनुसरून सूर्यानें तुझ्या ठिकाणीं प्रवेश केल्यामुळें आज प्रकट झालें ! सारांश अशा रीतीनें माझ्या पूर्ण कृपाप्रसादाला, व अर्थात् त्या कृपारूप महद्वीर्याला धारण करणारा त्याचें आश्रयभूत पात्र—अशा अर्थी 'वरेण्य' या अन्वर्थक अभिधानाला, तूं खचितच पात्र अधिकारी आहेस; आणि ही तुझी पत्नि 'पुष्पिका' सुद्धां तुझ्या साहचर्यानें, तशाच अधिकारानें संपन्न असून धर्म अर्थादि पुरुषार्थांचें पोषण करणारी अशा अर्थी 'पुष्पिका' या अन्वर्थक अभिधानानें प्रकृति-सिद्ध अशीच आहे; यांत संशय नाहीं ! तस्मात् अशा अधिकारसंपन्नतेला योग्य असा, श्रीयोगामृतशास्त्राचें रहस्यभूत अशा 'श्रीगणेशगीता' शास्त्राचा उपदेश सांप्रत मी तुला करीत आहे; त्याच्या मननादिकांनीं तूं पूर्णयोगसिद्धीला निश्चयानें प्राप्त होशील ! हें सत्य समज; आतां तुला कसलीच चिंता करण्याचें कारण नाहीं' असें सांगून श्रीगजाननांनीं वरेण्य राजाला यथाशास्त्र विधिपूर्वक श्रीगणेशगीतेचा उपदेश केला; अशा प्रकारची ही कथा पुराणप्रसिद्ध आहे. या कथेंतील एकंदर तत्व लक्ष्यांत घेतां, आणि यांतील ब्रह्मदेवाची स्थिती, सिं-

दू‍रची उत्पत्ति, त्याचें ब्रह्मांडविजयीत्व, शिव–शक्तींची इच्छा, पराशर मुनींचें निमित्तभूत पात्रत्व, आणि वरेण्यराजाची स्थिति, इत्यादि इत्यादि गोष्टींचें स्वरूप पाहिलें असतां श्रीगणेशगीतेच्या स्वरूपासंबंधीं, महत्त्वासंबंधीं, मूलभूतत्वासंबंधीं आणि वैशिष्ट्यासंबंधीं मुळींच संशय उरत नाहीं ! किंवा निराळें कांहीं लिहिण्याचेंही प्रयोजन उरत नाहीं. हें उघड आहे; एवढ्याकरितांच हा विशेष विस्तार–तत्त्वविशदीकरणपूर्वक केलेला आहे.

ही एकंदर कथा ब्रह्मदेवांकडून साम्र श्रवण करितांच ‘ चतुरानन देवेश कृपया परया वद । गीतां तां त्वं गणेशस्य सर्वज्ञानविनाशिनीम् ॥१॥’म्हणजे हे देवेशा ब्रह्मदेवा ! ती ( श्रीगजाननांनीं वरेण्य राजाला उपदेशिलेली ) अखिल अज्ञानाचा नाश करणारी श्रीगणेशगीता, आपण मला कृपा करून कथन करा !’ अशा प्रकारचा प्रश्न व्यासांनीं केलेला आहे. तो श्लोक त्या कथेच्या शेवटीं आध्यायाच्या समाप्तीला असून, व्यासांच्या प्रश्नाला अनुसरून, ब्रह्मदेवांनीं त्यांना सांगितलेली, ती श्रीगजाननप्रोक्त ‘ श्रीगणेशगीता, ’ त्याच्याच पुढील अध्यायापासून, त्यांत [ गणेशपुराणांत ] ग्रथित केलेली आहे. तात्पर्य श्रीमद्गणेशगीता, ही वेदव्यासानें, ब्रह्मदेवानें, किंवा विष्णूनेंही गणेशपुराण कथन करितांना रचिलेली नसून, ती गणेशपुराणाच्याही अगोदरची आहे; आणि गणेशपुराणाचा उपदेश करितांना त्यामध्यें, वरील कथाप्रसंगानें ती ग्रथित केली गेली आहे; हीच गोष्ट एकंदरीवरून सिद्ध होते. आणि मग ती श्रीगणेशगीता कोणी तरी रचिलेली असल्याची अथवा ती ‘ भगवद्गीतेची नक्कल ’ असल्याची नुसती शंका घेण्यास तरी जागा कुठें राहते ? तशा विपरीत शंकेंच तर राहोच, परंतु भगवद्गीतेशीं साम्यत्वानें तिची तुलना करणें, हें सुद्धां गौण आहे. श्रीगणेशगीतेचें मूलभूतत्व व पुरातनत्व तिच्या आरंभीच्या श्लोकांवरूनही पुन्हा चांगलेंच सिद्ध होत आहे. त्याकरितां ते श्लोक, भाष्य व टीका यांसह पुढें देऊन त्याचा क्रमशः विचार करूं ! व्यासांनीं केलेल्या वरील प्रश्नाला अनुसरून ब्रह्मदेव म्हणाले,

॥ क–उवाच ॥

‘ एवमेव पुरा पृष्टः शौनकेन महर्षिणा ।
स सूतः कथयामास गीतां व्यासमुखाच्छ्रुतां ॥ १ ॥

( ग. गी. अ. १ )

श्रीमद्गणेशगीतेवर श्रीगार्ग्य महर्षींचें फार मोठें भाष्य आहे. पुराणांत गार्ग्यमहर्षि मोठे तत्त्वज्ञ म्हणून प्रसिद्ध असून, श्रीमयूरेश अवतारांमध्यें प्रभूचे ते परमप्रिय मित्र होते; श्रीमयूरेशाच्या आज्ञेनेंच त्यांनीं श्रीगणेशगीतेवर आणि आणखी दुसऱ्या गणेश-तत्त्वग्रंथांवर यथार्थ हृद्यार्थाचा प्रकाश करणारीं भाष्यें रचिलीं आहेत. गणेशगीतेवरील त्यांचें भाष्य 'गार्ग्यभाष्य' म्हणून प्रसिद्ध आहे तसेंच या भाष्याचेंही आकलन अगदीं सुलभपणें व्हावें म्हणून श्रीमयूरेशाच्या आज्ञेनेंच श्रीमन्मुद्गलावतार, **श्रीमद्गणेशयोगीन्द्र** महाराज यांनीं, गार्ग्यभाष्यासह गणेशगीतेवर फारच मोठी ओवीबद्ध टीका, प्राकृत भाषेंत लिहिलेली आहे; ती '**श्रीयोगेश्वरी**' म्हणून प्रसिद्ध आहे. वरील श्लोकाचे व यापुढें दिल्या जाणाऱ्या श्लोकांचें तात्पर्य लक्षांत यावें म्हणून, त्यांवरील 'योगेश्वरी' टीका, व क्वचित् ठिकाणीं भाष्यही पुढें देत आहों. त्यावरून श्लोकांचें तात्पर्य पूर्णपणें लक्षांत येणारें असल्यानें, अर्थात् निराळ्या व्याख्यानाचें प्रयोजन नाहीं. उपर्युक्त श्लोकावरील श्रीयोगीन्द्रमहाराजांची टीका येणेंप्रमाणें आहे:—

**प्राकृत-टीका-ओंव्या** ॥ ब्रह्मा म्हणे ऐक व्यासा। ऐसेच पात्र झाले मुनीशा। गणेशपुराणदासा। ऐकोनि शौनकादिक ॥ ४४ ॥ कलियुगाचि प्राप्ति। जाणुनी ऋषिपती। सकळ मुनिसहिती। आले माझे जवळी ॥ ४५ ॥ स्तवोनि मज लागून। दोषखाणी कलियुग जाण। प्रकट झाला प्रमाण। कैसेनि मुनिधर्म राहति ॥ ४६ ॥ आमुचा बुडवील मुनिधर्म। त्याहूनि शरण ब्रह्मा। आलों तुमच्या पादपद्मा। कलिप्रवेशहीन कीजे ॥ ४७ ॥ जरि कलि करी प्रवेश। तरी विषय उठे चित्तास। मुनि म्हणती त्यांस। अभेदीं मनन जयाचें ॥ ४८ ॥ ऐकोनि त्यांची वाणी। म्यां सांगितला मुनि। शौनक ऐके ज्ञानी। नैमिषारण्यीं जावें ॥ ४९ ॥ तेथें नाहीं प्रबळ। कलीचें मंद बळ। नित्य पुराण निर्मळ। श्रवण कीजे ॥ ५० ॥ जेथें पुराणश्रवण। तेथें कलिप्रवेश जाण। करूं न शके निर्वाण। मुनिधर्म सदा राहिल ॥ ५१ ॥ म्यां मनोमय चक्र। सृजुनि दिल्हें मुनिवर। हच चक्र जेथें स्थिर। तेथें निमिषारण्य जाणा ॥५२॥ चक्राचे पाठीं ऋषी। चालिले सर्व प्रकाशी। चक्र स्थिर झालें भासी। नैमिषारण्यीं बैसलें ॥ ५३ ॥ तेथें सूत पुराणी। येता झाला महाज्ञानी। प्रार्थुनी

शौनक वाणी । वदता झाला तेधवां ॥ ५४ ॥ पुराण श्रवण सूत । नित्य कर-विजे पवित्र । महा पुण्यें म्हणत । दर्शन तुझें ॥ ५५ ॥ सूत पुराण सांगे । नित्य नानाविध चांगे । शौनकादि अंगी । ऐकोन पात्र जाले ॥ ५६ ॥ नाना अर्थे उद्धरून । ब्रह्मणस्पति त्याहून । त्याची गीता सांगा प्रमाण । प्राप्त शांति-योग कीजे ॥ ५७ ॥ ऐकूनि त्याची प्रार्थनता । सूत सांगतो तत्वता । पूर्ण गणेशगीता । तुझा शिष्योत्तम ॥ ५८ ॥ कल्पीं कल्पीं व्यास जाण । आणि सूत सदा निर्माण । कोण्ही कल्पाचा सज्जन । व्यासाचा तो शिष्य ॥ ५९ ॥ याचें नाम पुराण । हें पुरातन सर्वांहून । अनेक कल्प कथन । मागी-पुढीचें सांगत ॥ ६० ॥ जैसा म्हातारा मुलास । शंभर वर्षांची गोष्टी भास । एक समयीं सांगे रस । तैसें जाण पुराण ॥ ६१ ॥ तूं जी सांगशील । तुमचें तोंडहून प्रबल । पुराण निघाले निर्मल । त्याचा विचार सांगू ॥ ६२ ॥ पुराण पुरातन । प्रळयीं अंतरध्यान । होऊनि प्रलयादि जाण । प्रकाश स्वयें होतो ॥ ६३ ॥ वेद शास्त्रादिक । अक्षर ब्रह्मविवेक । क्षर माझा देह नेक । कैसे मजहून निर्माण ॥ ६४ ॥ ऐसें विधींचें वचन । व्यास पुसना झाला जाण । तेचि गीता श्रवण । व्यासाहून सूतें केली ॥ ६५ ॥ ऐकोनि व्यासाचें वचन । व्याससूत संवाद ज्ञान । प्रगट करितो आपण । ब्रह्मदेव स्वयें ॥ ६६ ॥ ( ओंवी संख्या ४३ )

सदरहु टीकेंत वरील श्लोकांचें तात्पर्य, श्रीमद्योगीन्द्रमहाराजांनीं असें सांगितलें आहे कीं, ब्रह्मदेवांनीं व्यासाच्या प्रश्नाला अनुसरून, 'असाच प्रश्न पूर्वी शौनक ऋषीनें सूतास केल्यावरून, व्यासमुखानें श्रवण केलेली गीता सूतानें त्याला सांगितली;' असें सांगून श्रीगणेशगीतेच्या उपदेशसंप्रदायाचें पुरातनत्व आदिकल्पद्धत्व, आणि पुराणांचें पुरातनत्व दर्शविलें आहे. भाष्यकारांनी सुद्धां अशा रीतीनें वरील श्लोकाच्या मिषानें गणेशगीतेच्या पुरातनत्वाचेंच निदर्शन केलें असल्याचें सांगितलें आहे. असो, त्यालाच धरून पुरातनभूत अशा व्याससूतसंवादाचें निमित्त धरून ब्रह्मदेव पुढें श्रीगणेशगीतेचा आरंभ होत असल्याचें व्यासाला सांगत आहेत.

( पूर्ण योगजिज्ञासु अशा सूताचा प्रश्न. )

'अष्टादश-पुराणोक्तममृतं प्राशितं मया ॥
ततोऽतिरसवत्पातुमिच्छाम्यमृतमुत्तमं ॥ २ ॥

येनामृतमयो भूत्वाऽ प्नुयां ब्रह्मामृतं यतः ॥
योगामृतं महाभाग तन्मे करुणया वद ॥ २ ॥
( ग. गी. अ. १ )

भाष्य=हे व्यास शृणु । सूतो व्यासं पृच्छति॥ भो भगवन्—अष्टादश पुराणोक्तं—कर्मोपासन ज्ञानयोगाः कथितास्ते श्रुताः । अमृतं—तदेव जन्ममृत्युनिकृंतनम् । मया प्राशितं—साधनमार्गेण प्रकृष्टेन अशितमिति । ततः—तस्मादष्टादश—पुराणोक्तात् । अतिरसवत्—अत्यंतरसरूपंफलमिव त्वचा—बीजभेदादिशून्यमित्यर्थः । उत्तमं—यस्मात्परतमं ब्रह्मनिरूपणं नास्ति तादृशं ब्राह्मणस्पत्यात्मकमित्यर्थः अमृतं—जन्ममृत्युभयहरं । पातुं—पानं कर्तुमिच्छामि । तत्कथ्यतामिति । ननु अष्टादश पुराणोक्तममृतं प्राशितं तेन सुखी भव । अत्यंत रसवदमृतेन किं भविष्यतीत्यत आह । येनेति ॥ २ ॥

' हे महाभाग । योगीन्द्र । येन—अमृतेन । अमृतमयस्तद्रूपः । यतः—यस्मादिहैव साधनभूम्यां जीवन्मुक्तो भूत्वा । देहान्ते-ब्रह्मामृतं-अभेदात्मकं । आप्नुयां—अहं च ब्रह्म चेति भिन्नतां निरस्य—एकरूपो भविष्यामीत्यर्थः । ननु वैष्णव-शैवादि पुराणेषु ब्रह्मनिरूपणं श्रुतं, तेन ब्रह्मरूपो न भविष्यति—किमनेनेत्यत आह । योगामृतं—योगो द्विविधः युज् समाधौ—युजिर् अयोगे चेति । संयोगायोगयोरभेदे पूर्णयोगः । अन्यच्च ब्रह्म नानाविधं वर्ण्यते, पात्रभेदतया, तदेव कथ्यते । अन्नं ब्रह्मेति व्यजानादित्यादि श्रुतिभ्यः । अतो योगः श्रेष्ठः । यदा अस्यापि कुत्रामीलन—मीलने-तदा योग इति नाम न संभवतीति । अतस्तदेव-अमृतं मयि करुणां कृत्वा वद-कथय इति ॥२॥

या दोनही श्लोकांवरील भाष्यार्थाचें पूर्ण स्पष्टीकरण करणारी श्रीयोगीन्द्रमहाराजांची ' योगीश्वरी ' नामक टीका अशी आहे:—**ओंवी टीका**—प्राकृत-सूत प्रश्न करितो । मी अठरा पुराणें म्हणतों । तुमच्या मुखांतूनि तत्त्वतों । श्रवण केलें व्यासदेवा ॥ ६७ ॥ त्यामध्यें अमृतरस । नाना वर्णन वेश । ऐकोनि सावकाश । साक्षात्कार पै केलें ॥ ६८ ॥ तेथें झालों तद्रूप । हेंच प्रकाशन स्वरूप । तेथें जालिया प्राप्त । तदपि विकार भासतो ॥ ६९ ॥ समाधि करितां मज । मन वाणी लीन साजे । त्याहुनी जग विराजे । नाना भाति जाण ॥ ७० ॥ चित्त-वृत्ति निरोध । तेथें होतो प्रसिद्ध । जगीं विलास सिद्ध । त्याहुनि शांति

हरिली ॥ ७१ ॥ हाचि वाटतो भेद । गौण जाणा हा अभेद । पूर्ण शांतिचा भेद । मी इच्छितों गुरुराया ॥ ७२ ॥ पूर्ण अभेद ब्रह्म । मज सांगावा त्याचा धर्म । तेथें अभेद हें वर्म । अमृत इच्छितों ॥ ७३ ॥ याहूनि नाहीं उत्तम । मज सांगावया ब्रह्म । ब्रह्मणस्पति धर्म । मजलागीं दीजे ॥ ७४ ॥ जैसें फळीं परिपूर्ण । रस भरला जाण । त्वचा बीजादिहीन । केवळ रसरूप । ॥ ७५ ॥ ऐसें अतिरसमय । मजला दीजे तन्मय । पान करूनि मी होय । तदाकार अमृतरूप ॥ ७६ ॥ सूत करी प्रार्थना । अति आदरें जाणा । दाखवावया कारणा । दुसरा श्लोक आरंभिला ॥ ७७ ॥ सूत म्हणे व्यासासी । विष्णुरूप तुम्हांसी । सर्व म्हणती प्रकाशी । वेदव्यास तुम्हीं ॥ ७८ ॥ सकल ज्ञानाची खाणी । तुम्हीं भिन्न केली वाणी । वेद पुराण प्रमाणीं । सुगम केली ॥ ७९ ॥ गणेश भक्तराज । हृदयीं पूर्ण विराजे । गणेश तुझे महाराज । याहुनि तुम्हीं महाभाग ॥ ८० ॥ भाग्य याहुनि जाणा । अधिक नाहीं प्रमाणा । मला सांग योगज्ञाना । कृपा करूनियां ॥ ८१ ॥ जेणेंकरून देहधारी । मीच करूनि साधन भारी । याच देहीं साक्षात्कारी । शांतियोग प्रगटील ॥ ८२ ॥ तेथें तन्मय होऊन । जीवन्मुक्त होऊं पूर्ण । शांतियोगीं तन्मयपण । योगीपद मज द्यावें ॥ ८३ ॥ योगामृतें ब्रह्म जाण । मरणीं मीच पूर्ण । अभेद योगरूपपण । होईन खरा स्वामी ॥ ८४ ॥ योगरूप ब्रह्मणस्पती । तेथें सकलाची योग गती । त्याचा योग कोठें नाहीं म्हणती । हेंचि योगामृत कथिलें ॥ ८५ ॥ त्याचा योग मला । सांगावा पूर्ण भला । करुणा करूनि कला । दीनाचा उद्धार कीजे ॥ ८६ ॥ मज जवळी काय । तुम्हांसी संतोष गाय । करील ऐसा संचय । आहे जी तुम्हांस द्यावें ॥ ८७ ॥ केवळ करुणा करून । मज उद्धरीजे पूर्ण । आतां बोलावें योगज्ञान । गुरुराजा तारका ॥ ८८ ॥ सूताची प्रार्थना ऐकून । व्यास गुरु दया करून । संवाद प्रगट करिती पूर्ण । गजानन वरेण्याचा ॥ ८९ ॥ इति—

श्रीगजाननांनीं वरेण्याला श्रीगणेशगीतेचा उपदेश केला, तो कशा रीतीनें केला व त्याचें साकल्यस्वरूप काय आहे, हें जाणण्याच्या लालसेनें व्यासांनीं, गणेशपुराण श्रवण करितां करितां प्रश्न केल्यावरून, ब्रह्मदेवांनीं श्रीगणेशगीतेचें पुरातनत्व प्रकटन करण्याकरितां, पुरातन कालीं घडलेल्या व्यास सूत संवादाचा निर्देश करून, ती ( श्रीगणेशगीता ) सांगण्याचा उपक्रम केला. त्या

९१९५६ ९६६० प्रबंध ९६६६०

संवादाच्या आरंभीं सूतानें केलेल्या प्रश्नाचें स्वरूप वरील दोन श्लोकांत आलेलें असून, त्यांच्या जिज्ञासेचें प्रबुद्धत्व, श्रवणाविषयींची व त्यांतील अर्थाविषयींची प्रतिज्ञा, फलाकांक्षेचा निश्चय आणि श्रद्धाभक्तिप्रणति इत्यादि प्रश्नधर्मांचा अतिशय इत्यादि इत्यादि गोष्टींचें निदर्शनही पण स्पष्ट व पूर्ण झालेलें आहे, असें दिसून येतें. भाष्यकार व टीकाकारांनींही ही गोष्ट स्पष्ट केलेली आहे. तसेंच श्रीगणेशगीतेचें अनुबंधचतुष्टय या श्लोकांनीं दिग्दर्शित होत असून, सामान्यतः एवढ्या चांचणीवरूनच गणेशगीता व भगवद्गीता यांतील विशेष अंतर [ आरंभीं सांगितल्याप्रमाणें एक ज्ञानाचा आरंभ, तर दुसरी ज्ञान-विज्ञानरूप पूर्णयोगसिद्धीचें परमावसान-असें ] सहज लक्षांत येतें. असो, आतां वरील श्लोकार्थाचें सरळ तात्पर्य पाहूं. सूत म्हणतात, हे महाभाग, सद्गुरो महर्षिश्रेष्ठा व्यासा ! आतांपर्यंत मीं आपणांकडून अठरा पुराणें, अशी अखिल पुराणविद्या श्रवण केली; त्यांतील अर्थांचें मनन करून निदिध्यासनानें ज्ञानाचा साक्षात्कारही संपादन केला; परंतु पूर्ण शांतीचें शाश्वत समाधान प्राप्त झालें, असें वाटत नाहीं ! कां कीं, यद्यपि त्या निरनिराळ्या पुराणांतून भिन्न भिन्न उपाधींच्या आश्रयानें आलेलें ब्रह्मनिरूपण-ब्रह्मज्ञान, आणि त्याच्या सिद्धीकरितां उपदेशिलेलीं कर्म-उपासना-ज्ञानयोगादि साधनें, यांचें यथायोग्य अवलंबन करून, मी पूर्ण सिद्धीला प्राप्त झालों आहें; अशा रीतीनें सर्वथा अशाश्वत, अनित्य अतएव मृतरूप असलेल्या मिथ्या मायाविलासापासून पूर्णपणें मुक्त होऊन, त्या ब्रह्मज्ञानाच्या बलानें, मी केवळ अमृतरूप अशा परम वस्तूला-परब्रह्माला प्राप्त झालों आहें; म्हणजे त्या ब्रह्मामृताचें मी प्राशन केलें आहें; आणि अर्थात् मला तद्रूपत्व-तन्मयत्व अमृतमयत्व प्राप्त झाल्यासारखें आहे, माझा भिन्न-भावरूप-मायात्मक अहंभाव नष्ट झाला आहे. तथापि ज्या उपाधींच्या आश्रयानें ही पूर्णसिद्धि, ब्रह्माभेदस्थिति, उपाधिराहित्य, प्राप्त झालेलें आहे, त्या उपाधींचें भान तशा अभेद स्थितींत केवळ साक्षीत्वाला अनुसरून पूर्वसंस्कारांचा शेष-केवळ आभासमात्र-असा उरत असल्यानें, म्हणजे तन्मयत्वरूप उपाधि निःशेष नष्ट होत नसल्यानें, ती ब्रह्माभेदस्थिति—त्या भिन्न भिन्न प्रकारच्या ज्ञानामृताच्या प्राशनानें प्राप्त झालेलें अमृतत्व-पूर्ण शांतीला-योगशांतीला-परम शाश्वत अशा कैवल्यसिद्धीला देणारें नाहीं ! हेंच स्पष्टपणें माझ्या

प्रत्ययाला येत-आहे; आणि तें युक्तच आहे. कारण मन आणि वाणी यांना सर्वथा अग्राह्य व अगम्य असलेल्या ब्रह्माची सिद्धि तसल्याच उपाधींच्या अवलंबना-वांचून मिळणें शक्य नाहीं; आणि एकंदर ज्ञानसिद्धिसाधक साधनांची व्यवस्थाहि या नियमाला अनुसरून असल्याचेंच सर्वत्र दिसून येतें; अर्थात् उपाधिरहि-त्याकरितां म्हणूनच स्वीकारिलेला उपाधींचा आश्रय, परिणामीं अंशतः तरी प्रतिबंधक झाल्या वांचून राहात नाहीं, हें उघड आहे.

तथापि या उपाधींच्या आश्रयांमध्यें सुद्धां मायांशाच्या आधिक्यामुळें किंवा न्यूनत्वामुळें गौण-अगौण इत्यादि प्रकार असले पाहिजेत; आणि त्यांना अनु-समरून त्या अमृतत्व सिद्धींतही वरील प्रकारच्या प्रतिबंधांना मिळणारा अ-वकाश कमी अधीक प्रमाणांत मिळत असला पाहिजे, किंबहुना क्वचित कांहीं उपाधींच्या आश्रयानें प्राप्त झालेल्या पूर्ण स्थितींत -ब्रह्माभेदसिद्धीच्या प्राप्तीनंतर त्या उपाधी साहजिकपणेंच अगदीं निःशेष निरस्त होऊन वरील प्रतिबंधांना मुळींच अवकाश मिळणार नाहीं ! असेंही असलें पाहिजे असें वाटतें; तस्मात् अशा प्रकारचें परम श्रेष्ठ ब्रह्मज्ञान, पूर्ण व शाश्वत शांतीचें साधन असें, साध्य व साधन या दोन्ही दृष्टीनें केवळ अमृतरूप असलेलें, ब्रह्मामृत श्रवण करावें त्याचें प्राशन करावें, अशी माझी इच्छा आहे; सारांश आतांपर्यंत अष्टादशा-दि पुराणांतून श्रवणादि द्वारा संपादिलेलें ब्रह्मज्ञान, अर्थात् अशा रीतीनें प्राशन केलेले तें अमृत, वर सांगितलेल्या गौणत्वानें परिपूर्ण असून प्रतिबंधानें युक्त आहे; तस्मात् तशा गौणत्वाचा अणुमात्र अंशही ज्यामध्यें नाहीं, किंवा जेथें कसलाच प्रतिबंध उरत नाहीं, असें अत्यंत श्रेष्ठ ब्रह्मज्ञान, कीं ज्यापेक्षां श्रेष्ठ ब्रह्मनिरूपण असणें शक्य नाहीं, असें केवळ रसरूप ब्रह्मामृत, प्राशन करावें असें मी इच्छितों; अशा प्रकारची सूताची प्रार्थना असल्याचें भाष्यकार व टीकाकार सांगत असून, तिचें विशेष स्पष्टीकरण, त्यांनीं फळाचें उदाहरण देऊन केलें आहे. जसें एकादें फळ रसानें परिपूर्ण भरलेलें असें केवळ रसरूप असल्याचेंच वर्णिलें जातें; पण त्या रसरूपत्वामध्यें त्वचा, बीजादिरूप किंवा माधुर्य, आर्द्रता, आणि वर्णवत्त्व इत्यादिरूप उपाधींचा आश्रय नित्य असतो. अर्थात् त्या रसाचा आस्वाद घेतांना वरील उपाधींचा स्वीकार साहजिकपणें केला जातो—करावाच लागतो; आणि रसग्रहणानंतर त्या उपाधि टाकून द्याव्या

लागतात, टाकून दिल्या जातात, किंवा सहज निरस्त होतात; असा नियम आहे. म्हणजे त्या फळाच्या रसरूपत्वामध्यें त्वचा बीजादिरूप उपाधींच्या आश्रयानें असलेलें रसरूपत्व एका प्रकारचें असून, यांत त्या उपाधींचा त्याग करावा लागतो, आणि त्वचा बीजादिवर्जित पण माधुर्यादि उपाधींच्या आश्रयानें असलेलें केवळ रसरूपत्व दुसऱ्या प्रकारचें असतें, त्यांत त्या उपाधि सहजच निरस्त होत असतात; असाच प्रकार ब्रह्मामृतासंबंधें असून सामान्य रसरूप असलेल्या ब्रह्मामृताहून अत्यंत श्रेष्ठ असें-केवळ रसरूप-ब्रह्मामृत प्राशन करण्याची माझी इच्छा आहे; हें तथ्य आहे. सारांश ' अतिरसवत् ' पदानें या दुसऱ्या प्रकाराचा निर्देश केलेला असून आतांपर्यंत श्रवण केलेलें ब्रह्मज्ञानरूपी अमृत पहिल्या प्रकारासारखें उपाधींनीं युक्त असें सामान्य रसयुक्त असल्यानें त्याहून श्रेष्ठ, अर्थात गौण उपाधींचा आश्रय जेथें केला जात नाहीं, असें दुसऱ्या प्रकारासारखें ' अतिरसवत '–केवळ रसरूपच असें ब्रह्मामृत प्राशन करावें; असें सूताच्या प्रश्नाचें विशेष तात्पर्य उदाहरणानें स्पष्ट केलें गेलें आहे. अस्तु !

अशा रीतीनें पहिल्या श्लोकांत प्रश्नाच्या मिषानें आपल्या जिज्ञासेचें यथार्थ स्वरूप व्यक्त करून, त्यांतील निश्चितार्थ आदरानें पुन्हां स्पष्ट करण्याकरितां आणि ती जिज्ञासा केवळ गुरुबलामुळेंच परिपूर्ण शांत होणारी आहे, हें दर्शविण्याकरितां सूतांनीं पुढील दुसऱ्या श्लोकांनीं प्रार्थना केली आहे; कीं ' हे महाभाग सर्वज्ञा गुरुवर्या ! मी प्रार्थना केल्याप्रमाणें आतां मला अतिश्रेष्ठ असें तेंच ब्रह्मज्ञान कथन करा कीं, ज्याच्या परिपूर्ण साधनानें मी जीवन्मुक्त होत्साता पूर्ण ब्रह्माभेद-सिद्धीला प्राप्त होईन; म्हणजे कसल्याच उपाधीचा प्रतिबंध मला केव्हांही प्राप्त होणार नाहीं; इतकेंच नव्हे तर तन्मयत्वरूप उपाधींसुद्धा सर्वथा लीन होऊन ' अहं ब्रह्मास्मि ' रूप भानही पूर्णपणें विरून जाईल; सारांश असें पूर्णस्वरूप ब्रह्मामृत मला कथन करा ! असें हें ब्रह्मामृत म्हणजे योगामृतच होय; कारण या अखिल विश्वप्रपंचाला अधिष्ठानभूत असलेलें परब्रह्म, नाना प्रकाच्या उपाधींच्या आश्रयानें पुष्कळ प्रकारांनीं वेदांनी वर्णिलेलें असून, त्या ब्रह्मविहारांना मूलभूत असलेलें त्यांच्या संयोगाभेदरूप उपाधींनेंच केवळ प्रतीत होणारें पूर्ण ब्रह्म-संयोगसत्ता धारण करणारें

ब्रह्म ' ब्रह्मणस्पति ' या अन्वर्थक संज्ञेनें युक्त असें–योगरूपानें वर्णिलें आहे; अध्यारोपात्मक अशी ती संयोगरूप उपाधि संयोग सत्तेच्या प्रत्ययानंतर सहज निरस्त होत असून तिच्याच आश्रयानें असलेली अपवादात्मक अशी अयोगरूप उपाधीहि पण तिजबरोबरच लीन होते; आणि केवळ पूर्ण ब्रह्माचा–भूमा स्वरूपाचाच–प्रत्यय येतो असा नियम आहे. सारांश अशा रीतीनें तें योग ब्रह्मच संयोगायोगाभेदरूप अशा पूर्ण योगाचें–भूमा ब्रह्मस्वरूपाचेंच वाचक ठरतें ! तस्मात् असें तें योगामृत ब्राह्मणस्पत्यात्मक ज्ञान देणारें असें अमृत, मला कृपा करून कथन करा ! ' असें दुसऱ्या श्लोकांतील सूताच्या प्रार्थनेचें तात्पर्य आहे. अशी प्रार्थना श्रवण करून, अधिकारसंपन्न व पूर्णयोगेप्सु अशा सूतांच्या त्या प्रतिज्ञायुक्त प्रश्नाला अनुसरून, श्री वेदव्यास म्हणाले;

व्यास उवाच ॥ अथ गीतां प्रवक्ष्यामि योगमार्ग प्रकाशिनीम् ।
नियुक्ता पृच्छते सूत राज्ञे गजमुखेन या ॥ ४ ॥

[ ग. गी. अ. १ ]

**श्रीमद्गार्ग्य-भाष्य**—सूतप्रश्नं श्रुत्वा विचारतं । नाना ब्रह्म साक्षात्कारं-कृतं, ब्राह्मणस्पत्यात्मके ब्रह्मणि अधिकारी । आत्यं ब्रह्म तदेव कथयामीत्युवाच अथेति–अथेत्यनंतरम् । हे सूत योगमार्ग–प्रकाशिनीम्–जगतां ब्रह्मणां स्वस्व. रूपाणां योगानां च यत्रैव योगस्तदेव योगः । आत्यं ब्रह्म–तस्य च नाना योगानां च मार्गः–साधनभूमिः । क्रमेण भूमिं च योगं च प्रकाशयतीति–तां गीतां वक्ष्यामि वक्ष्यमाणरीत्या कथयामीति । कीदृशी–या गजमुखेन–' गज ' शब्देनोंकारः कथ्यते वेदेषु । तदेव मुखं यस्येति । सगुण गणेशस्वरूपं ॐ कारात्मकमपि । तदेव कथ्यते–गाणेशे ' तथाप्युपासनासक्तैः सगुणं तन्निरूप्यते । ॐ काररूपी भगवान्यो वेदादौ प्रतिष्ठित ' इति ॥ अन्यच्च ' मध्ये नारायणमुखो दक्षिणे च शिवाननः । वामे ब्रह्ममुखोऽनंते पद्मासनकृतो विभुरिति ' ॥ अकारोकार मकारात्मको देह ॐकारमुखो गणेश इति । वेदशास्त्र–पुराणादीन्योंकारोद्भवानि तदेवमुखं यस्येति–तेन गजमुखेन पृच्छते–पृच्छां कुर्वते । राज्ञे–सर्व मार्गेषु दीप्यमानाय । नियुक्ता–स्नेहेन कथितेति । ननु ' **गजानेन** ' राज्ञे कथं कथिता–तदेव कथय '–अतो गजानन वरेण्य संवादं प्रकटयन्नाह विघ्नेश्वर इति ॥ ४ ॥

**श्रीमद्योगीश्वरी–टीका** ॥ व्यास म्हणे ऐक सूता । शांतियोगरूप तत्वतां । गणेश जाणावा स्वतां । त्याचें वर्णन आगाध ॥ ९० ॥ साक्षात् गणेशाविण । कोण समर्थ जाण । प्रकाश करावया प्रमाण । निश्चय सांगतों ॥ ९१ ॥ माहिष्मती नगरी । तेथें वरेण्य राज्य करी । महा परम तत्परीं । गणेशीं परिपूर्ण ॥ ९२ ॥ तेणें पूर्व जन्मीं जाण । स्त्रीपुरुष दोघीं प्रमाण । वडाचे शुष्क पर्णें । भक्षूनी तप केलें ॥ ९३ ॥ देवाचीं सहस्र वर्षें । हृदयीं धरिला गणेश । मग प्रत्यक्ष झाला त्यांस । वर मागा बोलिला ॥ ९४ ॥ ऐकोनि देवाचें वचन । वर मागते जाले पूर्ण । तूंच पुत्र आमुचा प्रमाण । होईजे स्वामी ॥ ९५ ॥ वर देऊनि गणेश । गेला स्वानंद–भुवनास । स्त्रीपुरुष दोघास । लौकर मरण प्राप्त झाले ॥ ९६ ॥ तोच झाला **वरेण्य** । माहिष्मतीचा राजा पूर्ण । त्याची स्त्री **पुष्पिका** प्रमाण । नामें प्रगटली ॥ ९७ ॥ धर्म अर्थ काम मोक्ष । ब्रह्मभूत प्रत्यक्ष । पोषण करीती अध्यक्ष । याहून पुष्पिका नाम ॥ ९८ ॥ सकळाहूनि नर । थोर जाणावा तर । जया देहानें पर । सकळ साधनाचें पात्र ॥ ९९ ॥ त्याहूनि थोर ब्राह्मण । त्याहून विद्याधारी जाण । थोर तपस्वी त्याहून । स्वधर्मपर सदा ॥ २०० ॥ त्याहुनि थोर ज्ञानी । ज्ञानचक्षु प्रमाणी । अंतरीं प्रगटले जनीं । जडोन्मत्त अवस्थाधारी ॥ १ ॥ त्याहूनि थोर योगी । जो ब्रह्मभूत पद भोगी । त्याहूनि थोर ब्रह्मभूतीं सांगी । जो ब्रह्मणस्पति इच्छितो ॥ २ ॥ थोराचें नाम वरेण्य । थोर दुजा नाहीं त्याहून । गणेशभक्त पूर्ण । याहून वरेण्य नाम ॥ ३ ॥ त्याचा पुत्र गजानन । प्रगट झाला पूर्ण । सिंदूरासुर वधून । स्वानंदीं जाऊं लागला ॥ ४ ॥ सिंदूर चांगलें जाण । त्याच्या देहाचा सुवास पूर्ण । वासना जाणावी अज्ञान । जेणें होती स्वानंदीं विरस ॥ ५ ॥ गणेशभक्ती करून । वासना सिंदूर मारून । तरी गोड लागे ज्ञान । शांतियोगीं रुचि उठे ॥ ६ ॥ सिंदूर वधाचे पुढें । वरेण्य चरणीं पडे । गणेश शांतियोग घडे । ऐसे मजला कीजे ॥ ७ ॥ मी तुझा दास गणेशा । तूं पुत्र झालासी ब्रह्मेशा । तुझे आई बाप योगेशा । काय जन्म मरण त्यांस ॥ ८ ॥ हेच लाज तुजला । अयश पडतो डोळा । शांति योग मजला । उपदेश कीजे ॥ ९ ॥ स्वयें स्वामी गजानन । ब्राह्मणस्पति महिमान । सांगता जाला प्रमाण । योगमय पूर्ण ॥ १० ॥ गणेशानें केलें गान । स्वकीय अभेद भान । तेथें योग साधून । योगरूप होती

॥ ११ ॥ गणेशाचें गान । **गणेशगीता** प्रमाण । नाम जालें परिपूर्ण । जाणे सूता सर्वथा ॥ १२ ॥ तीच गीता सांगतो । जीनें सकल म्हणतो । योग मार्ग प्रकटतो । नाना ब्रह्म अभेद ॥१३॥ ऐकून सूत बोले । कैसेनि गीता सांगितलें। गणेशानें योग प्रकटले । वरेण्या प्रति ॥ १४ ॥ ऐकोन सूत वचन । व्यास प्रकट करी जाण । गजानन वरेण्य । संवाद परिपूर्ण ॥१५॥ इति ॥

सदरील भाष्य व टीका यांवरून श्लोकार्थाचें स्पष्टीकरण अगदीं परिपूर्ण झालेलें आहे. सूताचा विशिष्ट जिज्ञासायुक्त प्रश्न श्रवण केल्यानंतर, वेदांमध्यें नाना प्रकारांनीं वर्णिलेल्या ब्रह्मांचा परिपूर्ण साक्षात्कार केल्यानंतरच कोणीही साधक पूर्ण ब्रह्माच्या-सर्वश्रेष्ठ अशा योगब्रह्माच्या साक्षात्काराविषयीं अत्यंत उत्सुक होत्साता, त्या साक्षात्काराला-अर्थात ब्राम्हणस्पत्यात्मक ब्रह्मज्ञानाच्या साक्षात्काराला-पूर्ण योगशांतीच्या सिद्धीला पात्र होत असतो; असा नियम असल्यानें, सूताचा प्रश्न तशाच अधिकाराचा द्योतक आहे, हें जाणून व्यास म्हणाले ‘ सूता तुझ्या प्रश्नाला अनुसरून परम श्रेष्ठ असें ‘ योगामृत ’ च मीं तुला आतां कथन करितों; कीं ज्याच्या यथायोग्य सेवनानें तूं पूर्णयोग सिद्धीला-कैवल्य सिद्धीला-शाश्वत शांतीला प्राप्त होशील ! तें योगामृत अखिल ज्ञानघन व पूर्णयोगस्वरूप अशा गणेशाकडूनच प्रत्यक्ष प्रकट झाल्यानें ‘ गणेशगीता ’ या नांवानें प्रसिद्ध आहे; सारांश सगुण-निर्गुणादि भेदांनीं प्रत्ययाला येणारा जो अखिल ब्रह्मविलास, त्याचा-म्हणजे विश्वगत सगुण ब्रह्मांचा-अतएव जगतांचा, त्याला आधारभूत असलेल्या निर्गुण विलासांचा अतएव ब्रह्मांचा, त्यांच्या संयोगांचा-अतएव स्वस्वरूपांचा, आणि स्वस्वरूप लीन भावाचा अतएव अयोगांचा, जो योग-पूर्ण अभेद-केवलीभाव, तोच योग शब्दाचें पूर्ण लक्ष्य आहे; तेंच अंतिम ब्रह्म-परब्रह्म-भूमास्वरूप होय; त्याचा-त्या पूर्ण योगस्वरूपाचा व सगुण-निर्गुणादि नानाविध योगरूपांचा मार्ग-साधनभूमि; आणि तसेंच परम साध्य असें जें पूर्णयोगब्रह्म; त्या सर्वांचा क्रमानें प्रकाश करणारी अशी ही ‘ श्रीगणेशगीता ’ मी तुला आतां यथायोग्य क्रमानें कथन करणार आहे; जीं गणेशगीता पूर्वी श्रीगजाननानें परम श्रेष्ठ पात्रभूत अशा वरेण्य-राजाला, त्यानें प्रश्न केल्यावरून, मोठ्या स्नेहानें कथन केली आहे. ‘ गज ’ ही संज्ञा ॐ कारास असल्याचें वेदांनी वर्णिलें आहे.

तेंच ज्याचें मुख आहे, तो परमात्मा ‘ गजमुख ’ होय; गणेशाचें सगुण स्वरूप ॐकार असल्याचें पुराणांतहि वर्णिलें आहे. जगत्कारण परंब्रह्मच, केवळ विश्वाधिष्ठानरूप उपाधीमुळें, सगुणत्वाला प्राप्त झालेलें, ॐ काररूपानें वेदादिकांमध्यें प्रतिष्ठित असून, निर्गुणसिद्धीच्या प्राप्तीकरितां, ब्रह्मभावसिद्धीकरितां, उपास्य असल्याचें वर्णिलें आहे. तोच गणेश होय; अकार, उकार मकाररूप ब्रह्म–विष्णु–शिवांच्या मुखांनीं युक्त असल्याचें त्याचें एक स्वरूप वर्णिलेलें असल्यामुळेंही त्याचा देह त्रिगुणाभेदस्वरूप असून, पूर्ण अभेद असें ॐकार हें त्याचें मुख असल्याचें सिद्ध आहे. तसेंच वेद–शास्त्र–पुराणादिकांची उत्पत्ति ॐ कारापासूनच असल्याचें सिद्ध असल्यानें त्या सर्वांचे मूळही गणेशच होय; सारांश अशा एकंदर शब्दार्थ सत्तेनें परिपूर्ण युक्त असलेल्या ‘ गजमुख ’ संज्ञाधारी प्रभु–सकल योगस्वरूप–अशा श्रीगणेशाकडूनच, परम श्रेष्ठ पात्रभूतत्वाचें द्योतक अशा ‘ वरेण्य ’ संज्ञक राजाच्या ठिकाणीं, प्रकाशित झालेलें हें परमश्रेष्ठ योगामृत, म्हणजेच ‘ श्रीगणेशगीता ’ जशा रीतीनें उपदेशिली गेली आहे; वरेण्य राजाच्या प्रश्नाला अनुसरून ज्या क्रमानें श्रीगजाननानें तिचा उपदेश केला आहे, त्याच क्रमानें म्हणजे श्रीगजानन वरेण्य–संवादाला धरून, सांप्रत मी तुला कथन करीत आहे; असें सांगून व्यास महर्षि, त्या गजानन–वरेण्य संवादरूप गणेशगीतेला प्रत्यक्ष आरंभ करीत आहेत. श्रीगजाननाच्या अवतार–धारणासंबंधीं आणि राजा वरेण्याच्या श्रेष्ठतम पात्रभूतत्वासंबंधीं वगैरे टीकेंत आलेल्या उल्लेखाचें विशेष विवरण मागें केलेंच आहे. एवंच आरंभींच्या या प्रास्ताविक श्लोकांवरून गणेश गीतेंतील मुख्य प्रतिपाद्य विषयाचें स्वरूप चांगलें लक्ष्यांत येत असून, त्याला अनुसरूनच, राजा वरेण्याचा मूळ प्रश्न व त्यावरील श्रीगजाननाचें उत्तर, हीं असल्याचें पुढील दोन श्लोकांवरून दिसून येतें; ते दोनही श्लोक व त्यांवरील श्रीयोगीश्वरी टीका पुढें दिली आहे. भाष्याचें पूर्ण स्पष्टीकरण टीकेवरून होत असल्यानें भाष्य दिलें नाहीं.

॥ वरेण्य उवाच ॥

विघ्नेश्वर महाबाहो सर्वविद्या–विशारद ॥
सर्व शास्त्रार्थ–तत्त्वज्ञ योगं मे वक्तुमर्हसि ॥ ५–१ ॥

**टीका**—वरेण्य म्हणे स्वामी । तूंच सकल सर्मी । भुक्ति मुक्ति नरक धर्मी। जनांसि देतो ॥२१७॥ शिव विष्णु सूर्य शक्ति । यास जरी गर्वाची उत्पत्ति । तरी आम्ही ब्रह्म गति । आम्हांहूनि अधिक नाहीं ॥१७॥ ऐसे गर्वी विघ्नहर । तूंच होतो सर्व सत्ताधार । पदभ्रष्ट होते पर । मग तुला ध्यानीं धरिते ॥१८॥ त्यांस ब्रह्मणस्पति ज्ञान । द्यावया विघ्न दावितो जाण । मग तूंच होतो पूर्ण । विघ्नहर स्वामी ॥ १९ ॥ सकल होती मनोरथ । त्याच्या पदाची प्राप्ति समर्थ। ब्रह्मसुख पदार्थ । सकल सुलभ त्यांस ॥ २० ॥ त्यांची भक्ति धरून । आदि-पूज्य झाला जाण । आदि पूजिला तुला पूर्ण । तरी त्यांस स्वसुख ॥ २१ ॥ त्याचे भक्त जन जरी । आदि तुला पूजिती परी । मग आपुला देव तरी । त्यांसि भुक्ति मुक्ति ब्रह्मसुख ॥ २२ ॥ नाहीं पूजिला आदि । भक्तीमध्यें विघ्न सर्वादि । न होय सिद्धि कधीं । सिद्धिपतीविण ॥ २३ ॥ याहून तूं विघ्नेश्वर। विघ्नहीन मज कर । तेणें भुक्ति मुक्ति ब्रह्म पर। सुलभ जाला ॥ २४ ॥ जेथें असेल तुझा भक्त । दुश्चित त्याला जाणत । स्वानंद लोकाहून हात । काढूनि सुखी करितो ॥ २५ ॥ याहून तूं महाबाहो जाण । तुझ्या बाहु—बळसमान । नाहीं कोठें प्रमाण । मला रक्षिजे ॥ २६ ॥ विधीहून ज्ञान सर्व । इहलोक पर लोकभव । ब्रह्मभूत योग प्रभव । जाणावा सर्वथा ॥ २७ ॥ याहुनि तुझें नाम । सर्व विद्याविशारद धाम । नाना योगमार्ग सक्ष्म । मला प्रकाशिजे ॥ २८ ॥ शास्त्रार्थानें प्राप्त होती । गुरु—आत्मप्रतीती । विश्वास ब्रह्मभूतीं । आणि स्वर्ग नरकादि जगीं ॥ २९ ॥ याहून तूं मजला । योगीं नाना भ्रांतिकला । निवारूनि दयाळा । ब्रह्मभूत प्रतीति दीजे ॥ ३० ॥ तुझें पडलें नाम जाण। सर्वशास्त्रार्थ तत्वज्ञ पूर्ण । तुजविण नाहीं दुजा पूर्ण । मजला तारिजे ॥ ३१ ॥ पूर्ण तुझें स्वरूप । तेथें अभेदरूप । मज करी तद्रूप । ऐसा योग सांगिजे ॥ ३२ ॥ तसा साधीन मीच । तुझे ठायीं योगरूप साच । मानिजे माझे वाच । मी होईन गजानन ॥ ३३ ॥ ऐकोन वरेण्याची । विनंति गजानन साची । बोलतां झाला पूर्ण वाची । उद्धाराया सकलांस ॥ ३४ ॥ इति—

या श्लोकांत वरेण्यराजानें मोठ्या भक्तिभावानें श्रीगणेशाचें ज्येष्ठराजत्व, आदिपूज्यत्व, व विघ्नेशत्व वर्णन करून, ‘सर्वश्रेष्ठ अशा योगाचें कथन कर-

ण्या विषयीं सर्वज्ञ असे आपणच परम समर्थ आहांत; तर कृपा करून तो योगच मला कथन करा!' अशी त्याची प्रार्थना केली आहे.

॥ श्रीगजानन उवाच ॥

सम्यग् व्यवसिता राजन् मतिस्तेऽनुग्रहान्मम ॥
शृणु गीतां प्रवक्ष्यामि योगामृतमयीं नृप ॥ ६-१ ॥

**टीका**—गजानन म्हणे वरेण्या। पुष्पिकापति तूं जाणा। पुत्र झालों मज भक्तिपणा। सांगतो मी तुज ॥ २३५ ॥ धर्म अर्थ काम मोक्ष। ब्रह्मभूत साधन प्रत्यक्ष। सदा करिती देख। साधिती समर्थ पुष्पिका ॥ ३६ ॥ तूंच तसा अनुकूल। नाहीं इच्छितो विषयफल। यालागी तुज सकल। मी प्राप्त करीन ॥ ३७ ॥ योगसाधनानुकूल। देहरूप पुष्पिका सबळ। तिचा अभिमानी पति बळ। ज्यास योगवासना तो वरेण्य ॥ ३८ ॥ माझे अनुग्रहें करून। तुझी बुद्धि झाली पावन। तीनें विचार केला पूर्ण। जग नेश्वर देखिलें ॥ ३९ ॥ उत्पत्ति नाशयुक्त। जग अवघे म्हणत। पाहुनि सारासार गत। निश्चय झाला ॥ ४० ॥ मद्रूपीं एक भाव। इच्छिती बुद्धि स्वभाव। हेंच जाणावा प्रभाव। माझी प्रसन्नतेचा ॥ ४१ ॥ एक गीता सार। सकळ शास्त्रांचें पर। गीताहुनि सर्व शास्त्र। उत्पन्न जाण ॥ ४२ ॥ सकल शास्त्राचे ठायीं। अभेद ब्रह्म पाही। गीतास्वरूप ध्यायी। जेथें ब्रह्मणस्पतीचा वास ॥ ४३ ॥ स्थूल सूक्ष्मादि साधन। क्रमें क्रमें प्रगटे ज्ञान। नाना ब्रह्मीं अभेद पण। योगामृत जाणावें ॥४४॥ नाना ब्रह्मांचा भेदयोग। जेथें अभेद सांग। पावेल तोच पूर्ण योग। तुज बा कळलें ॥ ४५ ॥ ज्याहून जग ब्रह्म। निर्माण जाले परम। त्याला वेद सांगे वर्म। गज अभिधान ॥ ४६ ॥ त्याची जाण नक्कल। हस्तीचें नाम प्रबळ। मनवाणीहीन अस्सल। आकारास्तव नक्कल केली मान्य ॥ ४७ ॥ याहुन मी गजवदन। तुला सांगतों प्रमाण। हेंच माझे देहाचें ध्यान। सदा धरावें ॥ ४८ ॥ तेणें सकल सुलभ। तुला प्राप्त होईल दुर्लभ। पूर्ण योगरूप गाभ। चिंताहीन व्हावें ॥ ४९ ॥ सावध करूनि मन। एक संयोग सांगू जाण। गणेशगीता महिमान। वरेण्या चित्तीं धरिजे ॥ २५० ॥ योग शब्दाचा अर्थ। प्रगटास्तव समर्थ। नाना योग शब्द पथ मोडायास्तव श्लोकारंभ ॥ २५१ ॥ इति ॥

वरेण्य राजाच्या प्रश्नाला अनुसरून या दुसऱ्या श्लोकांत श्रीगजाननांनीं त्याला सांगितलें कीं, ‘ राजा! तुझा हा प्रश्न फारच योग्य असून, तुझ्या सर्वश्रेष्ठ पात्रभूतत्वाचेंच तें लक्षण आहे; तुझी ही पत्नीही पण तुला सर्वथा अनुकूल असल्यानें तूं परिपूर्ण अधिकार संपन्न आहेस. हें सर्व माझ्या पूर्ण कृपाप्रसादाचेंच फळ आहे. त्यामुळेंच तुला सर्व कांहीं अगदीं तुच्छ वाटत असून, केवळ सर्वश्रेष्ठ असें माझें पूर्ण योगस्वरूपच सर्वथा तुला प्रिय वाटत आहे. माझ्या प्रसन्नतेची हीच खूण आहे. तस्मात् आतां सर्वशास्त्र सारभूत व सर्व शास्त्रांनाही मूळ अशी योगामृतमयी ‘ श्रीगणेशगीता ’ मीं तुला कथन करितो; ती तूं सावधान पणें श्रवण कर! ’

अशा रीतीनें या ‘ श्रीगणेशगीता ’ शास्त्रास प्रारंभ झाला असून, पुढें क्रमानें ७ ते १२ श्लोकांत शैव, वैष्णव इत्यादि नानाविध योगांचें निरसन करून १३ ते १९ श्लोकांत पूर्णयोगाचें धारण करणाऱ्या योगीन्द्रांची स्थिती वर्णिली आहे. २० व्या श्लोकांत पुढें सांगितल्या जाणाऱ्या योगाचें फल सांगून, २१ व्या श्लोकांत त्याच–अनुत्तम अशा–पूर्व प्रतिज्ञात पूर्णयोगाचें स्वरूप सांगितलें आहे. पुढें२२ ते २४ या तीन श्लोकांत त्याच्या त्रिविध स्वरूपाचें स्पष्टीकरण करून, नंतर अध्यायाच्या समाप्तीपर्यंत त्याचेंच अन्वय–व्यतिरेकात्मक विवरण केलें गेलें आहे. दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या अध्यायांत क्रमानें भवप्रत्ययान्तर्गत समाधि चतुष्टयाचें स्वरूप सांगितलें असून, पांचव्या अध्यायांत भवप्रत्यय व उपायप्रत्यय यांहून अतीत, म्हणजे संप्रज्ञात व असंप्रज्ञात या समाधिभेदांहूनही विलक्षण, अशा पूर्णयोगाचें–शांतित्रयातीत अशा पूर्ण योगशांतीचें–उपपादन केलें आहे याप्रमाणें एका पासून पांचव्या अध्यायाच्या शेवटापर्यंत मुख्य प्रतिपाद्य अशा पूर्ण योगाचें स्वरूप व त्याच्या अनुभव–भूमिकांची स्थिति, यांचें विवरण केलेलें असून, त्यापुढील ६ ते ११ अध्यायांत त्याच्या साधनभूमिकांचें स्पष्टीकरण केलें आहे. तात्पर्य पूर्णयोग म्हणजे **ब्राह्मणस्पत्यात्मक योग,** सर्वाभेद स्वरूप असा भूमाब्रह्मयोग हा या गीतेचा मुख्य विषय असून, **ब्रह्मभावासिद्धि** हें तिचें प्रयोजन आहे. या गीतेंत सोपानभूतत्वानें वर्णिलेल्या भवप्रत्ययान्तर्गत असत्, सत्, सम व सहज या स्वानन्दपाद चतुष्टयाचेंच वर्णन अनुक्रमें देवीगीता, सूर्यगीता, विष्णुगीता, आणि शिवगीता, यांत आ-

लेलें आहे, किंबहुना विद्या-अविद्यादि तीनही पादांत वर्णिलेल्या व पूर्णशांति-सिध्यर्थ सोपानरूप असलेल्या या प्रमुख चार भेदांपैकीं एक एका भेदाच्या विस्ताराकरितां, आणि त्याच्या परिपूर्ण सिद्धीला अत्यंत आवश्यक म्हणूनच, या चारही गीता पूर्वोत्तर भेदानें प्रवृत्त झाल्या आहेत. अर्थातच पूर्ण योगाचें प्रतिपादन करणारी ही श्रीगणेशगीता सर्वभेद प्रतिपादक व सर्व प्रकारच्या भेदांना म्हणजे सर्व गीतांना मूळभूत असल्यामुळें तिच्यामध्यें साहजिकपणेंच सर्वसिद्धांतरूप अशा पूर्णयोगाच्या अनुषंगानें त्या गीतांचें प्रमेय आलें आहे; हें उघड आहे ! सारांश श्रीगणेशगीतेंतील मुख्य प्रतिपाद्य विषयाचें मूळ स्वरूप असें सर्व श्रेष्ठ व परिपूर्ण या दृष्टीनें अगदीं अपूर्व असेंच असल्यानें ती श्रीगणेशगीता वरील चारही गीतांपैकी एकाद्या गीतेचें अनुकरण असल्याचें तर राहोच, पण ती त्यांच्यांशी साम्य असल्याची नुसती शंका सुद्धा संभवत नाहीं ! हें या एकंदरीवरून स्पष्टपणें सिद्ध होत आहे; तशी शंका उत्पन्न होणें, किंवा कुठल्या तरी एकाद्या कारणाभासामुळें तशी भ्रामक समजूत असणें, हें श्रीगणेशगीतेच्या मुख्य व मूळ स्वरूपाचा गंधही नसल्याचेंच द्योतक आहे. ही गोष्ट लक्ष्यांत घेऊन, श्रीगणेशगीतेंतील मुख्य विषयाची दिशा समजण्याकरितां येथवर इतका विस्तार केला आहे. अस्तु ! तर वरील चारही गीतांची प्रवृत्ति एकेका तत्त्वाचें प्रतिपादन करण्यासाठीं झाली असून, श्रीगणेशगीतेची प्रवृत्ति त्या संपूर्ण तत्त्वांचें-पूर्ण योगाचें-प्रतिपादन करण्यासाठीं झाली आहे; ही स्पष्ट सिद्ध झालेली गोष्टही पुन्हां त्या गीतांचा शास्त्रीय संप्रदायानें व सूक्ष्मदृष्टीनें विचार करणाऱ्यांच्या ध्यानांत सहज येण्यासारखी आहे. आतां असा विचार करणें झाल्यास सर्व गीताग्रंथाचीच तुलना करावयास हवी ! परंतु ती येथें शक्य नाहीं, आणी मुख्य मुद्दा आतां पर्यंतच्या विवेचनावरून स्पष्ट झालेलाच आहे म्हणून तिचें प्रयोजनही नाहीं; तथापि मुख्य प्रतिपाद्य विषयां संबंधें श्रीगणेश गीता व श्रीभगवद्गीता यांचें स्वरूप काय आहे; हें थोडक्यांत दर्शवून हा लेख आटोपतां घेऊं !

श्रीभगवद्गीतेंतील मुख्य प्रतिपाद्य विषयास दुसऱ्या अध्यायापासून सुरवात झाली असून, पुढील तीन अध्यायांत अधिकारपरत्वें त्यामध्यें उपस्थित होणाऱ्या पक्षभेदांचें स्वरूप कथन केलें आहे; आणि सहाव्या अध्यायांत पुन्हां

त्या मुख्य प्रतिपाद्याचा अभ्यास सांगितला असून, त्याच्या साक्षात्काराचें पूर्ण फल सांगून समाप्ति [ पूर्णता ] दर्शविली आहे. हें त्या अध्यायांतील पुढें दिलेल्या श्लोकावरून आणि त्यावरील भाष्यावरून लक्ष्यांत येण्यासारखें आहे.

यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति ॥
तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ॥ ३० ॥
( भ. गी. अ. ६ )

श्रीमच्छांकर भाष्य--यो मां पश्यति वासुदेवं सर्वात्मानं–सर्वत्र–सर्वेषु भूतेषु–सर्वंच–ब्रह्मादिभूत–जातं–मयि–सर्वात्मनि पश्यति । तस्य–एवं आत्मैकत्व–दर्शिनः–अहं–ईश्वरो न प्रणश्यामि--न परोक्षतां गमिष्यामि–स च मे न प्रणश्यति–स च विद्वान्–मम वासुदेवस्य न प्रणश्यति–न परोक्षीभवतितस्य च–मम चैकात्मत्वात् स्वात्माहि नाम आत्मनः प्रिय एव भवति । यस्माच्चाहमेव सर्वात्मैकत्वदर्शी ॥ ३० ॥

**भाष्यार्थ**—मज वासुदेवाला म्हणजे सर्वात्म्याला जो सर्व भूतांच्या ठिकाणीं पाहतो, आणि जो आब्रह्मपर्यंत सर्व भूतें मज सर्वात्म्यांमध्यें पाहतो; तो आत्मैकत्वदर्शी होय. अशा आत्मैकत्वदर्शी ज्ञान्याला मी कधीं नाहींसा होत नाहीं, व तो ज्ञानी मज वासुदेवाच्या दृष्टि आड कधीं होत नाहीं. कारण तो व मी कधीं भिन्न नसून एकच आहों; आणि आपला आत्मा आपल्याला प्रिय असतोच; इत्यादि! म्हणजे सर्वोपाधिभूत असत् भाव–नामरूपात्मक विश्वप्रपंच आणि सर्वाधारभूत सत् भाव–अखिल विश्वप्रपंचाला अधारभूत असलेला आत्मभाव, या दोहोंनाही मूळ कारणभूत अशा ब्रह्माच्या–सम ब्रह्माच्या साक्षात्काराचें स्वरूप, याठिकाणीं दर्शविलें असून, त्याचें पूर्ण फल दर्शविलें आहे. सारांश सर्व संयोगरूप–स्वस्वरूप समाधिरूप स्वानंद ब्रह्माच्या असदादि चार पादांपैकीं सत् व असत् या दोहोंच्या ठिकाणीं सम भावानें स्थित असलेल्या व दोहोंनाही मूलाधारभूत अशा सम ब्रह्माच्या ठिकाणीं प्राप्त होणाऱ्या समाधीचे अभेदभावाचें–समब्रह्मसाक्षात्काराचेंच हें स्वरूप होय! वैष्णव मार्गाच्या सिद्धांत ग्रथांमधून याचेंच मुख्यत्वें करून वर्णन आलेलें असून, स्वानंदपादगत ' समब्रह्म' हेंच वैष्णव ब्रह्म असल्यानें. अशा प्रकारें येथें वैष्णव ब्रह्माच्या साक्षात्काराचें फल सांगितलें आहे, असें भगवान् श्रीमद्भगवत्पाद शंकराचार्यांनींहीं याच

५१९५८ ९८८० विविध

अध्यायाच्या ३१ व्या श्लोकावरील भाष्यात 'मयि वैष्णवे परमे पदे वर्तते' या शब्दांनी स्पष्ट सांगितलें आहे.

एवंच यावरून असें ठरतें कीं पूर्णाद्वैत–साक्षात्काराच्या सिध्दीला अत्यंत अवश्य साधक असे संप्रज्ञात–असंप्रज्ञात समाधि भेद व त्यांतील भवप्रत्यय व उपाय-प्रत्ययरूप असंप्रज्ञात समाधीचे भेद, जे वेदांतग्रंथांतून वर्णिलेले आहेत; त्यापैकीं भवप्रत्ययरूप असंप्रज्ञात समाधीच्या एका भेदाचें, ह्मणजे स्वानंदब्रह्मपादाच्या एका अंशाचें–सम ब्रह्माचें प्रतिपादन भगवद्गीतेंत आलेलें आहे, ह्मणून सम–ब्रह्मसाक्षात्काराची साधक व समब्रह्मप्रतिपादक अशी श्रीभगवद्गीता, 'सम ब्रह्म' ही संज्ञा वैष्णव ब्रह्माला असल्यानें वैष्णवसिद्धांतांत परिगणित केली आहे; असाच प्रकार इतर शिव–शक्ति–सूर्य–ब्रह्म–प्रतिपादक गीतांविषयींही समजावा; आणि श्रीगणेशगीतेंत मात्र वरील भवप्रत्यय-समाधिच्या चारही भेदांचें व यांच्या संयोगाचें, ह्मणजे पूर्ण भवप्रत्ययरूप असंप्रज्ञात समाधिभेदाचें विवरण आलें आहे. इतकेंच नव्हे तर, उपायप्रत्ययरूप असंप्रज्ञात समाधिभेदाचें व त्यांच्या–द्विविध असंप्रज्ञाताच्या पूर्ण योगाचेंहि प्रतिपादन, तिच्यांत आलेलें असल्यानें, ती श्रीगणेश गीता पूर्णयोग प्रतिपादक व सर्व सिद्धांतमूलभूत अशी आहे. ही गोष्ट श्रीगणेशगीतेच्या पांचव्या अध्यायांतील, पुढें दिलेल्या श्लोकांवरून व त्यांवरील भाष्यावरून स्पष्टपणें लक्ष्यांत येणारी आहे; त्यांत पूर्णयोग–साक्षात्काराचें–स्वरूप व फल सांगितलेलें आहे. ते श्लोक असे.—

एवं कुर्वन् सदा योगी परां निर्वृत्तिमृच्छति ॥
विश्वस्मिन् निजमात्मानं विश्वं च स्वात्मनीक्षते ॥ १५ ॥
योगेन यो मामुपैति तमुपैम्यहमादरात् ॥
मोचयामि न मुंचामि तमहं मां स न त्यजेत् ॥ १६ ॥

(ग. गी. अ. ५)

(या श्लोकांवर, विषयानुरोधानें मुख्य विषयाचें–प्रतिपादन करणारें असें, भगवन् श्रीगार्ग्य महर्षींचें फार मोठें भाष्य आहे; तें सर्वच येथें देतां येत नाहीं, व त्याचें प्रयोजनही नाहीं; म्हणून त्यापैकीं 'श्रीगणेशगीता ही पूर्णयोगाची, म्हणजे भगवद्गीतेंतील प्रतिपादन ज्याचा एक अंश आहे,

अशा अंशीरूप पूर्ण विषयाची प्रतिपादक कशी आहे' एवढ्या मुद्यापुरतेंच भाष्य, संग्रहानें येथें दिलें आहे. )

**श्रीमद्गार्ग्य–भाष्य**—हे नृप ! शृणु योगी एवं सदा कुर्वन् सन् परां निर्वृत्तिमृच्छतीति । निर्वृत्तिं संयोगरूपां—सदा संकल्पत्यागे चतुर्भूमिहीनं मनो भवति तेन भेदाभेदानामेकभावात्मिनका परेति । विश्वस्मिन्निजमात्मानमीक्षत इति—यद्यच्चतुर्विधं तदेव विश्वं—तत्र निजमात्मानं—स्वस्वरूपमीक्षते—अवलोकयति । तेन विश्वं—स्वस्वरूपं भासत इति । च विश्वं स्वात्मनि ईक्षते—स्वस्वरूपात्मकं विश्वं भिन्नं भिन्नं तदेव स्वस्वरूपिणि एकभावं प्राप्नोति इति । तत्रायं विवेकः । योगश्चित्तवृत्तिनिरोध इति । तत्र आदावेव जागृदभिमानात्मकं स्वस्वरूपं—त्वंपदरूपं विश्वाख्यमिति । तेन पुनः स्वस्वरूपप्राप्त्यर्थं तपः कृतं—तुष्टेन स्वस्वरूपेण दर्शनं दत्तं । तदा तस्य कृपया ज्ञानचक्षुः प्राप्तं । तेन दृष्टं सूक्ष्मात्सूक्ष्मतमं स्वस्वरूपं-सकलमन्नानामभेदरूपमिति । एवं क्रमेण तपसा प्राप्तेन तत्तद्रूपचक्षुषा—प्राण मनो विज्ञानमानंदचैतन्य–चिदादि बोधान्तं केवल स्वसुखात्मकं च स्वस्वरूपं—तत्तद्ब्रह्मात्मकं दृष्टं । तेषां तेषामभेदरूपमिति । तत्र तदात्मकं ब्रह्म भिन्नं स्वस्वसुखात्मकं भिन्नं । तदेव विक्रियादर्शनं—तत्र भिन्नभानाधारेण तदात्मकं ज्ञानं तिष्ठतीति । अतस्तदात्मकं भिन्नं ब्रह्मसुखं भिन्नमतस्तदेव त्यक्तव्यमिति । ततः स्वानन्दात्मकं पूर्णं स्वस्वरूपं दृष्टं निज चक्षुषेति सकल स्वानन्दानामभेदरूपमिति । अत्र चित्तवृत्तिर्ज्ञानचक्षुरूपा पूर्णा समाधिस्था भवतीति । तेन चित्तं च चित्तवृत्तिश्च चित्त-चित्तवृत्तिधारकश्च ज्ञानचक्षुश्चज्ञानचक्षुर्दाता च इत्यादि सर्वं स्वानंदे ह्यभेदरूपतया एकभावं प्राप्तमिति । अतः परं—ब्रह्मैकभावसंयोगात्मकः समाधिर्वा किंचिदपि प्रकारांतरं च नास्तीति ।

योगवासिष्ठादि प्रारभ्य सकल शास्त्र-पुराणेतिहासादिषु च एतावत्पर्यंतं ब्रह्मभूतत्वमिति तेषु निर्वृत्ति रूपं चित्तं—वृत्तिरहितं वा साधनसमाधिरहितं च—संयोगपर्यंत तदेव परात्परतमा निवृत्तिरिति तत्र ब्रह्मप्राप्तिर्महा कठिना-तदर्थं नाना शास्त्रादिकं क्रमार्थं—नाना ब्रह्मनिरूपणं नाना मार्गेण ब्रह्मभूतत्वं कथ्यत इति। तत्र न्यायशास्त्रं चैतन्य ब्रह्मपर्यंतं—तदेव सकल-स्थूल-सूक्ष्मादि देहानामभेदरूपं ब्रह्मभूतत्वमिति । वैशेषिकं शून्यात्मकं-चिद्ब्रह्मपर्यंत शास्त्रं । तदेव सकल जीवात्मपरमात्मादि ह्यसुरूपाणामभेदरूपं ब्रह्मभूतत्वमिति । तत्र धर्मशास्त्रं ज्ञानात्मक ब्रह्म-

पर्यंतं–तदेव सकल बोधानां जगज्जगदात्मादीनामभेदरूपं ब्रह्मभूतत्वमिति । तत्र सांख्यशास्त्रं केवल स्वसुखात्मक–ब्रह्मपर्यंत–तदेव स्वमहिम्न स्थितानां सदा केवलानामभेदरूपं ब्रह्मभूतत्वमिति । तत्र मीमांसा शास्त्रं स्वस्वरूपपर्यंतं ब्रह्मबोधकं –तदेव सकल संयोगसमाधीनामभेदरूपं ब्रह्मभूतत्वमिति । वेदोपनिषदः पातं-जलं पूर्णयोगवाचकं तदेवाग्रे कथयिष्य इति । एवं नाना पुराणेतिहासादि क्रमार्थं भिन्नभिन्नात्मक ब्रह्मप्राप्त्यर्थं चेति । तत्र शिव-विष्णु–सूर्य–शक्तीनां–ब्रह्मभूतत्वं तदेव स्वस्वरूपपर्यंतमिति । तत्र विधिः–असत्–स्वत उथानात्मकं शाक्तं बोध-रूपमिति । सत्–स्वत उत्थानात्मकं सौरं बोधरूपमिति । सम–स्वत उत्थानात्मकं वैष्णवं बोधरूपमिति । नेति–स्वत उत्थानात्मकं शैवं बोधरूपमिति । अभेद–स्वत उत्थानात्मकं गाणेशं बोधरूपमिति । तद्वदसत्सत्समनेत्यभेदात्मकं परत उत्था-नात्मकं-केवलं स्वमहिम्नि स्थितं शाक्त-सौर-वैष्णव-शैव-गाणेशात्मकरूप-मिति । तद्वदसत्सत्समनेत्यभेदात्मकं पूर्णं स्वस्वरूपं स्वानंदरूपं गाणेशात्मक-रूपमिति । तत्र विष्णुगीतायां–‘ नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ’ इत्यादि । प्रारंभे ह्युभयाभेदात्मकं वैष्णवं ब्रह्म–तत्रैवायं मुख्यः श्लोकः–अस्यार्थं संपूर्णागीतेति । अंतेऽपि ‘ यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति । तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यतीति ’ । चतुर्भूमिरूपं वर्णितं पश्चाद्ब्रह्मभूतत्वं –‘ सर्वं मयि मां सर्वत्र समे भिन्नो न–अहं तस्य भिन्नो न ’–समाप्तिर्जातेति । तद्वत् शिव-सूर्य-शक्तीनामपि–ग्रंथ बाहुल्यभयान्नलिख्यत इति । अतः संयोग-पर्यंतं सर्वेषां ब्रह्मभूतत्वं–गणेशस्य भिन्नं–‘ विश्वं मयि मां विश्वस्मिन् ’ कथितं –पश्चात् योगेनेति श्लोकारंभात्–तत्र समाप्तिश्च ब्रह्मभूतत्वदर्शनादिति । पूर्णब्रह्म-भूतार्थं–वर्ण्यते–योगेनेति ॥ १५ ॥ ( अर्धे पहिल्या श्लोकावरील भाष्य असून दुसऱ्या श्लोकावरील भाष्याचा संग्रह पुढील प्रमाणें आहे. )

हे भूप, शृणु ! यो–योगी योगेन इति–( यावर आरंभींच फार विस्तृत असलेल्या भाष्यांत, अयोगाचें म्हणजे उपायप्रत्ययरूप असंप्रज्ञात समाधीचें विवरण केलें असून, त्याच्या सिद्धीनें प्राप्त होणारी जी स्वस्वरूप–लीनभाव –स्थिति, तीच पहिल्या श्लोकांतील निर्वृत्ति होय; म्हणजे त्या श्लोकावरील भाष्यांत जें पूर्णसंयोगस्वरूप अशा भवप्रत्ययसमाधीचें–स्वस्वरूपाभेदसिद्धीचें

स्वस्वानंदसमाधीचें स्वरूप कथन केलें आहे; आणि जें सर्वांच्या ब्रह्मभूतत्वाचें पूर्णरूप असून, जेथें सर्वांच्याच परिपूर्ण सिद्धीची समाप्ति दर्शविली आहे; असा जो तो भवप्रत्ययरूप समाधि अथवा स्वस्वरूपाभेदसिद्धि तिचाही परिपूर्ण लीन-भाव, अतएव त्या भवप्रत्ययाचा नाश, म्हणजेच—भवाच्या नाशाच्या नाशाचा उपाय—या अर्थीं उपाय—प्रत्ययरूप समाधि, अर्थात् पूर्ण निर्वृत्तिस्वरूप होय; असें सांगून—अशा रीतीनें श्रीगणेशगीतोक्त पूर्णयोगसाधनांनीं सिद्ध झालेला असा योगी—त्या पूर्ण निर्वृत्तीला प्राप्त होत्साता, म्हणजे स्वस्वरूपाभेदसिद्धि व तन्मयत्वलीनभावसिद्धि यांनीं युक्त होत्साता, एवंच पूर्ण भवप्रत्यय व उपा-यप्रत्यय या द्विविध समाधिबलानें सिद्ध होसाता, असा तो योगी पूर्णयोगाच्या समाधिसिद्धीनें ज्या ब्रह्मभूतत्वाला प्राप्त होत असतो, तेंच पूर्ण ब्रह्मभूतत्व गाणेश—ब्रह्मभूतत्व असून, वेदोपनिषदांतून—वर्णिलेलें ब्रह्मभूतत्व अथवा बृह-दारण्य—प्रभृति उपनिषदांतून मुनित्वादि स्वरूपांनीं सांगितलेल्या सर्व स्थितींच्या पर्यवसानीं सांगितलेली पूर्ण ब्रह्मभावसिद्धि, हीच होय; असें पुढील भाष्यांत पूर्ण स्पष्ट केलें आहे, तेवढ्यापुरतें भाष्य पुढें दिलें आहे:—)

तत्र यस्माद्भवस्तस्याभावात् साक्षात् मुनिस्वरूपं ब्रह्मभूतत्वमिति । भवप्रत्यय-नाशाय उपायत्वात्-उपायप्रत्यय इति । विषयेभ्यो ब्रह्मभ्यो योगसमाधिभ्य इत्यादि निर्वृत्तिं प्राप्तत्वादयोगरूपा निर्वृत्तिःकथ्यत इति । तत्र सकलायोगानामभेदरूपं ब्रह्मभूतत्वं । तत्र नाना ब्रह्मणामभेदात्मकं ब्राह्मणस्पत्यात्मकं-वेदेषु तदेव गाणेशं ब्रह्मभूतत्वमिति । तत्र गणेशगीताप्रारंभे-शिवे विष्णाविति श्लोके चतुर्णामभेदरूपं योगात्मकं, पंचमं ' सम्यक् ' शब्देन पूर्णस्वानंदस्वरूपं, तत्र द्वितीय ' योग ' पदेन सम्यगित्ययोगात्मकं, अयोगसंयोगादि ह्यभेदे ' मम मतोयोग ' इति । अंते च ' विश्वं मयि मां च विश्वस्मिन् ' कथयित्वा ' योगेने'ति श्लोकारंभे समाप्तिः कृतेति । तत्र सकलयोगानामभेदात्मकेन-**योगेने**तिपंचविध—चित्तवृ-त्तिनिरोधात्मकेनेति । **मां**-योगरूपं ब्रह्मणस्पतिं । **उपैति** प्राप्नोतीति **अहमादरात्त-मुपैमि**-एतादृशेन मद्योगेन प्राप्तं-तस्मात् स्नेहेन मद्रूपं करोमीति । अहं **तं मोचयामि**-संप्रज्ञाताऽसंप्रज्ञात समाधिभ्य इति । **न मुंचामि**-मद्रूपाद्भिन्नं-

कदापि न करोमिति । **स मां न त्यजेदिति** । तत्रैकभावं प्राप्तत्वात् त्यागाद्यभाव इति ॥ १६ ॥

**भाष्य-तात्पर्य**--( वरील दोनही श्लोकांवरच्या संग्रहीत भाष्याचें तात्पर्य पुढें देत आहोंत; तसेंच याचें स्पष्टीकरण करणारी **श्रीयोगेश्वरी** टीका सुद्धां फारच विस्तृत आहे, म्हणून ती समग्र न देतां, तात्पर्य सांगतांना अवश्य त्या ठिकाणीं त्या टीकेंतील कांहीं अवतरणें देत आहोंत. त्यांवरून सर्व कांहीं स्पष्ट कळणारें आहे. तें तात्पर्य असें:– )

यावरील **योगेश्वरी** टीकेचा आरंभ असा:– ' गजानन म्हणे नृपा । ऐसे संकल्प कामरूपा । त्याग करितां स्वरूपा । ब्रह्मभूत होय ॥ २२७ ॥ सदा कल्पना त्याग । योगीनें करावा सांग । परम निर्वृत्ति चांग । प्राप्त होय ॥२८॥

श्रीगजानन म्हणतात, राजा वरेण्या ! अशा रीतीनें पूर्वी सांगितलेल्या साधनांनीं योगाचें साधन करीत असलेला योगी, अभ्यासाच्या बलानें, चित्तांत उद्भवणाऱ्या संकल्पांचा सर्वथा त्याग झाला असतां, अत्यंत श्रेष्ठ अशा निर्वृत्तीला-वृत्तिहीनतेला, सर्वसंयोगरूप अशा पूर्ण अभेदभावाला प्राप्त होतो, म्हणजे त्याचा स्वस्वरूपसमाधि-स्वानंदसमाधि सिद्ध होतो, आणि संकल्पांच्या सर्वथा त्यागानें, चारहि वृत्तींच्या लीनभावानें युक्त असलेलें, अर्थात् त्या वृत्तींच्या पूर्ण अभेदभावानें युक्त असलेलें त्या योग्याचें चित्त, क्रमानें पूर्ण विरुद्ध होत्सातें, त्या अभेदभावाचाही त्याग करून, सर्वथा लीन होतें; सारांश नानाविध भेदाच्या व अभेदांच्याही राहित्यानें, पूर्ण अभेदात्मक भावानें युक्त असलेली ती निर्वृत्ति--वृत्तिहीनता, अत्यंत श्रेष्ठ निर्वृत्ति होय; ( आतां अशा त्या योग्याच्या स्वस्वरूपाभेद समाधीच्या सिद्धीचा क्रम कसा ? तें दर्शवितात; प्रथम ' विश्वस्मिन्० ' या श्लोकार्धानें स्वानंदसमाधीचा—भवप्रत्ययसमाधिभेदाचा क्रम सांगितला आहे. ) तो योगी अखिल विश्वाच्या ठिकाणीं स्वतःला-स्वस्वरूपाला पाहतो; स्थूल-सूक्ष्मादि भेदांनीं जें जें कांहीं चतुर्विध आहे, चतुर्विध वृत्तीच्या प्रकाशाला म्हणून जें जें पात्र आहे, तें सर्व ' विश्व ' होय; त्याच्या ठिकाणीं तो आत्मस्वरूपाला पाहातो, म्हणजे तें भिन्न भिन्न विश्व त्याला स्वस्व-

रूपाकार भासतें, आणि तें विश्व पुनः तो आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं पाहतो, म्हणजे भिन्न भिन्न विश्वाच्या ठिकाणीं तत्तद्भेदराहित्यानें-स्वस्वरूपाकार अशा अभेद-भावानें, त्या योग्याला होत असलेले, अर्थात् भिन्न भिन्न असें, स्वस्वरूप भान पुन्हां स्वस्वरूपाच्या ठिकाणीं एकरूपाला प्राप्त होतें; म्हणजेच तें भिन्न भिन्न असें स्वस्वरूपाकार विश्व पूर्णपणें ऐक्यत्वाला प्राप्त होतें; अर्थात् अशा रीतीनें त्या योग्याचा स्वानंदसमाधि—पूर्ण भवप्रत्ययरूप समाधि सिद्ध होतो. आतां येथें विचार असा; 'चित्तवृत्तींचा निरोध म्हणजे योग' असें सांगितलें आहे. (चित्तवृत्तींचा निरोध म्हणजे काय ? क्षिप्त, मूढ, विक्षिप्त, एकाग्र व निरोध अशा पांच वृत्ति आहेत. क्षिप्तादि चार वृत्तींचें लीनत्व, म्हणजे पूर्ण अभेद-भाव—सर्वथा एकरूपत्व असून, त्याचा त्याग म्हणजेच निरोध वृत्ति होय; आणि त्या निरोधवृत्तीचाही निरोध—सर्वथा त्याग होणें, याला योग म्हणतात; तात्पर्य सर्वथा वृत्तिराहित्य आणि वृत्तिराहित्याभाव जेथें नाहीं असें जें चित्त, तेंच योगयुक्त चित्त—पूर्णयोगधारक चित्त होय, म्हणून चित्ताचा सार्वभौम धर्म तो योग अशी लक्षणा केलेली आहे. एवंच सर्वसंयोगरूप—स्वानंदसमाधि आणि तद्धीनभावरूप अयोगसमाधी यांचाही जो योग, म्हणजे पूर्ण योगसमाधि तोच 'योग' शब्दाचें पूर्ण लक्ष्य असून तद्भावसिद्धि म्हणजेच पूर्ण ब्रह्मभावासिद्धि, अंतिम ब्रह्मभूतत्व होय !) ह्या दृष्टीनें वर सांगितलेल्या स्वानंदसमाधीच्या क्रमांची स्थिति कुठवर आहे व त्याचें पर्यवसान कुठें होतें, हें वरील श्लोकावरील भाष्यांत भाष्यकारांनीं, फार विस्तारानें सांगितलें आहे. त्याचें तात्पर्य लक्ष्यांत येण्याकरितां, प्रथम **श्रीयोगेश्वरी** टीकेंतील— अवतरणें देऊन, नंतर वर संग्र-हानें उद्धृत केलेल्या भाष्याचें तात्पर्य सांगूं !

'तत्रायं विवेकः'—इत्यादिसंबंधीं **श्रीयोगेश्वरीटीका**: 'त्याचा सांगूं विचार । एक यथाविधि सार । देह दोन साचार । नरासि आहे ॥ २२९ ॥ स्थूल देह बाहेर । भिन्न भिन्न पदार्थधर । लिंगदेह अंतरीं सार । अभेदमय एक ॥ ३० ॥ लिंगदेह नाम खरें । लिंग चिह्नासी साचारें । म्हणती शास्त्रीं सारे । सर्व चिह्न त्यापासून ॥ ३१ ॥ सकळांचा अभेद । एकरूप प्रचण्ड । सकल लिंगभेद ।

तेथें–तद्रूप आहे ॥ ३२ ॥ यालागीं लिंगदेह नाम । अभिधानमय धाम । बारा अंगुळ धर्म । हृदयीं आहे ॥ ३३ ॥ आप आपले अंगुळ । प्रमाण तयाचें सबळ । कीट पतंग प्रबळ । तेथें त्याचें अंगुळ ॥ ३४ ॥ स्थूल देह क्रियामय । लिंगदेह ज्ञानमय । त्यापासून सकळ गाय । ज्ञान उत्पन्न होय ॥ ३५ ॥ ऐसें चार अवस्था । आप आपले स्थूळ पथा । क्रियामय पदार्था । सर्व होय तेथें ॥ ३६ ॥ अंतरीं लिंगदेह । चार अवस्थांस स्नेह । तेणें ज्ञान निःसंदेह । आप आपलें होय ॥ ३७ ॥ कैवल्यदेह पांचवा । तेथें स्थूळ लिंग भावा । दोहीं संयोग स्वभावा । अभेदपण ॥ ३८ ॥ ऐसा मार्ग कळावा । लिंग देह स्वभावा । तेथें अभिमान भावा । तद्रूप देह खरा ॥ ३९ ॥ दोन देहीं अभेद । होऊनि खेळत पद । ब्रह्म स्वयें प्रचण्ड । स्वानंदमय ॥ ४० ॥ अंतःकरण नाम । लिंग देहमय धाम । आपुलें ज्ञान वर्म । तेथें आहे ॥ ४१ ॥ दमानें देह शुद्ध होय । शमानें लिंग शुद्ध राय । दोन्ही मिळून ध्याय । ब्रह्म कैसें आहे ॥ ४२ ॥ (इत्यादि या टीकेचें तात्पर्य स्पष्टच असल्यानें निराळें व्याख्यान करण्याची जरूर नाहीं.)

पूर्वोक्त साधननिष्ठ योगी, नाना प्रकारच्या साधनबलानें क्षिप्त, मूढ व विक्षिप्त या वृत्तींचा नाश झाल्यानंतर, एकाग्रवृत्तीचा अवलंब करीत असतां शमदमरूप तपोबलानें त्याचें अंतरंग व बहिरंग पूर्ण शुद्ध होऊन, बाह्यक्रिया-रूप नानात्व भाव आणि एकरूप असा सर्व क्रियांना मूल असलेला ज्ञप्तिभाव, यांचा साहजिकपणेंच त्याग करीत असलेला, तो योगी क्रियाज्ञानमूल अशा आत्मस्वरूपाला, सर्वाभेदस्वरूप ब्रह्मभावाला कसा प्राप्त होतो; त्याचें दिग्दर्शन वरील टीकेंत आलें आहे. जसें बाह्य ज्ञानसाधक चर्मचक्षु असतात, तसेंच अंतरंग–ज्ञानसाधक–केवल ज्ञानप्रकाशक ज्ञानचक्षु असतात; प्रत्यक्ष ज्ञानाचें साधन या अर्थीं चक्षु ही संज्ञा आहे. तर अशा रीतीनें वर सांगितल्याप्रमाणें शमदमरूप तपःसिद्धीनें तो योगी, क्रिया-ज्ञानमूल अशा सर्वाभेदस्वरूपाला –ब्रह्मरूपाला पाहातो; म्हणजेच त्याला प्राप्त झालेल्या त्या सर्वाभेदरूप ज्ञान-चक्षूंच्या योगानें, त्याला स्वस्वरूप दर्शन होतें; आतां हे ज्ञानचक्षु म्हणजे सर्व सामान्य नानाविध ज्ञानांचे प्रकाशक असें केवळ मनोमय कोशरूप नसून, सर्व ज्ञानांच्याहि अभेदाचें व सर्व अभेदभावांचें प्रकाशन करणारे, अतएव ब्रह्म-

प्रकाशक असे अभेदज्ञानदायी चक्षु, शमदमरूप तपोयोगबलानेंच प्राप्त झालेले, असे आहेत; असें समजावें! अन्यथा केवल मनोमय उपाधीनें युक्त असलेल्या ज्ञानचक्षूंनीं पंचकोशातीत अशा सर्वाभेदस्वरूप ब्रह्माचें—स्वस्वरूपाचें दर्शन होणें शक्य नाहीं! असो; तर सर्वाभेद—ज्ञानप्रकाशक अशा ज्ञानचक्षूंनीं त्या योग्याला, प्रथमारंभीं जागृदादि उपाधींनीं युक्त अशा स्वस्वरूपाचें दर्शन होत असतें; तें—स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण या चतुर्विध भेदांनीं, अखिल क्रियारूप व ज्ञानरूप विहार करीत असलेलें, क्रिया व ज्ञान यांच्या अभेद स्थितींत, म्हणजे त्यांचा जेथें लय होतो, अशा स्वस्वरूपांत, अर्थात अभेद-रूपानेंच स्थित असल्यानें, तें स्वस्वरूप 'विश्व' संज्ञेनें युक्त असून, त्वंपदात्मक असल्याचें वर्णिलें आहे. सारांश अशा क्रमानें नाना प्रकारच्या उपाधींनीं, त्याच्या प्रत्ययाला येत असलेलें तें स्वस्वरूप, तो त्या त्या प्रकारच्या ज्ञानचक्षूंनीं पाहतो, असें सांगितलें आहे.

याच अन्वयें आरंभींच अखिल स्थूल विश्वाचें जें पूर्ण अभेद स्वरूप जागृदाभिमानात्मक व अन्नकोशरूप उपाधीनें युक्त असें अन्न ब्रह्मात्मक स्वस्वरूप, त्याचा त्याला साक्षात्कार होतो; आणि तें अत्यंत—सूक्ष्मतम असल्यानें, सूक्ष्मतम ज्ञानचक्षूंनीं, त्या योग्याला त्या स्वस्वरूपाचें दर्शन होतें, असें म्हटलें जातें. तें स्वस्वरूप अखिल स्थूल विहारांच्या त्यागानें सिद्ध होणारा तो—जागृद्ब्रह्मरूप समाधि, सकळ अन्नांचा अभेद-स्वरूप समाधि होय; म्हणजे अन्न—कोशरूप उपाधीनें सर्वत्र व्याप्त असलेल्या ब्रह्माचें तें एकरूपत्व—स्वमहिम्निस्थितत्व, असें स्वस्वरूप होय; परंतु केवळ जागृदाभिमान युक्त असें तें स्वस्वरूप एकदेशीय असल्यानें, पूर्णसिद्धीकरि-तांच योग समाधिरूप साधन करीत असलेल्या त्या योग्याला, त्याच्या ठिकाणीं लयोत्पत्तियुक्तत्व व भिन्नभानयुक्तत्वरूप दोष असल्याचें दिसून येतें; त्या-मुळें, त्याचा त्याग करून, तो साधक योगी पुढें जातो; तेव्हां त्याला योग-साधनबलानें क्रमानें, प्राण-मन-विज्ञानरूप त्रिविध कोशरूप उपाधींनीं सर्वत्र व्याप्त असलेलें, त्याला आधारभूत अशा व्यापक स्वरूपानें पुनः एकरूप अस-लेलें, आणि दोहोंच्याहि अभेदीं एकानेकादिरहित अशा पूर्णाभेद स्वरूपानें

१००५९

युक्त असलेलें, जें स्वस्वरूप–स्वाप्ताभिमानधारक असें स्वस्वरूप तें दृष्ट होतें; त्याच्या प्रत्ययाला येतें; सारांश तशा योगसाधनानुरूप क्रमाला अनुसरून, त्याला प्राप्त झालेल्या, चालक ज्ञानरूप, संकल्प–विकल्पप्रकाश–ज्ञानरूप, सुखदुःखादि-ज्ञानप्रकाशरूप त्रिविध चक्षूंनीं, तो योगी स्वाप्न ब्रह्माला–स्वाप्ताभिमानयुक्त स्वस्वरूपाला पाहातो, पण तेथेंहि दोष असतोच! म्हणून पुढें पूर्व क्रमानेंच आनंद कोशात्मक आनंद ब्रह्म अथवा सौषुप्तब्रह्म व सर्व कोशातीत असें अव्याकृत ब्रह्म अथवा चैतन्य ब्रह्म यांचें दर्शन त्याला होत असते; तेथें आनंदात्मप्रकाशरूप आणि आत्मप्रतीतिप्रकाशरूप असे द्विविध चक्षु असतात; त्यानंतर त्याला सर्वाभेद–प्रकाशरूप म्हणजे उपर्युक्त चतुर्विध ब्रह्माच्या समष्टीनें युक्त अशा स्वस्वरूपाचें प्रकाशक अभेदचक्षु प्राप्त होऊन, तो चिद्ब्रह्माच्या ठिकाणीं तन्मयत्वाला पावतो, म्हणजे त्याचा पूर्ण त्वंपदात्मक असा स्वस्वरूपसमाधि सिद्ध होतो; परंतु तेथें पूर्व क्रमांत असलेलें–चतुर्विध भेदधारकत्व अथवा अभेदधारकत्व, इत्यादि कोणतेंच आलंबन उरत नसल्यानें, क्रमानेंच निरालंब चक्षूंना प्राप्त होत असलेला तो योगी, केवलाधाररूप–बिंदु-सोहं-बोध-विबोधादि चक्षूंच्या द्वारें, पूर्ण तत्पदात्मक स्वस्वरूप समाधीला प्राप्त होत असतो; आणि शेवटीं त्याचाहि त्याग करून निजचक्षूंनां अथवा स्वानंदचक्षूंनां प्राप्त होत्साता, तो पूर्वोक्त समाधि-साधननिष्ठ योगी पूर्ण असिस्वरूप अशा केवल स्वस्वरूपात्मक समाधीला-स्वानंद समाधीला प्राप्त होतो; म्हणजे अशा क्रम परंपरेनें जागृदादि चतुर्विध देहरूप ( अर्थात् तन्मय-ब्रह्मरूप ) अथवा त्यांचाही अभेद अशा पूर्ण त्वंपदात्मक स्वस्वरूपाचा, व त्यालाही आधारभूत अशा-चतुर्विधादि देहिरूप अथवा तदभेदरूप पूर्ण तत्पदात्मक स्वस्वरूपाचा त्याग करून, केवल स्वसुखरूप अशा निज चक्षूंनीं अथवा स्वानंद चक्षूंनीं तो योगी पूर्ण असिस्वरूप अशा स्वस्वरूपाला–स्वानंद ब्रह्माला पाहतो, येथें मात्र तन्मयत्वादिरूप असा कोणताच व कसलाच दोष उरत नाहीं; कां कीं येथें स्वस्वरूपालाच दाखविणारे असे निजचक्षु स्वानंदचक्षु स्वस्वरूप महिमा प्रकाशक असेच चक्षु असल्यामुळें, इतरत्र त्वंपदात्मक समाधींत अथवा तत्पदात्मक समाधींत, त्या त्या

प्रकारच्या चक्षूंनीं दृष्ट होणारे तत्तन्मयात्मक ब्रह्म निराळें आणि स्वस्वरूपात्मक ब्रह्म निराळें हा जो दोष आढळत असतो, त्याचा या ठिकाणीं—स्वानंदचक्षूंनीं दृष्ट होणाऱ्या स्वस्वरूप ब्रह्मामध्यें,मुळींच संभव नसतो! हें स्वस्वरूप सर्व प्रकारच्या अभेदांचें—सकल स्वानंदांचें एकरूप—पूर्ण अभेदरूप होय ! येथें ग्राह्य ग्राहकादि अथवा ज्ञाता—ज्ञेयादि कांहींच भिन्न असें उरत नसल्यामुळें, चित्ताच्या एकाग्रवृत्तीचा तर केव्हांच लय होत असून, पूर्ण निरुद्ध असें तें महच्चित्त वृत्तिहीन होतें—पूर्ण निर्वृत्तीला प्राप्त होते ! ( पण ही परम श्रेष्ठ अशी पर निर्वृत्ति मात्र नव्हे तर केवळ स्वस्वरूपाभेदस्थितिरूप—सर्व संयोगरूप अशी सामान्य निर्वृत्ति होय ! हें पुढें स्पष्ट होईलच. )

सारांश चित्त, चित्तवृत्ति, चित्तधारक-चित्तवृत्तिधारक, ज्ञानचक्षु अथवा ज्ञानचक्षुदाता, इत्यादि इत्यादि सर्व कांहीं स्वानंदाच्या ठिकाणीं पूर्ण स्वस्वरूपामध्येंच लीन होतसाते, पूर्ण अभेदत्वानें एकरूपालाच प्राप्त होत असते; यानंतर पुढें ब्रह्मैक्यभावरूप अथवा पूर्ण संयोगात्मक असा समाधि, अथवा कसलाच दुसरा प्रकार उरत नाहीं. परम श्रेष्ठ निर्वृत्तीचें स्वरूप सांगतांना पूर्ण स्वस्वरूप समाधीचें स्वानंदसमाधीचें, हें अशा प्रकारचें विवरण, श्रीमत् भाष्यकारांनी केलेलें असून, योगवासिष्ठादि वेदांत ग्रंथांतून, मीमांसादि शास्त्रांतून व पुराणादिकांतून आलेलें ब्रह्माचें अथवा ब्रह्मसमाधींचें वर्णन आणि त्याचें परम साध्य असें ब्रह्मभूतत्व, वरील पूर्ण स्वानंद समाधीच्या पर्यंतचेंच आहे, असें सांगितलें आहे. कारण केवलीभावासिद्धि, ब्रह्मभेदसिद्धि, ब्रह्मस्वरूपाशीं पूर्ण ऐक्य, सर्व वृत्तिराहित्य, हीच परम साध्य अशी सहजावस्था म्हणजेच ब्रह्मभूतत्व होय; असेंच वर्णन सर्वत्र आहे, आणि ही पूर्ण ब्रह्मैकताच परम श्रेष्ठ असून, यापेक्षा निराळें साध्य—साधन अथवा तद्राहित्य असें कांहीं सांगितलेलें नाहीं; योगवासिष्ठ ग्रंथांत ज्या सप्तविद्या ज्ञानभूमी सांगितल्या आहेत, त्यांतील शेवटली ‘ तुरीया ’ संज्ञिका भूमी वरील कैवल्यभावाचें—सहजावस्थेचें बोधन करितें याविषयीं **श्रीयोगींद्र** म्हणतातः—

‘ सहज भूमि जाण । सातवी नाम प्रमाण । योगवासिष्ठ ज्ञान । ऐसें

जाणावें ॥ २४५ ॥ तुरीया रूप सातवी । भूमि जाण संभवी । देह एक ज्ञान भावी । समान हे तीन ॥ ४६ ॥ तीन पराधीन खरे । चवथे स्वाधिन परे । सहज नाम साचारे । ऐसें जाणावें ॥ ४७ ॥ सहज स्थिति स्थिर । पूर्ण झाली साचार । मग स्वानंद सार । भूमिहीन ॥ ४८ ॥ योग वासिष्ठ ग्रंथ । स्वानंदपद पर्यंत पथ । सात भूमी समर्थ । मग ब्रह्मभूत ॥ ४९ ॥ त्याची पलिकडे जाण । ब्रह्मभूत नाहीं भान । सकल संयोगपण । योग स्वसंवेद्य ॥५० स्वस्वरूपीं अभेद । स्वयें झाला प्रचण्ड । याचें नाम ब्रह्मभूत पद । भूमिहीन-वसिष्ठ ग्रंथ ॥ ५१ ॥ निरोध रूप चित्तवृत्ति । संयोग पदीं होती । याचें नाम निवृत्ति । वसिष्ठ मतें ॥ ५२ ॥ ........-तेथें नाहीं जग ब्रह्म । भूमिभूमि-धारक धाम । ब्रह्मभूत पूर्ण वर्म । स्वानंदमय ॥ २६५ ॥ शास्त्र केलें साहा जाण । काय कारण भिन्न । एक शास्त्र प्रमाण । करावें होतें ॥ ६६ ॥ क्रमास्तव ग्रंथ रचना । भिन्न भिन्न आहे भाना । त्याचा विचार ऐक ज्ञाना । तुज सांगतों ॥ ६७ ॥ क्रमाविण भ्रांत होय । न कळे भूमि संचय । कोठें गुंततो राय । यालागीं केलें ॥ ६८ ॥ न्यायशास्त्र जाण । चैतन्य ब्रह्मज्ञान । कैवल्यदेह प्रमाण । तेथें ब्रह्मभूत ॥ ६९ ॥ त्याचे पलीकडे ज्ञान । न्याय शास्त्रास नाहीं जाण । यालागीं सांगते आपण । याचे पलीकडे कांहीं नाहीं ॥७०॥ वैशेषिक शास्त्र खरें । सोहं शून्याकार सारे । तावत् पर्यंत साचारे । ब्रह्मभूत तयाचें ॥ ७१ ॥ धर्मशास्त्र सांगती । ज्ञान ब्रह्म वदती । प्रकृतिलय गति । ब्रह्मभूत तयाचें ॥ ७२ ॥ सांख्य शास्त्राचें ब्रह्म । विदेहरूप वर्म । तेथें ब्रह्मभूत धाम । तयाचें वरेण्या ॥ ७३ ॥ मीमांसा शास्त्र जाण । स्वानंदपर्यंत आपण । योगवासिष्ठ भान । ब्रह्मभूत तयाचें ॥ ७४ ॥ ऐसें नाना पुराण । अन्य ग्रंथ प्रमाण । भिन्न भिन्न ब्रह्मज्ञान । कळावया केलें ॥ ७५ ॥ स्वानंदाचें पलीकडे । कोण ग्रंथ प्रचण्ड । नाहीं आहे जाण सद्य । सर्वत्र जाणावें ॥ ७६ ॥ अन्नाचा स्वानन्द । तेथें जागृत जग भेद । तेथें अभेद सद्य । जग ब्रह्म दोहीं ॥ ७७ ॥ तैसें प्राणादिक ब्रह्म । नाना जाणावे धर्म । आप आपला स्वानन्द वर्म । संयोगी आहे ॥ ७८ ॥ सकळ स्वानन्दाचा । अभेद संयोग साचा । पूर्ण स्वानंद वाचा । स्वसंवेद्य खरे ॥ ७९ ॥ यालागीं नाम झालें ।

स्वानंद तीन करुलें । अक्षर आहे सबळे । आणिक नाहीं ॥ ८० ॥ स्वानंदाचे पलीकडे । संयोग नाहीं पदे । हाचि निश्चय वदे । वेदादिक सर्व ॥८१॥ योगशास्त्र पातंजल । आणि गणेशगीता सबळ । आणि उपनिषत् प्रबळ । तिहींचें ब्रह्म निराळें ॥ ८२ ॥ तिहींचा एक मार्ग । ब्रह्मभूत आहे सांग । त्या कारणें श्लोक चांग । आरंभिती गजानन ॥ २८३ ॥' इति ॥

" सदरील टीकेंत वरील भाष्यकारांच्या मताचाच अनुवाद अगदीं स्पष्टपणें आलेला आहे. मागें सांगितल्याप्रमाणें स्वस्वरूपाच्या ठिकाणीं पूर्ण अभेद प्राप्त होणें-स्वसंवेद्य समाधि सिद्ध होणें हेंच परम ब्रह्मभूतत्व होय; म्हणजे अशा रीतीनें चित्ताच्या एकाग्र वृत्तीचाही पूर्ण लय होऊन, त्याला जी निरुद्धावस्था प्राप्त होणें म्हणजे तें वृत्तिहीन होणें; हीच परम निवृत्ति होय; असेंच योगवासिष्ठादि ग्रंथांतून अथवा मीमांसादि शास्त्रांतून वर्णिलेलें असल्याचें भाष्यांत व टीकेंत सांगितलें असून, त्याचें कारण असें दर्शविलें आहे कीं, कैवल्य-ब्रह्मप्राप्ति, पूर्ण ब्रह्मभाव-सिद्धि, अंतिम ब्रह्मभूतत्व फारच कठिण आहे; त्याच्या क्रमाच्या यथासांग ज्ञानाकरितांच अशी योजना असून, तिला अनुसरून निरनिराळ्या ग्रंथांतून निरनिराळ्या प्रकारांनीं ब्रह्मनिरूपण केलें गेलें आहे, आणि त्या त्या क्रमसोपानच्या ठिकाणींच साधकाचें पूर्ण दार्ढ्य सिद्ध व्हावें, याकरितां तेंच परम श्रेष्ठ अंतिम ब्रह्मभूतत्व होय, असें सांगितलें आहे. कारण या क्रमसोपानाचें जर यथापूर्ण ज्ञान झालें नाहीं, तर पूर्णयोगसाधक योगी कोठें तरी मध्येंच गुंतून योगविघ्नांनीं पीडित होत्साता, यागापासून भ्रष्ट होण्याचाच फार संभव असतो; त्या क्रमाचें स्वरूप सामान्यतः असें आहेः—न्यायशास्त्रामध्यें चैतन्य ब्रह्मापर्यंतचें वर्णन आलेलें आहे तें स्थूल-सूक्ष्मादि देहांच्या पूर्ण अभेदाचें निदर्शक असून, मागें जागृदादि चतुर्विध देहांच्या अभेदानें जो त्वंपदरूप स्वस्वरूपसमाधि सिद्ध होत असल्याचें सांगितलें आहे; म्हणजे आत्मप्रतीतिरूप चक्षूंनीं जें स्वस्वरूपदर्शन होतें, म्हणून सांगितलें आहे; तद्भावसिद्धि-बिंदुब्रह्मसिद्धि, हेंच यांतील -न्यायशास्त्रांतील अंतिम साध्य ब्रह्मभूतत्व होय ! असेंच वैशेषिकांत प्रतिपादिलेलें शून्यात्मक ब्रह्म, चिद्ब्रह्म-

संज्ञक असून, तें चतुर्विधादि देहांना व त्यांच्या अभेदाला केवळ आधारभूत असें शून्याकार, अतएव चतुर्विधादि देहीरूपांच्या अभेदानें युक्त असें सोहंब्रह्म स्वरूप असलेलें—निरालंब चक्षूंनीं दृष्ट होणारें स्वस्वरूप होय. अर्थात् तद्भावासिद्धि—सोहंब्रह्मसमाधिसिद्धि हेंच याचें ब्रह्मभूतत्व होय ! अशाच क्रमानें धर्मशास्त्र हें ज्ञानब्रह्माचें—अर्थात् देह व देही यांच्या पूर्ण ज्ञानानें—समभावानें युक्त अशा बोधब्रह्माचें प्रतिपादक असून, या अखिल बोधांचा त्याग करून केवळ स्वसुखस्वरूप—विबोधब्रह्मस्वरूप—अशा प्रत्ययानें सिद्ध होणाऱ्या ब्रह्मभावाचें—' स्वमहिम्नि स्थित ' केवलीभावाचें प्रतिपादक असें सांख्यशास्त्र आहे; आणि या बिंदु—सोहं—बोध—विबोधादि चतुर्विध तत्पदस्वरूप ब्रह्मांच्या पूर्ण संयोगाचें—केवल असि—स्वरूप अशा स्वानंदब्रह्माचें प्रतिपादक मीमांसाशास्त्र असून, सर्व प्रकारच्या संयोगसमाधीचें अभेदस्वरूप असें त्याचें ब्रह्मभूतत्व होय; सारांश स्वस्वरूपाभेद समाधि, पूर्ण स्वानंदसमाधि, भवप्रत्ययासंप्रज्ञात-रूपसमाधि अतएव सर्व संयोगाभेदस्वरूप असा जो समाधि, तेथपर्यंतच सर्वांचें ब्रह्मभूतत्व वर्णिलेलें आहे, आणि त्याच्या क्रमज्ञानाकरितां व पूर्ण सिद्धीकरितांच भिन्न भिन्न प्रकारांनीं ब्रह्मवर्णन करणाऱ्या भिन्न भिन्न शास्त्रग्रंथांची प्रवृत्ति आहे.

शिव, विष्णु, सूर्य व शक्ति यांच्या ब्रह्मस्वरूपाचें प्रतिपादन करणाऱ्या शास्त्रग्रंथांतून जें त्यांचें ब्रह्मभूतत्व वर्णिलें आहे, तेंही वरील स्वस्वरूप-समाधी-पर्यंतचेंच आहे. मागें त्वंपदात्मक स्वस्वरूपसमाधीमध्यें जसे जागृदादि अथवा स्थूलादि चार भेद सांगितले आहेत, आणि त्यांनाच आधारभूत असे बिंद्वादि चार भेद तत्पदात्मक स्वस्वरूप समाधींत सांगितले आहेत, तसेंच त्या उभयांच्या म्हणजे त्वंपदात्मक व तत्पदात्मकांच्या अभेदीं—त्यांना आत्मभूत असे

१ या शास्त्राचें परिपूर्ण सिद्धिसाधक असें यथार्थ स्वरूप बाजूस राहून, त्या त्या शास्त्रांच्या ठिकाणींच पूर्णता असल्याचा अभिमान जेव्हां उत्पन्न होतो, तेव्हांच भिन्न भिन्न मताभास व भिन्न भिन्न संप्रदाय प्रवृत्त होतात. ते पूर्णसिद्धीला प्रतिबंधक असल्यानें, त्यांचें-त्या भिन्नमतरूप अभासांचें खण्डण करून, त्या त्या शास्त्राचें यथार्थस्वरूप—पूर्णसिद्धीला साधक असें क्रमस्वरूप प्रकट करणें अवश्य असतें. अशा दृष्टीनेंच अद्वैत सिद्धान्त प्रतिपादक आचार्यांनीं त्या त्या शास्त्रांचें म्हणजे भिन्नरूप मत-प्रतिपादनरूप अभासाचें-खण्डण केलें असल्याचें वर्णिलें आहे. मूळभूत शास्त्रप्रवृत्ति क्रमसिध्यर्थ योग्य अशीच आहे.

चार भेद, असिपदात्मक स्वस्वरूपांत सांगितले आहेत; ते अनुक्रमें असत, सत्, सम व नेति, अशा संज्ञेनें शाक्त, सौर, वैष्णव आणि शैव ब्रह्मांचे व ब्रह्मभूतत्वाचे निदर्शक आहेत. तसेंच त्वंपदभेदाचें पूर्ण लक्ष्य अशा पूर्ण बोधरूप त्वंपदांमध्यें स्वतउत्थान संज्ञेनें, आणि तत्पदभेदलक्ष्य अशा पूर्ण तत्पदांत परतउत्थान संज्ञेनें, यांचें हें पूर्ण-क्रमद्योतक चतुर्विधत्व सांगितलें असून, स्वतः-परत-उत्थानहीन अशा पूर्ण असिस्वरूप स्वानंदामध्यें-संयोगात्मक स्वस्वरूप समाधीमध्यें यांचा संयोग—परिपूर्ण लीनभावही, असत्-सत्-सम-नेति स्वानंदरूप असा चार प्रकारचा सांगितला आहे; एवंच हेंच त्यांचें पूर्ण ब्रह्मभूतत्व होय; हें त्यांच्या त्यांच्या ग्रंथांतील वर्णनावरून स्पष्ट होतें; वेद उपनिषदें व पातंजल योगशास्त्र यांतील ब्रह्मभूतत्व मात्र भिन्न आहे. वरील स्वस्वरूप समाधि—संयोगसमाधी, आणि त्याचाही लीनभाव अतएव अयोगसमाधी यांच्या अभेदानें—अभेदयोगानें सिद्ध होणारा जो पूर्णयोग समाधि, तेंच पूर्ण ब्रह्मभूतत्व होय; असें त्यांत वर्णिलें असून, तेंच गाणेश ब्रह्मभूतत्व गणेशगीतेंत वर्णिलेलें आहे. कारण स्वतउत्थान समाधि, परत उत्थान समाधि व स्वानंद समाधि, यांमध्यें जे चार चार भेद वर्णिले आहेत, त्यांचा त्या त्या ठिकाणचा अभेद म्हणजे त्वंपद, तत्पद, व असिपद यांमध्यें त्या चतुर्विधांच्या पूर्ण अभेदानें प्रत्ययाला येणारी संयोगसत्ता, हेंच गाणेश ब्रह्माचें स्वरूप असून, या त्रिविध संयोग सत्तेचा पूर्ण लय जेथें होतो, ती तत्त्वमस्यातीत अशी पूर्णयोगसमाधिस्थिति, हेंच गाणेश ब्रह्मभूतत्व होय; तें पुढील श्लोकानें दर्शविलें आहे. म्हणजे सर्वांच्या ब्रह्मभूतत्वाची जेथें परिसमाप्ति, तो गाणेश ब्रह्मभूतत्वाचा आरंभ असून तेंच त्याचें—गाणेश ब्रह्माचें अध्यारोप स्वरूप आहे; आणि एवंरीत्या अध्यारोपापवादशून्य स्थिति, हें गाणेश ब्रह्मभूतत्व होय; असें एकंदर तात्पर्य आहे. हें श्रीगणेश गीतेंतील व भगवद्गीतेंतील एकंदर प्रतिपादनावरून लक्षांत येतें. कसें तें पहा:— ' नासतो० ' इत्यादिरूप श्लोकांत आरंभींच उभयाभेदात्मक अशा समस्वानंदाचें—वैष्णवब्रह्माचें स्वरूप सांगितलें आहे. हाच मुख्य श्लोक असून याकरितांच संपूर्ण भगवद्गीता सांगितली आहे. आणि शेवटीं ' यो मां० ' इत्यादि श्लोकांत समस्वरूप ब्रह्माच्या ठिकाणीं परिसमाप्ति करून, ब्रह्मभूतत्व दर्शविलें

आहे. असेंच शिवगीतादिगीताविषयीं समजावें. सारांश संयोगसमाधिपर्यंतच सर्वांचें ब्रह्मभूतत्व वर्णिलें आहे. ग्रंथविस्ताराच्या भीतीनें त्यांचें विशेष विवरण येथें केलें जात नाहीं. गाणेश ब्रह्मभूतत्व मात्र भिन्न आहे; हें वर सांगितलें आहेच; आणि शिवाय श्रीगणेशगीतेंत ‘ विश्वं मयि० ’ इत्यादि श्लोकांत संयोगस्वानंद-रूप स्वस्वरूप समाधी कथन केल्यानंतर, पूर्ण ब्रह्मभूतत्व सांगण्याकरितां पुढें ‘ योगेन० ’ इत्यादि श्लोकानें आरंभ केलेला आहे. आणि तेथेंच पूर्ण समाप्ति दर्शविली आहे. यावरूनही हें स्पष्ट होत आहे. याविषयीं आणि यापुढील श्लोकांतील पूर्ण योगाविषयीं **श्रीयोगेश्वरी** टीकेंत आलेल्या उल्लेखाचें थोड-क्यांत अवतरण घेऊन, नंतर दुसऱ्या श्लोकावरील भाष्याचें स्पष्टीकरण करूं !

“ मग तो पूर्ण स्वानंद । भवप्रत्यय अभेद । असंप्रज्ञात वेद । सिद्धि-बुद्धि विनायक ।। ३६१ ।। जेथें भवप्रत्यय । पूर्ण रूप संचय । तेथें मी नाहीं राय । तरी तो माझे ठायीं कोठें ।। ६२ ।। ऐसें करितां जाण । अयोग प्रकटे पूर्ण । तेणें भवप्रत्यय पण । स्वयें नाश पावे ।। ६३ पूर्ण स्वसंवेद्य खरे । भवप्रत्यय सारे । मग स्वसंवेद्य परे । पुढें नाहीं आहे ।। ६४ ।। ऐसें करितां योगीस । स्वानन्द नाहीं नृपेश । भासती कधीं अवेश । ऐसा योगी होय ।। ६५ ।।.... स्वानन्द नाहीं तेथें । तरी त्याला काय पथें । बोलणें होय समर्थें । यालागीं निवृत्ति ।। ३८२ ।। मायाहीन गणेश । अयोगरूप वेश । सिद्धि बुद्धि नाहीं वेश । तेथें कधीं नृपा ।। ८३ ।। विपरीत भानभव । सिद्धि जाणा संचय । विपरीत भानधारक गाय । बुद्धिमाया ।। ८४ ।। कनक–नग स्वरूप । बुद्धि झाली जाण नृप । कनक नग भ्रांतिस्वरूप । सिद्धि जाणावी ।। ८५ ।। दोघींचा जो पति । दोन माया रचिती । मायायुक्त वर्जित प्राप्ति । तयाला होय ।। ८६ ।। तोच स्वानन्दघन । सिद्धि बुद्धि अभेदपण । सिद्धि-बुद्धि-पति जाण । सदा स्वस्वरूप ।। ८७ ।। अयोगरूप योग । तेथें नाहीं सिद्धि चांग । नाहीं बुद्धि तेथें सांग । दोघी अभेदपण नाहीं ।। ८८ ।। यालागीं केवळ । गणेश तेथें सबळ । माया मायिक प्रबळ । अभेद हें नाहीं ।। ८९ ।। त्याला काय सांगावें । मुनिभाव तेथें कळावें । गतिवीण काय म्हणावें । यालागीं निवृत्ति ।। ९० ।। शिव विष्णु सूर्य शक्ति । चार देवांचें

ब्रह्मभूतीं । स्वानन्दपर्यंत गति । पुढें नाहीं ॥ ९१ ॥ अयोगरूप समाधी । तेथें चार देवांचें ब्रह्मऋद्धी । नाहीं आहे जाणा कधीं । शास्त्र विचारिजे ॥ ९२ ॥ विष्णुगीताचे ठायीं । ब्रह्मभूत पाही । सर्वत्र मीं अहु ( आहे ) सही । सर्व माझे ठायीं आहे ॥ ९३ ॥ ऐसा साक्षात्कार । जेणें केला साचार । तो मजहून भिन्न सार । मी त्याहून भिन्न नाहीं ॥ ९४ ॥ ऐसें ब्रह्मभूत आहे । चार योगाचें पुढें पाहे । विष्णुगीता प्रमाण नेहे । बोलिजे ऐसें ॥ ९५ ॥ ऐसेंच शिवादिकानें । ब्रह्मभूत सांगितलें मानें । ग्रंथ फार भयानें । मी लिहीत नाहीं ॥ ९६ ॥ गणेशगीताचें ठायीं । विश्वाचे ठायीं मी पाही । माझे ठायीं विश्वही । पाहातो तो स्वानंदीं ॥ ९७ ॥ ब्रह्मभूतास्तत्र जाण । दुजा श्लोक रचिला प्रमाण । यालागीं अयोगीं भान । चाराचें नाहीं ॥ ९८ ॥ संयोग समाधिमय । सकल ब्रह्म संचय । वर्णन आहे राय । सर्वत्र जाणावें ॥ ९९ ॥ चार योगभूमि स्थिति । पांचवे ब्रह्मभूतीं । हें पंचायतन वदती । आपआपुले ठायीं ॥ ४०० ॥ गणेशगीतामध्यें जाण । त्रिविध ब्रह्मभूत भान । संयोग अयोग पण । पूर्णयोग तिसरा ॥ ४०१ ॥ उपायप्रत्यय नामें । असंप्रज्ञात धामें । पूर्ण अयोग धर्में । संपूर्ण झाला ॥ २ ॥ याची पुढें असंप्रज्ञात । नाहीं आहे जाणावा वदत । योगशास्त्र सांगत । ऐसें अखण्ड ॥ ३ ॥ आतां सांगू पूर्ण योग । ऐक वरेण्या चांग । जेणें योगी पूर्ण चांग । तूंच होसी ब्रह्मभूत ॥ ४ ॥ योग शास्त्रीं जाण भेद । शेष नाग वदे प्रचण्ड । योगशास्त्र–कर्ता वेद । शेषनाग स्वयें ॥ ५ ॥ व्यासासी योग द्यावया । त्याची अंजळीमध्यें राया । यव प्रमाणें सर्प गाया । होऊनि आले ॥ ६ ॥ मग स्वरूप दाखविलें । योगशास्त्र सांगितलें । त्याचें नाम झालें । पातंजल ऐसें ॥ ७ ॥ अंजळीमध्यें प्रगटला । यालागीं पतंजली भला । नाम झालें शेषाचें नृपाला । तयानें शास्त्र केलें ॥ ८ ॥ त्याचें नाम धरिलें । पातंजल ऐसें कळलें । तेथें पूर्णयोग सबळें । शेषानें सांगितला ॥ ९ ॥ चित्तवृत्तिनिरोध । जेथें होय सविध । याचें नाम योग सिद्ध । व्यासासी बोधिला ॥ १० ॥ याचीवर व्यासानें । भाष्य केलें प्रमाणें । तेथें सांगितलें ज्ञानें । मूळाची व्याख्या ॥ ११ ॥ चित्ताची भूमी पांच । क्षिप्र मूढ विक्षिप्तसाच । एकाग्र निरोध वाच । या पांच भूमी जाणा ॥ ४१२ ॥ ......–भवप्रत्यय त्रिविध । उपाय प्रत्यय नवविध । असं-

प्रज्ञात समाधी । निरोध भूमि चित्ताची ॥ ४७३ ॥ निरोध भूमि पांचवी । हीच टाकावी जरी भावी । तरी भूमिहीनचित्त भावी । ब्रह्मभूत पदवी झाली॥७४॥ ऐसें योगशास्त्राचें । वर्णन करी व्यासभाष्य साचें । ब्रह्मभूत भूमिहीन वाचे । सर्वत्र जाणावें ॥ ४७५ ॥ इत्यादि. ”

या एकंदर टीकेंत आरंभीं उपरि विवेचित भाष्यार्थाचें स्पष्टीकरण पूर्णपणें आलेलें असून, गाणेश ब्रह्मभूतत्वाचा उपक्रम करतांना, भवप्रत्ययसंज्ञक संयोग समाधीचें व तद्धीन अशा उपायप्रत्यय संज्ञक अयोग समाधीचें स्वरूप स्पष्टपणें कथन केलें आहे; आणि सर्व शास्त्रांच्या मतें परम निर्वृत्तिभूत, पूर्णाभेदस्वरूप म्हणून ठरलेलें जें स्वानंदात्मक स्वस्वरूप, त्याच्याही निःशेषली-नभावाचा प्रत्यय जेथें येतो, तो अयोगरूप समाधि म्हणचेच परम श्रेष्ठ अशी निर्वृत्ति असून, तिच्या योगें सिद्ध होणाऱ्या समाधीनें म्हणजे पूर्ण योगाच्या साक्षात्कारानें प्राप्त होणारें ब्रह्मभूतत्व, तेंच अंतिम ब्रह्मभूतत्व गाणेशब्रह्मभूतत्व होय; असें दर्शविलें आहे. तसेंच संयोगाभेद समाधीमध्येंच सर्वांच्या ब्रह्मभूत-त्वाची परिसमाप्ति होत असल्यानें, परमश्रेष्ठ निर्वृत्तिरूप अयोगामध्यें त्या कोणा-चाच समावेश संभवत नाहीं; अर्थात् त्यांचा वरील ब्रह्मभूतत्वाशीं कांहीं संबंध नाहीं ! असेंहि स्पष्ट केलें आहे. नंतर अशा प्रकारचें श्रीगणेशगीतेंत, गाणेश ग्रंथांत, व वेदशिरःसारभूत उपनिषदांत प्रतिपादिलेलें परम श्रेष्ठ ब्रह्मभूतत्व —पूर्णयोगाचें परम साध्य असें, जें योगसमाधिस्वरूप, त्याचाच अनुवाद पातं-जलयोगशास्त्रांत केलेला आहे; किंबहुना या पूर्ण योगज्ञानाचा उपदेश करण्या-कारितांच भगवान् पतंजलींचा अवतार झालेला आहे; असें सांगून, वेदान्त—सिद्धांतरूप मीमांसा शास्त्रकार अशा श्री वेदव्यासांना त्यांनीं उपदेश केला; इत्यादि कथेचा उल्लेख ‘ श्रीयोगीन्द्र-श्रेष्ठांनीं ’ वरील टीकेंत केला आहे. या-शिवाय त्या पातंजल योगशास्त्रांतील योगसमाधीचें स्वरूप व पूर्णयोगाचें आणि गाणेश ब्रह्मभूतत्वाचें स्वरूप इत्यादिकांचें कथन करणारा, वरील टीकेंतील उल्लेख स्पष्टच आहे; आणि त्याचें तात्पर्य पुनः दुसऱ्या श्लोकावरील भाष्याचें विवेचन करितांना सांगितलें जाईलच ! अस्तु; आतां ‘ योगेन: ’ इत्यादि श्लोका-वरील जें भाष्य आरंभीं उधृत केलेलें आहे; त्याचें तात्पर्य थोडक्यांत सांगूं! म्हणजे

गाणेश ब्रह्मभूतत्व, जें श्रीगणेशगीतेंत वर्णिलें आहे तें पूर्णपणें लक्ष्यांत येईल.

'योगनेति'—( पूर्व श्लोकांत सांगितलेल्या परम श्रेष्ठ निर्वृत्तीला—भव-प्रत्ययातीत अशा उपायप्रत्ययसंज्ञक अयोगरूप निर्वृत्तीला प्राप्त झालेला ) जो योगी, योगसमाधिबलानें—अर्थात् संयोगाऽयोगाभेदरूप अशा पूर्ण योगानें मला—साक्षात् ब्रह्मस्वरूप व पूर्ण योगरूप अशा ब्रह्मणस्पतीला प्राप्त होतो;—अशा प्रकारचा उपक्रम, पूर्णयोगेप्सु वरेण्यराजाला श्रीगणेशगीताशास्त्राचा उपदेश करणाऱ्या भगवान् श्रीगजाननांनीं, पूर्णयोगाचें स्वरूप आणि त्याचें फल-जें अंतिम ब्रह्मभूतत्व, तें कथन करितांना केला आहे. श्रीगणेशगीतेंतील परम निर्वृत्ति म्हणजे अयोगसमाधिरूपा अशीच ती निर्वृत्ति आहे, कारण स्वस्वरूपाभेद-समाधिसिद्धि जरी निर्वृत्तिरूप असली, म्हणजे एकाग्रादी वृत्तींचा पूर्ण निरोध होत असल्यामुळें जरी ती अवस्था पूर्ण वृत्तिहीन असली, आणि म्हणूनच सर्वांच्या ब्रह्मभूतत्वाची समाप्ति तेथेंच झालेली आहे; तरी ती निर्वृत्ति—वृत्तिराहित्य एकदेशीय असून, निरोधवृत्तीचा—निरुद्धावस्थेचाही लय हीच खरी निर्वृत्ति आहे, आणि ती भवप्रत्ययासंप्रज्ञातरूपस्वानंद-योग-समाधीच्या त्यागानेंच लब्ध होणारी आहे; म्हणूनच त्या निर्वृत्तीला 'अयोग-रूपा' असें म्हटलें आहे. हें या पूर्वीच्या विवेचनावरून स्पष्ट झालेलें आहेच. आणि याच अयोगसमाधीचें विस्तृत विवरण, जें भाष्यकारांनीं केलेलें आहे, त्याचें संग्रह—तात्पर्यही मागें प्रस्तुत श्लोकावरील भाष्य उद्धृत करितांना दिले-लेंच आहे. तसेंच वर उद्धृत केलेल्या '**श्रीयोगेश्वरी**' टीकेंत ओंवी ३९८ पासून हें संयोग—अयोग व पूर्णयोगाचें स्वरूप फार उत्तम प्रकारानें सांगितलें आहे. 'संयोग—समाधिरूप स्वस्वरूपाभेदासिद्धि येथपर्यंतचेंच वर्णन सर्वत्र आहे. एकाग्रादि चतुर्विध भूमींच्या त्यागानें प्राप्त होणारी निरोधावस्था पंचम वृत्तिरूप-वृत्तिहीनता, हीच पूर्ण ब्रह्मभूतस्थिति सर्वत्र वर्णिली असून, निरोधाचा त्याग कोठें सांगितलेला नाहीं. वेदांत सांगितलेल्या षड्विध अद्वैत मतांपैकीं शैव, वैष्णव, सौर, शाक्त आणि केवलाद्वैत म्हणजे सामान्यतः तत्वभेदरहित अशा असिलक्ष्य ब्रह्माचें प्रतिपादक, अशा पांचही मतांचें ब्रह्मभूतत्व वरील प्रमाणेंच आहे. श्रीगणेशगीतेंत मात्र संयोग, अयोग आणि पूर्णयोग अशा

तीन प्रकारांनीं ब्रह्मभूतत्व वर्णिलें आहे. चतुर्विध वृत्तिशून्य असें पंचम वृत्तिरूपत्व हा संयोग समाधि वा भवप्रत्यय समाधि असून, पंचविध वृत्तिशून्यस्वरूप अयोगसमाधि होय. याला उपायप्रत्यय अशी संज्ञा असून, वेदांत वर्णिलेली शेवटली ‘मुनित्व’ रूप स्थिति ती हीच आहे. या मुनित्वाच्या त्यागानें म्हणजे भवप्रत्यय व उपायप्रत्यय यांच्या त्यागानें–सर्वथा लीनभावानें–पूर्णाभेदयोगानें, म्हणजेच पूर्णयोग–समाधीनें लभ्य असें ब्रह्मभूतत्व, तेंच श्रीगणेशगीतोक्त परम श्रेष्ठ व अंतिम ब्रह्मभूतत्व होय. पातंजल योगशास्त्रांतही ‘योग म्हणजे चित्ताचा सार्वभौम धर्म’ असा उपक्रम करून, पूर्णयोगसमाधि म्हणजे भवोपाय-प्रत्ययातीत समाधि, अशा स्वरूपानें वरील ब्रह्मभूतत्वच वर्णिलें असून, श्री वेदव्यासांनीं त्यावरील भाष्यांत त्याचें स्वरूप स्पष्ट केलेलें आहे; त्यांत त्रिविध भवप्रत्यय व नवविध उपाय प्रत्ययरूप असंप्रज्ञात समाधीपर्यंत निरोध वृत्तीची व्याप्ति दर्शविली असून,त्या असंप्रज्ञात समाधीचा त्याग म्हणजेच पूर्ण निर्वृत्ति होय; असें सांगितलें आहे. सारांश अशी निर्वृत्ति प्राप्त झाल्यानंतरच्या योगसमाधीनें अर्थात् पूर्णयोगसमाधीनें प्राप्त होणारें ब्रह्मभूतत्व, तेंच श्रीगणेशगीतेचें ब्रह्मभूतत्व होय! ’ इत्यादि. असें त्या टीकेचें तात्पर्य आहे. अस्तु!

अशा त्या पूर्ण योगाचें स्वरूप व फल सांगणाऱ्या ‘**योगेन०**’ या श्लोकांवरील ‘तत्र यस्माद्भव०’ इत्यादि भाष्याचें तात्पर्य असें:—परम निर्वृत्तिरूप मुनित्वभाव म्हणजे अयोग समाधि होय. हाच पूर्ण असंप्रज्ञात होय. स्वस्वरूपांच्या उद्भवाचें म्हणजे भवाचें प्रत्ययस्थान हाच असून, त्याच्या लयाचें कारण तोच आहे. भवप्रत्ययाच्या नाशाचा उपाय, याअर्थीं त्याला उपायप्रत्यय अशी संज्ञा आहे. हें साक्षान्मुनित्वरूप ब्रह्मभूतत्व होय. सारांश विषयांपासून, ब्रह्मांपासून आणि अभेदयोगांपासूनही पूर्ण निर्वृत्ति, येथें प्राप्त होत असल्यानें ही अयोगरूपा परम निर्वृत्ति होय. संपूर्ण अयोगांच्या अभेदसमाधीचेंच हें ब्रह्मभूतत्व आहे. एवंच अशा रीतीनें नानाप्रकारच्या संयोगब्रह्मांचें व अयोगब्रह्मांचें जें पूर्णाभेदस्वरूप, तेंच ब्राह्मणस्पत्यात्मक ब्रह्मभूतत्व वेदांत कथिलें असून, तेंच गाणेश ब्रह्मभूतत्व होय ! कां कीं, श्रीगणेशगीतेंत आरंभीं प्रथमाध्यायांत, पूर्ण योगाचें स्वरूप सांगतांना, ‘शिवे विष्णौ०’ या श्लोकांत

पहिल्या ' योग ' पदानें शिवादि चतुर्विध ब्रह्मांचा अभेद–म्हणजे संयोगात्मक योग सांगून, ' सम्यक् ' पदानें पंचमभूत असा पूर्ण स्वानंद सांगितला; आणि दुसऱ्या ' योग ' पदानें सम्यक्-पदलक्षित अयोगात्मक योगाचा निर्देश करून, दोहोंच्या पूर्ण अभेदानें प्राप्त होणारा जो योग तोच पूर्णयोग ' मम मत ' म्हणजे मला–श्रीगजाननाला–संमत आहे, असें सांगितलें; तसेंच शेवटीं पांचव्या अध्यायांत ' विश्वं मयि० ' इत्यादि पदांनीं संयोगसमाधीचें फल म्हणजे स्वस्वरूप ब्रह्मभूतत्व सांगून ' निर्वृत्तिं प्रा० ' इत्यादिकांनीं अयोगसमाधीचें फल दर्शविलें आहे; आणि अशा द्विविध फलप्राप्तीनें सिद्ध असलेला योगी, योगानें–म्हणजे पूर्णयोगसमाधीनें पूर्ण ब्रह्मभूतत्वाला प्राप्त होतो; असें स्पष्ट करून समाप्ति सांगितली आहे, एवंच तेंच ब्राह्मणस्पत्यक ब्रह्मभूतत्व होय. तात्पर्य अशा प्रकारें **योगानें** म्हणजे सर्व संयोगांच्या व अयोगांच्या पूर्ण अभेदानें–अभेदभावसिद्धीनें, पंचविध चित्तवृत्तींच्या त्यागानें, **जो योगी मला** पूर्णयोगस्वरूप ब्रह्मणस्पतीला, **प्राप्त होतो**; त्याला **मीही** पण प्राप्त होतो. म्हणजे अशा मद्योगानें मद्रूपाप्रत–पूर्णयोगाप्रत प्राप्त झालेल्या त्याला, मी मोठ्या **प्रेमानें मद्रूप करितों**; एतावता संप्रज्ञात व असंप्रज्ञात समाधीपासून मी त्याला मुक्त करितों; आणि मी त्याला कधींहीं सोडीत नाहीं, म्हणजे माझ्यापासून भिन्न करीत नाहीं; किंवा तोही माझ्यापासून कधींही भिन्न होत नाहीं; कारण पूर्णयोग समाधि सिद्ध झाला असतां, संयोग, अयोग किंवा त्यांचा अभेद–संस्कार-शेषमात्र-सुद्धां मुळींच उरत नसल्यानें, त्यागादिकांचा अभावच ठरलेला !! इत्यादि,' असें दुसऱ्या म्हणजे १६ व्या श्लोकावरील भाष्याला अनुसरून, त्याचें तात्पर्य आहे.

या व मागील श्लोकांवरचे भाष्य व टीका फारच विस्तृत आहे; ती मागें सांगितलेल्या कारणांमुळें जरी देतां आली नाहीं, तरी पण श्रीगणेशगीतेंतील मुख्य प्रतिपाद्य विषयाचें स्वरूप व महत्त्व स्पष्टपणें लक्षांत आलें पाहिजे, म्हणून शेवटीं इतका विस्तार करावा लागलाच ! पण तो करणें अवश्यकच होतें; कारण त्यांवाचून इतर गीतादि ग्रंथांतून वर्णिलेलें परमसाध्य

ब्रह्मभूतत्व आणि श्रीगणेशगीतेंतील परम साध्य असें अंतिम ब्रह्मभूतत्व यांमधील तारतम्य लक्षांत आलें नसतें ! अस्तु; तात्पर्य उपनिषदांतून वर्णिलेली पूर्ण ब्रह्मभूतत्वसिद्धि, कैवल्यासिद्धि, भूमाब्रह्मसायुज्य-सिद्धि, पूर्णयोग-समाधिलभ्य अशी जी अंतिम ब्रह्मभावसिद्धि, तेंच श्रीगणेशगीतेंत प्रतिपादिलेलें गाणेशब्रह्मभूतत्व असून, पूर्णयोगस्वरूप अशा श्रीस्वानंदेश गणेशाच्या यथायोग्य उपासनाबलानें यथाक्रम सिद्ध झालेला–असा योगीन्द्रशिरोमणीच त्याला–त्या सर्व श्रेष्ठ ब्रह्मभूतत्वाला प्राप्त होत असतो. हेंच सिद्धान्तरूप तत्त्व, एकंदरींत वरील विवेचनावरून पूर्ण सिद्ध होतें; श्रीयोगीन्द्रमहाराजांनीं वरील दोनही श्लोकांवरच्या विस्तृत टीकेचा उपसंहार करितांना, असेंच तात्पर्य दर्शविलें आहे; तेवढ्या टीकेचें अवतरण घेऊन, या एकंदर विस्ताराचा संक्षेप करूं ! !

पूर्णयोग–समाधीच्या स्वरूपाचा व फलाचा–उपसंहार करणारी–श्रीयोगीश्वरी टीका–ऐसें करितां तोच । योगशांतीरूप साच । ब्रह्मभूत होय वाच । पूर्णयोगी खरा ॥ ५५९ ॥ पंच चित्तवृत्ति खरी । त्यां प्रकाशिली सारी । यालागी चिंतामणि भारी । नाम माझें झालें ॥ ६० ॥ कर्मयोगाचें ठायीं । चिंतामणि सांगितला सही । तोच अवतार पाहीं । माझा जाणावा ॥ ६१ ॥ चिंतामणी मोरेश्वर । ऐसे नाम माझे सार । अवताराचे वाचक पर । पूर्णयोग वाचक पण खरे ॥ ६२ ॥ ऐसा चिंतामणीस । साधून होय सरस । स्वयें चिंतामणी भास । तो योगी खरा ॥ ६३ ॥ ऐसा योग करून । जो मला पावतो जाण । त्याला मी पावतो आपण । एकरूप दोहीं ॥६४॥ द्विविध समाधीहून । संयोग अयोगपण । त्याचे मी मोडितो आपण । मद्रूप करितो ॥६५॥ कधीं त्याला मीच । सोडीना म्हणतो साच। तो मला न सोडी वाच । कधीं राया॥६६॥ मीच आणि तोच एक । देवभक्त योग जाला नेक । मग कसा भिन्न विवेक । होय दोघासी ॥ ६७ ॥ ऐशा योगानें जाण । ब्रह्मभूत आपण । अनंत कल्प भान । तदपि निघेना ॥ ६८ आतां सांगूं कल्प रचना । सिद्धि विनायक भाना । बुद्धि विनायक ज्ञाना । सिद्धि–बुद्धिपति तिजा ॥ ६९ ॥ चवथा मायाहीन । केवळ गणेश भान । हेंच चार अवतरण । माझे मुख्य आहे ॥ ७० ॥ चार खेळ अखण्ड । सदां चालतो प्रचण्ड । तेथें योग साधून पद । योगी मद्रूपीं आला ॥ ७१ ॥ ऐसे

फार उद्धरिले । तरी ते नवीन सबळें । मायानें रचून प्रबळें । खेळत आहे ॥ ७२ चार गणेश अवतार । योग साधून साचार । आले मद्रूपीं पर । तरी सर्व लय होय ॥ ७३ ॥ पुनरपि स्वयें । चार सृजितो पाहे । मनासी आले तरी राय । नाहीं तर नाहीं सृजितो ॥ ७४ ॥ जर चार म्यां सृजिलें । याचें नाम कल्प कळलें । ऐसे अनंत कल्प म्यां केलें । तदपि योगी निघेना ॥ ७५ ॥ मद्रूपीं योग साधून । जो आला मद्रूप होऊन । तो नाहीं निघत जाण । हाच निश्चय ॥ ७६ ॥ मी मायाबलानें । नवीन सृजितो भानें । ते नवें निघते प्रमाणें । योगी निघेना ॥ ७७ ॥ कल्पना करून सृजिते । यालागीं कल्प वदते । ऐसें जाणावें म्हणते । नाना कल्प आहे ॥ ७८ ॥ चार अवस्थादिक । ब्रह्म नाना विवेक । चार देवादि नेक । हे अवघे माझे अवतार ॥ ७९ ॥ कलानें झाले कितुके । कलांशानें कितुके । कलांशाचे कलांशानें देख । कितुके आहे ॥८०॥ तेथें कल्प निराळें । आप आपुले खेळे । ऐसे अपार कळले । कल्प-रचना किती सांगू ॥ ८१ ॥ ऐसें गणेशगीतेचें । ब्रह्मभूत सांगितलें सर्वें । पूर्ण योग वाचे । संपूर्ण सांगितला ॥ ५८२ ॥ इत्यादि--

अशा प्रकारें पूर्णयोगाच्या सांगोपांग विवेचनाचा उपसंहार करितांना, गाणेश-ब्रह्मभूतत्वाच्या अखण्डत्वासंबंधेंही पुन्हां असें सांगितलें आहे कीं, नाना-प्रकारांनीं अनेक वेळा कल्प–रचना झाली, आणि तिला अनुसरून नानाविध जगांचा व ब्रह्मांचा उद्भव व लय पुनः पुनः सांगितला असल्यानें, तशा प्रकारें जगद्ब्रह्माची लयोत्पत्ति होत असली, तरी पूर्ण योगसमाधीनें ब्रह्मभूतत्वाला प्राप्त झालेला योगी मात्र कोणत्याच प्रकारच्या लयोत्पत्तीला केव्हांही पात्र होत नाहीं ! म्हणजे ज्याप्रमाणें त्वंपदात्मक अशा जागृदादि चतुर्विध ब्रह्मांचा अथवा तत्पदात्मक चतुर्विधांचा किंवा असिस्वरूप अशा असत्सदादि स्वानंदब्रह्म–चतुष्टयाचा, अतएव तत्त्वमस्यात्मक अशा चतुर्विध ब्रह्मविहाराचा लय आणि उद्भवही, तत्त्वमस्यातीत अशा पूर्णयोगरूपापासून–भूमाब्रह्मापासून, सांगितलेला असल्यानें, त्यांच्या त्या तत्त्वमसिरूप अशा चतुर्विध ब्रह्माच्या ठिकाणीं स्वस्वरूपाभेद समाधीनें लीन झालेल्या अर्थात ब्रह्मभूत झालेल्या यो-

ग्याला, त्या त्या ब्रह्माबरोबरच अर्थात्–पुनरुद्भवाच्या प्राप्तीचा संभव निश्च· यानें असतो; म्हणजेच शिव–विष्णादि ब्रह्मांच्या ठिकाणींच ब्रह्मभूत झालेल्या त्या त्या योगीजनांचें तें ब्रह्मभूतत्व अपूर्णच असतें; तशा प्रकारचा संभव पूर्ण-योग समाधीच्या सिद्धीनें प्राप्त झालेल्या ब्रह्मभूतत्वाच्या, अर्थात् श्रीगणेशगी· तोक्त गाणेश ब्रह्मभूतत्वाच्या–ठिकाणीं मुळींच नसतो; म्हणूनच ते खरेंखुरें परिपूर्ण व अंतिम ब्रह्मभूतत्व होय; हें निर्विवाद आहे ! इत्यादि !!

एवंरीत्या श्रीमद्गणेशगीतेंतील एकंदर सर्वच विषय पूर्ण सिद्धान्त–बोधक असा असल्यानें, वरवर पाहणाराला जरी तो सर्वसाधारण व सुलभग्राह्य असा वाटून, ' सर्वत्र प्रतिपादिलेल्या तत्वांचीच ही एक नक्कल आहे, ' अशासारखी त्याची समजूत झाली, तर ती भ्रामकच होय यांत संशय नाहीं ! कां कीं, सर्वशास्त्र–सिद्धान्तभूत अशा श्रीयोगामृत शास्त्राचें परम रहस्य–सारसर्वस्व अशी ही श्रीगणेशगीता ' **उपनिषदर्थगर्भा** ' या अन्वर्थक संज्ञेनें युक्त असून, पूर्णाद्वैत–सिद्धान्त–बोधक प्रस्थानत्रयांत तिचें ग्रहण केलेलें आहे, आणि यथोक्त अधिकार संपादन करून, भाष्यादिकांच्या द्वारानेंच कोणालाहि तरी तिच्या अर्थाचें यथार्थ व परिपूर्ण ग्रहण होणें शक्य आहे; हें स्पष्ट आहे अस्तु ! याप्रमाणें श्रीगणेशगीता पूर्णप्रतिपादक असून, तदन्तर्गत समाधिभेदाचें प्रतिपादन शाखाचंद्र–न्यायानें इतर गीतांतून आलेलें आहे, असें ठरतें. म्हणजे भगवद्गीतादि गीता अंशरूप असून, श्रीगणेशगीता अंशीरूप आहे. यामुळें म्हणजे पूर्ण अंशीरूप व मूलभूत अशा गणेशगीतेच्याच एक एका अंशाचें प्रतिबिंब इतर गीतांतून पडलेलें असल्यानें तिचा इतर गीतांशीं सादृश्यत्वाचा भास होतो ! वस्तुतः असणाऱ्या सूक्ष्म भेदाचें–अंशांशीभावाचें स्वरूप–मुख्य प्रतिपाद्य विषयासंबंधीं आतांपर्यंत विस्तारानें आलेलें आहेच.आणखी स्पष्टतेकरितां कांहीं स्थलांचा निर्देश करून नंतर, दोनहि गीतांतील अध्याय-समाप्तीच्या संकल्पासंबंधें व श्रीगणेशगीतेच्या संप्रदाय-परंपरेसंबंधेंहि विचार करूं !

## श्रीगणेशगीता व भगवद्गीता यांमधील अंशांशीत्वभाव-निदर्शक कांहीं स्थळें !

' ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।

ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्म समाधिना ॥ २४ ॥'

भगवद्गीता—अध्याय ४

'अहमग्निर्हविर्होता हुतं यन्मयि चार्पितम् ।
ब्रह्मासव्यं च तेनाथ ब्रह्मण्येव यतो रतः' ॥ ३० ॥'

गणेशगीता—अध्याय ३

'अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः ।
प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम् ॥ १४ ॥

भ. गी. अ. १५

'सर्वेन्द्रियाण्यधिष्ठाय जाठरं च धनंजयम् ।
भुनज्मि चाखिलान् भोगान् पुण्यपापविवर्जितः ॥ ३८ ॥

ग. गी. अ. ९

वरील दोन्ही श्लोकांतील भेद—अंशांशीभेद—लक्ष्यांत ठेवण्यासारखे आहेत; श्रीकृष्णांनीं सांगितलेल्या आपल्या विभूतींत व श्रीगणेशाच्या विभूतींतही असाच प्रकार दिसून येतो:—

श्रीभगवद्गीतेंत ' आदित्यानामहं विष्णुः ' असें आहे, तर श्रीगणेशाच्या 'योगगीता ' नामक उत्तरगीतेंत ' आदित्यानां विनायकः ' असें सांगितलें आहे; म्हणजे भगवद्गीतेंत प्रतिपादिलेला भगवान महाविष्णु यासह शिवादि जगदीश्वरांना जिंकून, त्यांना पदभ्रष्ट करून, ब्रह्मांडांचें राज्य करणारे असे जे देवांतक व नरांतक नामक असुर, त्यांना मारण्याकरितां आणि विष्णवादिकांना पुनः स्वपद-स्थित करण्याकरितां, त्यांच्याच प्रार्थनेवरून, प्राकृतरूपानें कश्यप व अदिती यांच्या येथें झालेला, श्रीस्वानंदेश गणेशाचा ' विनायक ' संज्ञक अवतार होय; अर्थात् स्वयंसिद्ध सत्ताधीशत्व व सर्वेश्वरत्व-द्योतक अशी ही श्रीगणेशाची विभूती आहे. आणि विष्णूची विभूती म्हणजे बलीच्या निग्रहाकरिता झालेला ' वामन, ' संज्ञक अवतार असून, त्यालाही पुनः तें अवतार कार्य—बलीनिग्रहाचें कार्य—संपादन करण्याकरितां श्रीगणेशाचीच आराधना करावी लागली ! असें दोन विभूतींतील अंतर आहे. तसेंच ' यज्ञानां जपयज्ञोऽस्मि ' अशी भगवद्गीता आहे, तर ' यज्ञेषु ज्ञानरूपधृक् ' असें योगगीतेंत सांगितलें आहे. अथवा ' अक्षराणामकारोऽस्मि ' या भगवद्गीतोक्त

विभूतीच्या निदर्शनाप्रमाणें, विष्णु ॐकाराचा एक अंश अशा अकाराचा वाचक असल्यानें ठरतें; तर 'वर्णेष्वोंकार एव सः' या योगगीतोक्त निदर्शना-प्रमाणें गणेश हा पूर्ण ॐकार-स्वरूप असल्यानें, पूर्णपणें अंशी-रूप असल्याचें सिद्ध होतें, अशा प्रकारचें अंशांशीरूप अंतर सर्वत्रच दिसून येतें; इतकेंच नव्हे तर, श्रीभगवद्गीतेंत जें 'वासुदेवाख्य' पर तत्त्व उक्त आहे, तेंच श्रीस्वानंदेशाची विभूति असल्याबद्दल 'आनन्दः समभावेषु' म्हणजे समस्वरूप ब्रह्मविहारांमध्यें 'आनन्द' संज्ञक वैष्णव ब्रह्म, ही गणेशाची विभूति आहे; किंवा 'पालकेषु जनार्दनः' म्हणजे पालन करणाऱ्यांमध्यें विष्णु ही गणेशाची विभूति आहे; इत्यादि प्रकारच्या श्रीयो-गगीतोक्त निर्देशावरून ठरत असल्यामुळें, म्हणजे श्रीविष्णूचा सगुणविहार व निर्गुणविहारहि अशा रीतीनें श्रीस्वानंदेशाच्या एका विभूतीचाच वाचक आहे, हें सहजच सिद्ध असल्यानें, भगवद्गीतोक्त विभूती श्रीगणेशाच्या विभूतीच्याही विभूति होत! हें स्पष्ट लक्षांत येतें! शेवटीं विभूतियोगाचें सार सांगतांना, 'यद्यद्विभूतिमत् सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा। तत्तदेवागच्छ त्वं मम तेजोंशसंभवम्॥ ४१॥ (श्रीभ. गी. अ. १०) या श्लोकांत श्री-कृष्णांनीं, अनेकविध ऐश्वर्यांपैकीं, आपलें 'लक्ष्मीश' स्वरूप ऐश्वर्य सांगितलें आहे, तर 'यद्यच्छ्रेष्ठतमं लोके सा विभूतिर्निबोध मे॥ २४॥' (श्रीग. गी. अ. ७) किंवा 'लोकेषु तत्त्वमुख्येषु जगत्सु ब्रह्मसु प्रभोः। ये श्रेष्ठास्तस्य ते सर्वे विभूतिपदधारकाः॥ ४॥' (श्रीयोगगीता-अ० ६); यांत श्रीगणे-शाचें 'सर्वेश्वर' स्वरूप-ऐश्वर्य कथन करून, पराकाष्ठा दर्शविली आहे; तात्पर्य श्रीगणेशगीता व भगवद्गीतादि इतर गीता यांचें सूक्ष्म पर्यालोचन केल्यास, असें स्पष्ट दिसून येतें कीं, त्या इतर गीतांतून जे विषय अंगुलीनिर्देशानें व एकदेशीयत्वानें एक-एकांशभावानें सांगितले आहेत, तेच या श्रीगणेशगीतेंत प्रायः स्वकीयाभेदत्वानें व पूर्णत्वानें-अंशीभावानें कथन केले आहेत; हा येथील विशेष आहे!

## अध्याय-समाप्ति संकल्पाचा विचार!

श्रीभगवद्गीतादि गीताचतुष्टयापैकीं प्रत्येक गीतेच्या प्रत्येक अध्यायाची समाप्ति प्रायः-'इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे.' किंवा

'इति श्रीपद्मपुराणे उपरि भागे शिवगीतासूपनिषत्सु ब्र० यो०' अशा सामान्य स्वरूपानें केलेली आहे; सूर्यगीता व देवीगीता यांचाही प्रकार असाच आहे! परंतु श्रीगणेशगीतेंतील अध्याय-समाप्तीचा संकल्प मात्र या सर्वांहून अगदीं भिन्न व विशेष स्वरूपाचा पूर्णप्रतिपाद्यसूचक—असा असून, तो तिचें—श्रीगणेशगीतेचें सर्वश्रेष्ठत्व व योगामृत शास्त्ररहस्यभूतत्वच स्पष्टपणें दर्शवित आहे. त्याच्या प्रत्यंतराकरितां, यापुढें तिच्यांतील प्रथमाध्यायाच्या समाप्तीचा संकल्प, त्यावरील **श्रीगार्ग्यभाष्य** व **श्रीयोगीश्वरी** टीका, हीं दिलीं आहेत. त्यावरून सर्व लक्ष्यांत येईल.

'ॐ तत्सदिति श्रीमद्गणेशगीतासु **उपनिषदर्थगर्भासु योगामृतार्थ**—शास्त्रे-श्रीपद्मादिगणेशपुराणे- श्रीगजाननवरेण्यसंवादे सांख्ययोग-सारार्थ योगो-नाम प्रथमोऽध्यायः॥'

**श्रीमद्गार्ग्य-भाष्य**—सर्वं कर्मादिकं ब्रह्मार्पणात्मकं 'ॐतत्सदिति'। '**इति**' शब्दः समाप्तिवाचक इति। गणेशस्य स्वरूपगानं करोतीति—**गणेश गीतेति**। तासु—सगुणनिर्गुणादि—भेदायुक्तास्विति। **उपनिषद्गर्भासु**—उप-समीपेप्राप्तिं करोति-कारयतीति। निषत्—तिष्ठतीति। अर्थगर्भासु—गूढार्थयुक्ता स्विति। **योगामृतार्थ शास्त्रे**—योगः—संयोगायोगभेदात्मकः—तदेव अमृतं—जन्ममृत्युनिकृन्तनमिति। तदेवार्थः प्रयोजनमिति। शास्त्रे—शिक्षया तादृशं करोति—तस्मिन्निति। सर्वादौ व्यासाग्रे ब्रह्मणा कथितत्वात्—**आदि गणेश-पुराणे**—गणेशस्य पुरातन स्वरूपपर्यंतं यत्रेति। गजा०वरेण्यसं०। संख्यांकृत्वा कृत्वा यद्गहितं तदेव **सांख्यं** ब्रह्मेति। **योगः** संख्यां संख्यां प्रति साधनरूपेण तादृशं करोति। पूर्णयोगपर्यंतं तदेव योग इति। तयोः **सारार्थं** मूलभूतं तस्य योगः प्राप्तिरूपात्मकः प्रथमोऽध्यायः इति॥ १॥

**श्री योगेश्वरी टीका**—आतां सांगूं समाप्ति। अर्थ अध्यायीं लिहिती। शेवट गीताचा वदती। ऐकिजे यथार्थ॥ २६७२॥ ॐकाराकृति जग। आणि वेदशास्त्रादि सांग। तेथें सांगितलें चांग। नाना जग कर्मभेद॥ ७३॥ कर्मानें नाना गति। स्वर्ग नरक प्राप्ति। ब्रह्मभूत नर जाती। होति हेंच तत्

शब्द जाण् ॥ ७५ ॥ कर्माकर्म-विकर्म । योगादिक मार्ग धर्म । हेंच जाणावें वर्म । सत शब्दार्थ ॥ ७६ ॥ यालागीं सकळिक । ॐतत्सत् वदती नेक । तेणें होय सर्व देख । मद्रूप भाव जगादिक ॥ ७७ ॥ इति जाणा समाप्ति । वाचक वेद वदति । यालागीं इति म्हणति । शेवट काळीं सर्व ॥ ७८ ॥ श्री-शोभाचें नाम जाण । तेणें युक्त प्रमाण । श्रीमत् म्हणावें ज्ञान । यालागीं सर्वांनें ॥ ७९ ॥ गणेशाचें जें ब्रह्म । सगुणनिर्गुणादि धर्म । नानाभेद सांगती वर्म । यालागीं गणेशगीता ॥ ८० ॥ स्वयें गणेशानें गान । केलें आपुलें भान । दुजा अर्थ प्रमाण । यास्तव गणेशगीता ॥ ८१ ॥ नाना भेद गणेशाचा । सांगि-तला जेथें साचा । यालागीं बहु वाचा । गीतासु ऐसें वचन ॥ ८२ ॥ नाना ब्रह्म सन्निध करित । यथाविधीनें म्हणत । यालागीं उपनिषद् । नाम वदती ॥ ८३ ॥ नाना ब्रह्म वर्णन । संक्षेपानें प्रमाण । ब्रह्मणस्पति ज्ञान । पूर्ण आहे जेथें ॥ ८४ ॥ सकल वेदशास्त्रादिक । त्याचें रहस्य नेक । पूर्ण सांगितलें देख । गीतांमध्यें सर्व ॥ ८५ ॥ अर्थ गंभीर अपार । न कळे गीता सार । गणेश दयाविण पर । अंतर्गर्भ आहे ॥ ८६ ॥ यालागीं जाण विवेक । अर्थ–गर्भासु देख । पद ठेविलें नेक । गणेश गीतामध्यें ॥ ८७ ॥ अन्य गीताचे ठायीं । नाना वर्णन सहि । तेथें अर्थगर्भ नाहीं । पद लिहिलें जाण ॥ ८८ ॥ योग नाम अभेद । सकल अभेदाचे वेद । नाना अभेदरूप वद । भेद ब्रह्मवाचक ॥ ८९ ॥ सकळ भेद ब्रह्म । आपआपले धर्म । अभेदरूप वर्म । ब्रह्मभेद टाकिती ॥ ९० ॥ सकळ ब्रह्मभेद । अभेद पावले वेद । वदती त्याला सद्य । योग नाम जाण ॥ ९१ ॥ सकळ संयोग योग । अयोग आदि सांग । योग पावले चांग । अभेदपणीं ॥ ९२ ॥ यालागीं योग नाम । योगास दुजें ठायीं वर्म । योग नाहीं अभेद धर्म । यालागीं ब्रह्मणस्पति ॥ ९३ ॥ सकळ ब्रह्मांचा पति । योग ब्रह्मणस्पती । तेथें नराची गति । अभेदरूप होती ॥ ९४ ॥ तेणें जन्ममरण । नाहीं होत कधीं जाण । यालागीं अमृतपण । पद ठेविलें खरें ॥ ९५ ॥ सकलांसी शिक्षा करी । यालागीं शास्त्र नामधारी । शास्त्राची आज्ञावरी । सर्व चालती ॥ ९६ ॥ नाहीं ऐकें शास्त्रवचन । त्याला नरक प्रमाण । शास्त्रानें यम

जाण । करितो आज्ञाधारी ॥ ९७ ॥ यालागीं शास्त्राज्ञाविण । कोणी नाहीं प्रमाण । शास्त्र शब्द स्वयें जाण । लिहिला येथें ॥ ९८ ॥ श्रीमत शोभायुक्त । गणेशाचें म्हणत । पुरातन रहस्य वदत । यालागीं गणेशपुराण ॥ ९९ ॥ सर्वांहूनि व्यासासी । ब्रह्मा सांगतो रसी । मग पुराण प्रकाशी । नाना भेदाचे ॥ २७०० ॥ यालागीं आदि पुराण । गणेशाचें पुरातन । आदि गणेश पुराण सांगती मुनिजन ॥ १ ॥ गजाननाचा जाण । वरेण्याचा प्रमाण । संवाद पुसणें सांगणें । यालागीं ऐसें पद ॥ २ ॥ नाना ब्रह्मांची संख्या । करिते झाले देखा । अंतीं मौन विवेका । पडती नराशी ॥ ३ ॥ संख्याकरितां उरत । त्याला वेद म्हणत । सांख्य ब्रह्म नाम गत । जाण भूपा खरें ॥ ४ ॥ सांख्य ब्रह्म विदेह । मागें सांगितलें नेह । तेंच ब्रह्म नाहीं स्नेह । येथें मान्य खरें ॥ ५ ॥ सांख्य नामें पूर्ण योग । तेथें जाणावा सांग । सांख्याचे अर्थ चांग । नाना आहे ६ सांख्य ज्ञान व्यापक । आत्मादि शब्द नेक । स्वकीय ब्रह्मवाचक । पूर्ण योग-वाचक पण खरे ॥ ७ ॥ जे जे ब्रह्मवर्णन । तेथें त्याचें साधन । तदर्थ करून जन । ब्रह्मीं अभेद होतो ॥ ८ ॥ याचे नाम योग जाण । ब्रह्मीं योग करितो ज्ञान । जनांस भूमी दावून । यालागीं योग नाम ॥ ९ ॥ पूर्णयोगी योगरूप । क्रमें क्रमें करी स्वरूप । मग सांख्य योग दोन भूप । एक रूप होत ॥ १० ॥ माझें नाम योग । तो दुजा जाण चांग । शब्दाचे अर्थसांग । अपार आहे ११ सांख्य योगाचा सार । पूर्ण योग प्राप्ति पर । तेथें अभेद नर । पूर्ण ब्रह्मभूत ॥ १२ ॥ यालागीं सांख्ययोग । सारार्थ नाम सांग । अध्याय प्रथम चांग । सांगितला खरा ॥ २७१३ ॥

इत्यादि; या एकंदर विस्तृत टीकेवरून वर दिलेल्या भाष्याचें तात्पर्य फारच स्पष्ट रीतीनें दर्शविलें गेलें आहे; आणि त्यावरून श्रीमद्गणेशगीता व इतर गीता यांच्यामधील संकल्पांतूनही विशेषाविषेत्वदर्शक महदंतर कसें आहे, हें कळून येतें. अस्तु; अशा रीतीनें संकल्पाचा विचार केला असतां, त्यावरूनहि श्रीमद्गणेशगीतेचें सर्वश्रेष्ठत्व, पूर्णब्रह्मप्रतिपादकत्व, सर्व सिद्धांतबोधकत्व, पुरातनत्व आणि स्वयंसिद्ध-मूलभूतत्व इत्यादि इत्यादि कोणाहि प्रांजलबुद्धि जिज्ञासूच्या सहज लक्षांत आल्यावांचून राहात नाहीं !

## फलसिद्धीचें दिग्दर्शन.

याशिवाय निराग्रह बुद्धीनें, श्रीगणेशगीता व श्रीभगवद्गीतादि इतर गीता यांच्या अंतिम फलसिद्धीसंबंधें वगैरे विचार केला तरी, **श्रीगणेशगीतेचें विशेषत्व** हें दिसतें कीं, तिचा वक्ता, श्रोता, व विषय, हे सर्वच अत्यंत उच्चतम असून, तिचें पर्यवसानही तशाच अत्यंतिक फलसिद्धींत–अंतिम ब्रह्मभूयसिद्धींत झालेलें आहे; वक्ता–**श्रीगजानन**–संज्ञक आवतारधारी श्रीस्वानंदेश, म्हणजे साक्षात्तत्वमसिबोधक अशा प्रणवमुखानें युक्त–असा अखिल विद्यापति–श्रीब्रह्मणस्पति होय; याचें स्पष्टीकरण मागें झालेलें आहेच. ॐकारप्रभवा वेदाः, –'यस्य निःश्वसितां वेदाः'इत्यादि स्पष्ट असून, ॐकारापासूनच विष्णु–शिवादिकांची उत्पत्ति झाल्याचें शास्त्रप्रसिद्ध आहे. आणि त्याचेंच प्रत्यंतर 'मत्त–एव महाबाहो जाता विष्णवादयः सुराः' या श्रीगणेशगीतोक्त वचनावरून येते ! त्याचप्रमाणें श्रीगणेशगीतेचा श्रोता तरी यथायोग्य तपःसंपन्न, पूर्णयोग–प्रबुद्ध मुमुक्षु **वरेण्यराजा**, अर्थात श्रेष्ठ अधिकारीच असून, **विषय–पूर्णयोग** ( परमशांती ) हा आहे ! आणि या त्रयीच्या ऐक्याचें निश्चित ठरलेलें फल जें **ब्रह्मभूयसिद्धि**, तेंच वरेण्य राजाला मिळालें आहे. तेंच भगवद्गीतादिकांविषयीं पहा ! भगवद्गीतोक्त ज्ञान अर्जुन पुढें विसरला; हें उत्तर गीतेंत व अनुगीतेंत स्पष्ट सांगितलें आहे. तसेंच शिवगीतोक्त ज्ञान रामचंद्रही विसरले; आणि नंतर पूर्ण ज्ञानसिद्धीकरितां त्यांना योगवासिष्ठ ऐकावें लागलें, हें शास्त्रप्रसिद्ध आहे ! यथोक्त अधिकारसिद्ध अशा वरेण्यराजाला, तशा पात्रतेला अनुसरूनच श्रीगणेशगीता उपदेशिली गेली आहे; आणि अर्थात् तिच्या श्रवणानंतर तो कृतकार्य असा ब्रह्मभूतच झाला. 'उपदिष्टं यथा योगमास्थाय मुक्तिमाप्तवान्'–त्यास पुनः ज्ञान ऐकण्याचें वगैरे प्रयोजनच उरलें नाहीं ! हें श्रीगणेशगीतेचें सर्वश्रेष्ठत्व व अनुपमत्वच होय. यांत तिळमात्र शंका उरत नाहीं ! तिच्या 'उपनिषदर्थगर्भा' या अन्वर्थक संज्ञेवरूनही हेंच स्पष्ट प्रतीत होतें. तात्पर्य पूर्वोक्त क्रमाला अनुसरून, श्रीगणेशगीता व भगवद्गीता अथवा इतर गीता, यांच्या प्रयोज-

नादिकांविषयीं आतांपर्यंत बऱ्याच विस्तारानें केलेल्या विवेचनाचा, एकंदरींत विचार केला असतां, श्रीभगवद्गीता पूर्णाद्वैतासिद्धांतास आरंभभूत–अतएव पूर्ण-सिद्धीला प्रथम सोपानरूप अशी असून, श्रीगणेशगीता पूर्णप्रतिपादक अतएव सर्वसिद्धांत- बोधक अंतिम ब्रह्मभूतत्वरूप–अखिल सोपान–परमकाष्ठा-रूप आहे; हेंच पूर्णपणें निश्चित होतें. तसेंच पुनः हेंही स्पष्ट होतें कीं, गणेशगीतेचें तर राहोच ! पण इतरगीतांपैकीं कोणतीही एकादी गीता, दुसरीची नक्कल आहे–हें म्हणणें भ्रामक असून, अज्ञानमूलक आहे ! तर त्या सर्व गीता विशिष्ट अधिकारक्रमाला अनुसरूनच उपदेशिल्या आहेत व प्रवृत्त झाल्या आहेत ! एतावताः—

## शेवटीं

रहस्यकारांनीं गीतारहस्यांत निश्चयानें दर्शविलेलें, "तथापि या सर्व गीतांची रचना किंवा त्यांतील विषयांची जुळणी पाहिली तर, हे सर्व ग्रंथ भगवद्गीता प्रसिद्धीस येऊन ती लोकमान्य झाल्यानंतर–रचले गेले असावेत, असें दिसून येतें; किंबहुना **भगवत्गीतेसारखी** एखादी विशिष्ट **गीता** आपल्या पंथांत अगर पुराणांत असल्याखेरीज त्याची **पूर्तता** होत नाहीं, **एवढ्याच** समजुतीनें या निरनिराळ्या गीता **निर्माण** झाल्या आहेत, असें म्हटलें तरी चालेल." ( गी. र. पृ. ५–६ ) हें केवळ अनुमानिक अथवा मिथ्या-भासमूलक तार्किक मत, शास्त्रपरंपरेच्या सर्वथा विरुद्ध–केवळ भ्रांतिमूलकच असल्यानें त्याज्य आहे, हें निर्विवाद सिद्ध आहे. आणि मग 'श्रीगणेशगीतादि इतर गीता थोड्या शब्दभेदानें श्रीभगवद्गीतेच्याच नकला होत.' या म्हणण्यांतही पण मुळींच अर्थ उरत नाहीं ! शिवाय येथवरच्या एकंदर विवेचनावरून व श्रीगणेशगीतेच्या पूर्ण स्वरूपावरून पाहतां, त्या स्वरूपाचें यथार्थ ज्ञान नसतानां आणि त्या स्वरूपादिकांविषयीं मूळांतील व्यवस्था काय आहे, इत्यादिकांचा विचारही न करितां, वरील प्रकारचें सर्वथा विपरीत असें मतप्रदर्शन व तेंही निश्चितार्थद्योतक असें, करणें म्हणजे मोठें आश्चर्यच नव्हे काय ? किंबहुना तें अप्रामाणिकच ठरेल ! परंतु सांप्रत काल गौरवानुरूप जो शुद्ध संप्रदायपरंपरेचा सर्वथा लोप झाल्यासारखा दिसतो, त्यामुळें तें तसें विपरीत मत–प्रदर्शन अपरिहार्य ठरतें ! या आपत्तीचें स्वरूप लक्षांत घेऊनच,

वरील गीतारहस्यांतील उपेक्षणीय मताच्या निमित्त-कारणानें श्रीगणेशगीतेच्या विशेष स्वरूपाचें यथामति दिग्दर्शन केलें आहे. आतां शुद्ध संप्रदाय-परंपरेच्या महत्त्वादिकांसंबंधीं व श्रीगणेशगीतेच्या पुरातनत्वासंबंधीं वगैरे दोन शब्द लिहूं !

## संप्रदायाचें महत्व !

सनातन वैदिक धर्माचें रहस्य यथार्थपणें समजून, तदुक्त परम शांतीचा–शाश्वत सुखाचा अनुभव येण्यास धर्मप्रमाणभूत अशा विद्यास्थानांचें-शास्त्रांचें समरस ज्ञान-यथार्थ ज्ञानच सर्वांशीं मुख्यत्वेंकरून कारणीभूत आहे. हें ज्ञान प्राप्त होण्यास केवळ नुसता ग्रंथाभ्यासच उपयोगी पडत नसून, त्याच्या सिद्धी-करितां प्रथमतः स्व-स्ववर्ण आणि आश्रम यांच्या धर्माचें अनुष्ठान घडणें अत्यंत अवश्यक असतें; तसेंच त्याबरोबर अद्वैत सिद्धीकरितां अवश्य सांगित-लेल्या वैदिक उपासना-मार्गाचें, स्वस्वमतधर्माचें अनुष्ठान आणि तदंग आचा-र्योपासनही अवश्य असतें. त्यावांचून यथार्थ ज्ञानाची व ज्ञानसिद्धीची प्राप्ति होणें, अशक्य आहे. आणि यथार्थ ज्ञानाच्या अभावीं नाना प्रकारचे तर्क-वि-तर्क उत्पन्न होऊन, ‘ विद्या ब्राह्मणमेत्याह शेवधिस्तेऽस्मि रक्ष मां । असूयकाय मां मादास्तथा स्यां वीर्यवत्तराम् ॥ ” या शास्त्रमर्यादेचें उल्लंघन घडण्यानेंच अर्थात् त्या विद्येला–ज्ञानाला निर्वीर्यत्व प्राप्त होत असल्यामुळें. सर्वथा सत्सं-प्रदायविरुद्ध व अनर्थकारक अशा पाखण्ड मतांचाच उद्भव निश्चयानें ठरलेला ! हा शास्त्रांचा सिद्धांत असून अनुभवही तसाच आहे. एवढ्याकरितां ‘ यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ । तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः।’ या श्रुतिवाक्यांत आचार्यसेवेचें अत्यंत अवश्यकत्व सांगितलें आहे. सारांश अशा रीतीनें-यथार्थ ज्ञानसिद्धीकरितां मूळ ज्ञानमार्ग-प्रवर्तक आचार्यांची कृपाच अवश्यक ठरत असून, त्या कृपेचें संपादन व तदनुकूल पात्रता प्राप्त व्हावी, याकरितां मूळापासून प्रवृत्त असलेल्या ज्ञानमार्गपरंपरेला–अविच्छिन्न संप्रदायप-रंपरेला फार महत्व असल्याचें सांगितलें आहे; किंबहुना सच्छास्त्र–संप्रदायपरं-परेला सोडून वागणारा पुरुष कितीही शास्त्रग्रंथव्यासंगी विद्वान असला तरी त्याची गणना हटकून मूर्खांतच होण्यासारखी आहे ! असें श्रीमच्छंकर-भगव-त्पाद-योगीन्द्रांनीं, श्रीभगवद्गीता अध्याय १३ श्लोक २ वरील भाष्यांत,

' आत्महा स्वयं मूढोऽन्यांश्च व्यामोहयति । शास्त्रार्थसंप्रदाय-रहितत्वात्-श्रुत-हानिमश्रुतकल्पनां च कुर्वन् । तस्मादसंप्रदायवित् सर्वशास्त्रविदपि मूर्खवदेव-उपेक्षणीयः । इत्यादि ' अगदीं स्पष्ट म्हटलें आहे.

यावरून संप्रदायशुद्धीचें महत्त्व व यथार्थ ज्ञानसिद्धीकरितां अवश्यकत्व किती आहे, आणि श्रीमदाचार्यहि त्याला कसें महत्व देतात व तें किती यथार्थ आहे, हें व्यक्त होतें ! म्हणूनच जेव्हां जेव्हां कालप्रभावाला अनुसरून, अशा प्रकारचा शुद्ध संप्रदाय शैथिल्यादि दोषांमुळें मलीन होत्साता-लुप्त होऊं लागतो; आणि मग अशा संधीचा फायदा घेऊन, असत्कालाला—जणुं सहाय्यक असलेले लोक—अर्थात नानाप्रकारांनीं विरुद्धार्थांचें प्रतिपादन करणारे, भिन्न भिन्न मतवादी लोक आपआपले घोडे पुढें ढकलण्याचा प्रयत्न करीत असतात ! तेव्हां तेव्हां त्या विरुद्ध मतांचें खण्डन करून, यथार्थ ज्ञानमार्ग प्रकट करण्या-करितां कालानुरूप वेदपुरुषादि परमाचार्यांचें अवतार—अंशावतार वारंवार होत असतात; आणि लुप्त होऊ लागलेला तो परम विमलसंप्रदाय सोज्वलपणें प्रवृत्त करितात. असा नित्य नियतक्रमच ठरलेला आहे. खरोखर वर्णधर्मरक्षक विष्णु-शिवादि देवांच्या अवतारांहून, या तत्त्वज्ञानप्रवर्तक आचार्यांच्या अव-तारांचेंच महत्त्व विशेष आहे यांत संशय नाहीं ! वरील नियतीप्रमाणेंच पूर्वका-लापासून आजवर वेळोवेळीं असे अनेक आचार्यांचे अवतार झालेले असून, त्यांनीं प्रवृत्त केलेला शुद्ध संप्रदाय त्यांच्याच कृपेनें अविच्छिन्न चालत आलेला असून, पुढेंहि तो तसाच चालत राहाणार ! याविषयीं शंका नको. सनातन वैदिक धर्माचें श्रेष्ठत्व व सतेजस्त्वच असें विशिष्ट प्रभावी आहे.

उपर्युक्त नियतीला अनुसरून जे जे आचार्य आजवर होऊन गेलेले, वेद-पुराणादिकांतून प्रसिद्ध आहेत, त्यांपैकींच भगवान् **श्री गार्ग्यमहर्षि** हे एक होत. यांचा उल्लेख पुष्कळ उपनिषदांतून ' तत्त्वज्ञानोपदेष्टे ' म्हणून आलेला असून, श्रीमद्योगगीतेंत त्यांचा निर्देश ' गार्ग्य हे श्री**गणे**शाची एक विभूति आहेत ' अशा प्रकारें आलेला आहे. हे महर्षि सर्व महर्षि-मण्डळांत अत्यंत विद्वान् असल्यानें, त्यांना ' **सिद्धान्त—भाष्यकार** ' अशी अन्वर्थक संज्ञा प्राप्त झालेली आहे. पूर्वीं एका त्रेतायुगांत वेदादि विद्यांच्या उद्धाराकरितां,

श्रीस्वानंदेशाचा 'कपिल' [ अथवा मयूरेश्वर ] नामक एक अवतार झाला होता, त्यावेळीं 'कमलासुर' नामक दैत्याचा नाश करून वेदविद्या प्रकट केल्यानंतर, त्या अवतारांत परम मित्र असलेल्या, या गार्ग्य महर्षींना, त्यानें–श्रीमयूरेश परमात्म्यानें श्रीमद्गणेशगीतेवर यथार्थ ज्ञानप्रकाशक व भगवद्हृद्बोधक असें 'हार्द' भाष्य करण्याची आज्ञा केली. तिला अनुसरून गार्ग्य महर्षींनीं सदरहु गीतेवर भाष्य लिहिलें. त्यामुळेंच श्रीगणेशगीतेचें यथार्थ ज्ञान प्रकाशित होण्यास सुलभ असा मार्ग झाला. या भाष्यावरूच वेदव्यासादि सर्व महर्षींना गीतार्थाचें यथार्थ ज्ञान झालें आहे. इत्यादि वर्णन श्रीमन्मौद्गल पुराणांत आलेलें आहे. मागील विवेचनांत श्रीमद्गणेशगीतेंतलि मुख्य विषयाचें स्वरूप विशद करून सांगताना, जें भाष्य उद्धृत केलें आहे, तें या महर्षिश्रेष्ठ गार्ग्यांचेंच आहे. तेव्हां त्याच्या याथार्थ्याबद्दल कोणासही शंका उरण्याचा मुळींच संभव नाहीं. श्रीगणेशगीतेखेरीज दुसऱ्याही शांति-सिद्धान्तबोधक प्रस्थान ग्रंथावर व अनेक उपनिषदांवर यांनीं भाष्य लिहिलेलें असून, त्याचा निर्देश मारीच, याज्ञावल्क्य, कापिल, सनत्कुमार, व भविष्योत्तर इत्यादि पुराण ग्रंथांतून व महंतिहासोमधूनहि आलेला आहे. त्यापैकीं कांहीं प्रमाणें पुढें दिलीं आहेत.

[ भाष्य व भाष्यकार यासंबंधीं कांहीं प्रमाणें. ]

१–ऐल उवाच । मयूरेशस्य विप्रेशाज्ञया योगविदांवर । भाष्यं कृतं गणेशस्य गीतायाः शादिदं परं ॥ ११ ॥ त्वदीय भाष्ययोगेन गीताज्ञा ब्राह्मणादयः । बभूवुर्गाणपत्याश्च त्वच्छिष्यास्ते मता मुने ॥ १२ ॥ यादृशं गणनाथेन कथितं तादृशं प्रभो । त्वया ज्ञातं न संदेहो-गणेशस्वमतो मतः ॥ १३ ॥ गणेशगीताहार्दं यद्गणेशश्च वरेण्यकः । त्वं त्रयः संमताः शास्त्रे जानंति पूर्णयोगतः ॥ १४ ॥

[ श्रीमौद्गल पुराणखण्ड ५ अ. ३४ ]

२––अयं गार्ग्यो गर्ग एव मृतदेहात्समुत्थितः । त्रिप्रस्थान-भाष्यकर्ता श्रौतकल्प प्रकाशकः ॥ १ ॥ तथैवाग्रे–। तेनैव लोके गार्ग्येति ख्यातिं गच्छतु ते सुतः । गाणेशतत्त्व-ग्रंथानां स तु भाष्यं करिष्यति ॥ २ ॥ इत्यादि––

[ श्रीमारीच पुराण-अ. १६–१७ ]

३—मदीय शासनादेव प्रस्थान–त्रितयस्य च । करिष्यति मया भाष्यं भक्तानां हितकाम्यया ॥ ३ ॥ इति ( मारीच–भक्तमाहात्म्य )

४–मयूरेश गणेशस्य सखा गार्ग्यो महामुनिः । गणेशकृपया लब्ध–ब्रह्म· ज्ञान समन्वितः । गणेशहार्दं चैवेति भाष्यं चक्रेति सुंदरं ॥ ४ ॥

५––प्रस्थानानां च सर्वेषां गार्ग्येण भाष्यमीरितं । वेदान्तदर्शनस्यापि दशोप निषदां तथा ॥ ४३ ॥ अधीत्य गार्ग्य-भाष्यं तु शंकराचार्य देशिकः । अद्वैत बोधकं पूर्णं चक्रे भाष्यमनुत्तम ॥४४॥ इति [श्रीभविष्योत्तरपुराण·पंचगुरुमाहात्म्य ]

एवंगुणविशिष्ट–वैभवसिद्ध व विशुद्ध अशा आर्ष-संप्रदाय-परंपरेनें युक्त असें श्रीगणेशगीतेचें महत्तमत्व व पुरातनमूलभूतत्व शास्त्रप्रमाणांनीं स्पष्टपणें सिद्ध असतां, त्याविरुद्ध ज्या भलभलत्या तार्किक समजुती रूढ होतात व टिकतात, किंवा रहस्यकारासारख्या कोणास जें ' नकली ' इत्यादि प्रकारचे मिथ्याभासरूप अनुमान करितां येतें; त्याचें कारण तरी, दुसऱ्या अनेक कारणांपैकीं ' शुद्ध-संप्रदाय परंपरेचा लोप ' हें एक आहेच; यांत संशय नाहीं !

## श्रीगणेशगीतेचें प्राचीनत्व.

या पूर्वींपर्यंतच्या एकंदर विवेचनावरून श्रीगणेशगीतेचें **सर्व श्रेष्ठत्व,** सर्व सिद्धांतमूलभूतत्व, व पूर्णब्रह्मप्रतिपादकत्व, वगैरे अगदीं स्पष्टपणें सिद्ध झालेलें आहेच; आतां तिच्या प्राचीनत्वाविषयीं म्हणजे तिचा उल्लेख आणखी कोठें कोठें आला आहे, याविषयीं थोडक्यांत सांगून हा लेख पूर्ण करूं ! श्रीगणेशगीता ही श्रीमदादि श्रीगणेशपुराणाच्या उत्तर खण्डांत आलेली आहे. तेव्हां श्रीगणेशपुराणाचा काल कळला, कीं ती गणेश पुराणांत ग्रथित झाल्याचा काल सहजच लक्षांत येईल. याविषयीं आरंभीच्या विवेचनांत येऊन गेलें आहेच कीं, पूर्वीं सृष्ट्यादि कार्याच्या आरंभीं जगत्कार्य निर्वाहक अशा विष्णु-शिवादि पंचदेवांपैकीं श्रीविष्णूला, सर्वेश्वर परमात्मा श्रीस्वानंदेशकार्यमूर्ती, जो गुणेश, त्यानें विश्वकार्य-कर्तृत्वशक्ति देतांना, जें अखिल सिद्धांतभूत असें ' योगशास्त्र ' ( पातंजल योग नव्हे, तर सर्वगीताशास्त्र-मूळ असें योगामृत-शास्त्र ) उपदेशिलें, त्या **योगामृत** शास्त्रांत–त्याचें परम रहस्यभूत अशी–ही **श्रीगणेशगीता** आली असून, पुढें विशेष प्रसंगानें त्यांनीं–श्रीविष्णूनीं

जेव्हां ब्रह्मदेवाला श्रीगणेशपुराणाचा उपदेश केला, तेव्हां त्यांत ती ग्रथित केली गेली; त्यानंतर ब्रह्मलोकांत असलेलें तें श्रीगणेशपुराण ( अर्थात् गणेशगीतेसह ) पुढें, एका गाणेशकल्पांत महर्षिश्रेष्ठ भृगूंनीं ब्रह्मदेवांकडून श्रवण केलें, आणि पद्यरूपानें व पुराणलक्षणांनीं युक्त असें तें पुराण सर्वत्र लोकांत प्रसिद्ध केलें; अर्थात् तेव्हांच ती गणेशगीता सर्वत्र प्रसिद्धीला आली. यावरून तिचें पुरातनत्व स्पष्ट सिद्ध आहे. एकंदर सर्व पुराण ग्रंथात श्रीगणेशपुराण श्रेष्ठ असून, सहा प्रकारच्या महाकल्पापैकीं आद्य अशा ‘ गाणेश ’ संज्ञक महाकल्पामध्यें तें प्रवृत्त झालेंं आहे. यामुळें त्याला ‘ गाणेशपुराण ’ किंवा भृगूंनीं प्रवृत्त केल्यामुळें ‘ भार्गवपुराण ’ अशा संज्ञा आहेत; इत्यादि प्रकारचे वर्णन मारीचादि दुसऱ्या कल्पपुराणांतूनहि प्रसिद्ध असल्याचें मागें सांगितलेंच आहे. श्रीमन्मौद्गल महापुराणांत श्रीगणेशगीतेचा आणि तिजवरील भाष्याचा उल्लेख स्पष्टपणें आलेला आहे, याबद्दलचा पुरावा मागें दिलेल्या भाष्यकारांसंबंधींच्या वचनांवरून लक्षांत येण्यासारखा आहे. हें ‘ मौद्गल पुराण ’ गाणेशकल्पाच्या पूर्वींचा जो महावैनायक कल्प, त्यांतील वृत्ताचें बोधन करणारें आहे.*

याशिवाय मारीच, याज्ञवल्क्य, सनत्कुमार, ब्राह्म, ब्रह्माण्ड इत्यादि अनेक पुराणग्रंथांतून, आणि ब्रह्मानंदसुखोदयादि महेतिहासांतून, श्रीगणेशपुराणाचा व श्रीगणेशगीतेचाही उल्लेख ठिकठिकाणीं आलेला आहे; व कोठें कोठें तर त्यांचें विशेष महत्व व सर्व सिद्धांतबोधकत्वहि स्पष्टपणें वर्णिलें आहे. त्या सर्वांचाच निर्देश येथें करितां येणें शक्य नाहीं. तथापि उदाहरणाकरितां मारीच पुराण व ब्राह्मपुराण यांत आलेला, श्रीगणेशपुराणासंबंधीं व श्रीगणेशगीतेसंबंधीं उल्लेख यापुढें क्रमानें दर्शवित आहेत. मारीच पुराण–लघुमारीच व बृहन्मारिच–असें दोन प्रकारचें असून, त्यापैकीं एक ( बृहन्मारीच ) पुराण महर्षिश्रेष्ठ मरीचींनीं, एका महाकल्पाचें वृत्त कथन करणारें असें आपला शिष्य जो कुरु खण्डाचा राजा–ज्येष्ठ कुरु त्याला उपदेशिलें आहे; तें

---

* ही कल्पकालव्यवस्था व पुराण विद्येचें स्वरूप सहजासहजीं लक्षांत न आल्यानें, मोठी संशयाकुलता प्राप्त होण्याचा संभव आहे. परंतु विशेष रीतीनें पुराणग्रंथांचें संशोधन झाल्यास, ही कालकृत आपत्ति टिकणारी नाहीं. इतरत्र प्रसिद्ध झालेल्या ‘ गाणेशज्ञेय पुराणें ’ या लेखावरून ही गोष्ट लक्षांत येईल.

३––मदीय शासनादेव प्रस्थान–त्रितयस्य च । करिष्यति मा भाष्यं भक्तानां हितकाम्यया ॥ ३ ॥ इति ( मारीच–भक्तमाहात्म्य )

४–मयूरेश गणेशस्य सखा गार्ग्यो महामुनिः । गणेशकृपया लब्ध–ब्रह्म-ज्ञान समन्वितः । गणेशहार्दं चैवेति भाष्यं चक्रेति सुंदरं ॥ ४ ॥

५––प्रस्थानानां च सर्वेषां गार्ग्येण भाष्यमीरितं । वेदान्तदर्शनस्यापि दशोपनिषदां तथा ॥ ४३ ॥ अधीत्य गार्ग्य-भाष्यं तु शंकराचार्य देशिकः । अद्वैत बोधकं पूर्णं चक्रे भाष्यमनुत्तम ॥४४॥ इति [श्रीभविष्योत्तरपुराण-पंचगुरुमाहात्म्य ]

एवंगुणविशिष्ट–वैभवसिद्ध व विशुद्ध अशा आर्ष-संप्रदाय-परंपरेनें युक्त असें श्रीगणेशगीतेचें महत्तमत्व व पुरातनमूलभूतत्व शास्त्रप्रमाणांनीं स्पष्टपणें सिद्ध असतां, त्याविरुद्ध ज्या भलभलत्या तार्किक समजुती रूढ होतात व टिकतात, किंवा रहस्यकारासारख्या कोणास जें ' नकली ' इत्यादि प्रकारचे मिथ्याभासरूप अनुमान करितां येतें; त्याचें कारण तरी, दुसऱ्या अनेक कारणांपैकीं ' शुद्ध-संप्रदाय परंपरेचा लोप ' हें एक आहेच; यांत संशय नाहीं !

## श्रीगणेशगीतेचें प्राचीनत्व.

या पूर्वीपर्यंतच्या एकंदर विवेचनावरून श्रीगणेशगीतेचें **सर्व श्रेष्ठत्व,** सर्व सिद्धांतमूलभूतत्व, व पूर्णब्रह्मप्रातिपादकत्व, वगैरे अगदीं स्पष्टपणें सिद्ध झालेलें आहेच; आतां तिच्या प्राचीनत्वाविषयीं म्हणजे तिचा उल्लेख आणखी कोठें कोठें आला आहे, याविषयीं थोडक्यांत सांगून हा लेख पूर्ण करूं ! श्रीगणेशगीता ही श्रीमदादि श्रीगणेशपुराणाच्या उत्तर खण्डांत आलेली आहे. तेव्हां श्रीगणेशपुराणाचा काल कळला, कीं ती गणेश पुराणांत ग्रथित झाल्याचा काल सहजच लक्षांत येईल. याविषयीं आरंभीच्या विवेचनांत येऊन गेलें आहेच कीं, पूर्वीं सृष्ट्यादि कार्याच्या आरंभीं जगत्कार्य निर्वाहक अशा विष्णु-शिवादि पंचदेवांपैकीं श्रीविष्णूला, सर्वेश्वर परमात्मा श्रीस्वानंदेशकार्यमूर्ती, जो गणेश, त्यानें विश्वकार्य-कर्तृत्वशक्ति देतांना, जें अखिल सिद्धांतभूत असें ' योगशास्त्र ' ( पातंजल योग नव्हे, तर सर्वगीताशास्त्र-मूल असें योगामृत-शास्त्र ) उपदेशिलें, त्या **योगामृत** शास्त्रांत–त्याचें परम रहस्यभूत अशी–ही **श्रीगणेशगीता** आली असून, पुढें विशेष प्रसंगानें त्यांनीं–श्रीविष्णूनीं

जेव्हां ब्रह्मदेवाला श्रीगणेशपुराणाचा उपदेश केला, तेव्हां त्यांत ती ग्रथित केली गेली; त्यानंतर ब्रह्मलोकांत असलेलें तें श्रीगणेशपुराण ( अर्थात् गणेशगीतेसह ) पुढें, एका गाणेशकल्पांत महर्षिश्रेष्ठ भृगूंनीं ब्रह्मदेवांकडून श्रवण केलें, आणि पद्यरूपानें व पुराणलक्षणांनीं युक्त असें तें पुराण सर्वत्र लोकांत प्रसिद्ध केलें; अर्थात् तेव्हांच ती गणेशगीता सर्वत्र प्रसिद्धीला आली. यावरून तिचें पुरातनत्व स्पष्ट सिद्ध आहे. एकंदर सर्व पुराण ग्रंथात श्रीगणेशपुराण श्रेष्ठ असून, सहा प्रकारच्या महाकल्पापैकीं आद्य अशा ‘ गाणेश ’ संज्ञक महाकल्पामध्यें तें प्रवृत्त झालेलें आहे. यामुळें त्याला ‘ गाणेशपुराण ’ किंवा भृगूंनीं प्रवृत्त केल्यामुळें ‘ भार्गवपुराण ’ अशा संज्ञा आहेत; इत्यादि प्रकारचें वर्णन मारीचादि दुसऱ्या कल्पपुराणांतूनहि प्रसिद्ध असल्याचें मागें सांगितलेंच आहे. श्रीमन्मौद्गल महापुराणांत श्रीगणेशगीतेचा आणि तिजवरील भाष्याचा उल्लेख स्पष्टपणें आलेला आहे, याबद्दलचा पुरावा मागें दिलेल्या भाष्यकारांसंबंधीच्या वचनांवरून लक्षांत येण्यासारखा आहे. हें ‘ मौद्गल पुराण ’ गाणेशकल्पाच्या पूर्वीचा जो महावैनायक कल्प, त्यांतील वृत्तांचें बोधन करणारें आहे.*

याशिवाय मारीच, याज्ञवल्क्य, सनत्कुमार, ब्राह्म, ब्रह्माण्ड इत्यादि अनेक पुराणग्रंथांतून, आणि ब्रह्मानंदसुखोदयादि महेतिहासांतून, श्रीगणेशपुराणाचा व श्रीगणेशगीतेचाही उल्लेख ठिकठिकाणीं आलेला आहे; व कोठें कोठें तर त्यांचें विशेष महत्व व सर्व सिद्धांतबोधकत्वहि स्पष्टपणें वर्णिलें आहे. त्या सर्वांचाच निर्देश येथें करितां येणें शक्य नाहीं. तथापि उदाहरणाकरितां मारीच पुराण व ब्राह्मपुराण यांत आलेला, श्रीगणेशपुराणासंबंधीं व श्रीगणेशगीतेसंबंधीं उल्लेख यापुढें क्रमानें दर्शवित आहेत. मारीच पुराण—लघुमारीच व बृहन्मारीच—असें दोन प्रकारचें असून, त्यापैकीं एक ( बृहन्मारीच ) पुराण महर्षिश्रेष्ठ मरीचींनीं, एका महाकल्पाचें वृत्त कथन करणारें असें आपला शिष्य जो कुरु खण्डाचा राजा—ज्येष्ठ कुरु त्याला उपदेशिलें आहे; तें

---

* ही कल्पकालव्यवस्था व पुराण विद्येचें स्वरूप सहजासहजीं लक्षांत न आल्यानें, मोठी संशयाकुलता प्राप्त होण्याचा संभव आहे. परंतु विशेष रीतीनें पुराणग्रंथांचें संशोधन झाल्यास, ही कालकृत आपत्ति टिकणारी नाहीं. इतरत्र प्रसिद्ध झालेल्या ‘ गाणेशज्ञेय पुराणें ’ या लेखावरून ही गोष्ट लक्षांत येईल.

कल्पपुराणांत परिगणित केलेलें असून सर्वश्रेष्ठ आहे; आणि ( लघुमारीच ) त्यांच्याच [ मरीचींच्या ] शिष्यानें रचिलें असून, तें लघु पुराणांत गणिलें आहे. पुढें दिलेला उल्लेख बृहन्मारीचि पुराणांतील आहे. या पुराणाच्या एकंदर तीन संहिता आहेत, पैकीं ' भार्गवी संहिता ' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या पहिल्या संहितेच्या आरंभींच—पहिल्या अध्यायांत श्रीगणेशपुराणाच्या प्रवृत्तिसंबंधें प्रसिद्ध असलेली व्यासाची कथा दिलेली असून, ब्रह्मदेवांनीं, विष्णूकडून श्रवण केलेलें सर्वश्रेष्ठ असें ' गणेश पुराण '—व्यासाला उपदेशिलें; असें सांगितलें आहे. ते श्लोक असें:—

## मारीच-पुराण भार्गव संहिता—अध्याय १ उपक्रमप्रसंग

'पुरा गाणेश्वरे कल्पे कृष्णद्वैपायनो मुनिः । स्वायंभुव मनौ विप्राः प्रथमे द्वापरे युगे ॥१॥..... कृत्वा वेदं चतुर्भागं तदर्थज्ञानसिद्धये । पुराणं कर्तुमारेभे स विद्यामदगर्वितः ॥४॥ समाप्ति—साधनं नैव कृतवान् मंगलं पुरा । गणेशस्य नतिं वापि स्तुतिं वा तस्य वा क्वचित ॥५॥ ततो विघ्नाभिभूतः सन्नर्थं कंचन नास्मरत् । ततोऽगच्छत्सत्यलोकं पप्रच्छ कारणं विधिं ॥६॥ तमाह पद्मजो देवः स्वतंत्रो विघ्ननायकः । तस्मिंस्त्वं कृतवान् गर्वं स्वविद्याबल—संश्रयात ॥७॥ तं गच्छ शरणं वत्स द्विरदाननमादरात् । स चेत् प्रसन्नो भगवान् वांछितं ते करिष्यति ॥८॥ नोचेत् वर्षसहस्रेण न स्ववांच्छामवाप्स्यसि । ततः पप्रच्छ तं व्यासः स्वरूपं तु गणेशितुः ॥९॥ उपदिष्टं विष्णुना च स्वस्य यत् परमाद्भुतं । षोडशोपनिषत्सारं धर्मार्थ काममोक्षदं ॥१०॥ गणेशस्य पुराणं तत् व्यासाय समुपादिशत् । तच्छ्रुत्वा भगवान् व्यासः पुराणलक्षणैः सह ॥११॥ कृत्वा तत् भृगवे प्राह कल्प —लक्षण संयुतं । चकार पद्यरूपेण तदेव च भृगुर्मुनिः ॥१२॥ अष्टादश पुराणानि मन्वंतरभवानि च । गणनाथ प्रसादेन चक्रे द्वैपायनो मुनिः ॥१३॥वर्तमानस्य कल्पस्य सामीप्यानिच यानिहि । कल्पानां चैव तेषांतु वृत्तांतबोधाकनि च॥१४॥चकार च स्वयं व्यासो ह्यन्येषां महतां च हि । कल्पवृत्तबोधकानि पुराणानि यथाक्रमं ॥१५॥ सनत्कुमारप्रमुखाश्चकुर्लोक—हिताय च पुराणानिच षट्त्रिंशत्कल्पवृत्तयुतानि च ॥१६॥ व्यासेनान्यमुनींद्रैश्च कृतानि मुनिसत्तमाः ॥

या श्लोकांचें तात्पर्य प्रायः पूर्वी येऊन गेलें आहेच! श्रीगणेशपुराण सोळा प्रमुख उपनिषदांचें उप–बृंहण करणारें असून सर्वसिद्धांतरूप आहे; तें विष्णूनें ब्रह्मदेवाला उपदेशिलें असून त्यानें व्यासाला व व्यासानें भृगूला कथन केलें, आणि नंतर अशा क्रमानें तें भृगूनें सर्वत्र प्रवृत्त केलें; तें 'गाणेश' कल्पांतील आहे. अशीच 'उपपुराणें' या संज्ञेनें प्रसिद्ध असलेल्या इतर कल्पपुराणांचीही व्यवस्था आहे; आणि 'महापुराणें' म्हणून प्रसिद्ध असलेलीं 'मन्वंतर' पुराणें, व्यासानें श्रीगणेशपुराण श्रवण करून कल्पपुराणांची व्यवस्था केल्यानंतर–श्रीगणेशाच्या कृपाप्रसादानेंच रचिलेलीं आहेत; इत्यादि वर्णन वरील श्लोकांत स्पष्ट आलें आहे. तसेंच कल्पपुराणें व मनुपुराणें यांतील तारतम्य भेदाचें स्वरूपही शेवटीं दर्शविलें आहे. या एकंदर उल्लेखावरून श्रीगणेशपुराणाचें आदिमत्व व श्रेष्ठतरत्व चांगलें लक्ष्यांत येतें. अष्टादश महापुराण मध्यें म्हणजे मन्वंतर पुराणांत आद्यस्थानीं असलेल्या 'ब्राह्म' संज्ञक महापुराणांत गाणेशाना ज्ञेय असलेल्या ग्रंथांचें निरूपण करितांना पुढील प्रमाणें उल्लेख आलेला आहे.

"अष्टादश पुराणेषु ब्रह्माण्डं तारबोधकं । पूर्वोत्तर प्रभेदेन खण्डद्वय समन्वितं अष्टादश पुराणेषु वैयासिक्येषु पुत्रक । तारमंत्रस्वरूपं तत् ब्रह्माण्डमांत्यमीरितं ॥ आद्यं ब्रह्मपुराणं तु तथा खण्डद्वयान्वितं । पूर्वखण्डे परंब्रह्म बुद्धिस्थं वर्ण्यते क्रमात् ॥ ३ ॥ अधिष्ठानं परंब्रह्म द्वितीये चैव वर्णितं । तेनैव तच्च ब्राह्मं तु ब्रह्माण्डाद्वरमीरितम् ॥ ४ ॥ अष्टादश पुराणानि कल्पजानि वराणिच । आद्यं तेषु च गाणेशं खण्डद्वयसमन्वितं ॥५॥ उपासनं गणेशस्य पूर्वखण्डे तु वर्ण्यते। नाना लीलाश्च वर्ण्यन्ते तथा चैवहि चोत्तरे ॥६ ॥ सहस्रनाम-**गीताभ्यां** कवचेन युताच्च हि । ब्राह्मादपि च श्रेष्ठं तत् पुराणं **गाणपं** स्मृतम् ॥७॥

वरील श्लोकांत अष्टादश महापुराणें अथवा मनुपुराणें व कल्पपुराणें यांतील महत्त्वतारतम्य सांगून, त्यांमध्यें परिगणित केलेल्या ब्रह्मांड, ब्राह्म व गाणेश या पुराणांचें स्वरूप सांगितलें आहे. आणि त्यांमध्यें वर्णिलेल्या गाणेश तत्त्वज्ञानाला अनुसरून, ब्रह्मांड पुराणापेक्षां ब्राह्मपुराण श्रेष्ठ आहे; व त्याहून गाणेश पुराण श्रेष्ठ आहे, असें सांगितलें आहे. शिवाय सर्वसिद्धान्त-सार-

भूत अशी **श्रीगणेशगीता** आणि विशिष्ट तत्त्वबोधक अशी सहस्रनामादि अंगें, सदरहु पुराणांत म्हणजे गणेशपुराणांत आलेलीं असल्यानें, तें पुराण-ग्रंथांमध्यें विशेष श्रेष्ठ आहे; असा हेतु दर्शवून त्याचें प्राशस्त्य कथिलें आहे. यालाच अनुसरून दुसऱ्या एका ठिकाणीं ‘ ब्रह्मांडाच्च वरं ब्राह्मं ब्राह्माद्गाणेश्वरं वरं । ’ असें स्पष्ट सांगितलें आहे. तसेंच या ब्राह्म पुराणाच्या उत्तर खण्डाच्या तेविसाव्या अध्यायांत, श्रीगजानन अवताराचें चरित्र सांगतांना,— “ उपादिशच्च **यां गीतां वरेण्याय गजाननः** । तां गीतां कृपया मह्यं ब्रूहि त्वं ब्रह्मनन्दन ॥ ” असा प्रश्न आल्यावरून, **श्रीगणेशगीतेचा** स्पष्ट निर्देश करून तिचें विशेषत्व सांगितल्यानंतर, श्रीगजाननवरेण्यसंवादरूप असलेल्या तिचें—**श्रीगणेशगीतेचें**—सारच वर्णिलें आहे. अशाच रीतीनें अन्यत्र पुष्कळ ठिकाणीं श्रीगणेशपुराणाचें व श्रीगणेशगीतेचें प्राशस्त्य वर्णिलेलें असल्यानें, **तिचें पुरातनत्व** पूर्णपणें सिद्ध असून सर्व शास्त्रसंमत असेंच आहे, हें निर्विवाद आहे.

आतां अलिकडील म्हणजे श्रीमदाद्य—शंकराचार्य—श्रीमद्भगवत्पाद—योगीन्द्रापासून आतांपर्यंतची परंपरा सामान्यतः पाहूं ! म्हणजे त्या त्या वेळीं श्रीगणेशगीतेची उपस्थिति कशाप्रकारें होती, हें कळून येईल. सर्व सिद्धान्तभूत अशा पूर्णाद्वैत प्रस्थानामध्यें, वेदव्यासांनीं प्रवृत्त केलेल्या प्रस्थानत्रयामध्यें गणेशगीतादि दहा गीता समाविष्ट झाल्या असल्याचें पूर्वीं वर्णिलेंच आहे. त्यानंतर तोच संप्रदाय—सर्व सिद्धान्तरूप व सांगोपांग असा व्यासांकडून शुकयोगीन्द्रांना प्राप्त झाला, आणि त्यांच्या पासून गौडपाद—भगवत्पाद अशा परंपरेनें आजपर्यंत चालत आलेला असल्याचें सर्वत्र प्रसिद्धच आहे. श्रीगौडपाद योगीन्द्रांनीं संपूर्ण व्याससिद्धांताचें स्थापन केलें असून पुढें कालस्थितीला अनुसरून त्यांच्याच आज्ञेप्रमाणें श्रीमदाद्य शंकराचार्यांनीं व्यासप्रस्थानापैकीं भगवद्गीतेशिवाय इतर गीता सोडून, तशा प्रस्थानाचें ( ईशादि दशोपनिषदें, ब्रह्मसूत्र व भगवद्गीता ) सर्वत्र स्थापन केलें, हा उल्लेखहि मागें येऊन गेला आहे, म्हणजे श्रीमद्गणेशगीतादि दहा गीतांसह संपूर्ण व्यासप्रस्थान श्रीमदाद्य-

शंकराचार्यांना, श्रीगौडपादयोगीन्द्रांकडून मिळालेलें होतें हें स्पष्ट आहे. अशा तऱ्हेचे उल्लेख आर्ष इतिहासांमधून आलेले आहेत. उदाहरणार्थ श्रीब्रह्मानंद-सुखोदयसंज्ञक महेतिहासांतील 'ज्ञानामृत' नामक प्रकरणांत अद्वैतासिद्धांतप्रवर्तक आचार्यांचें दिग्विजयादिरूप चरित्र कथन करीत असतां, असा उल्लेख आला आहे. बदरीकाश्रमामध्यें श्रीगौडपाद योगीन्द्रांचें वास्तव्य असतां जेव्हां श्रीशंकराचार्य त्यांना शरण आले व त्यांना श्रीगौडपादांनीं सर्व प्रकारें सिध्दांतोपदेश केला त्यावेळीं पुढील कार्याविषयीं त्यांनीं श्रीमदाचार्यांना आज्ञा केली. ते श्लोक असेः– "पुरा वै द्वापरांते तु वेदव्यासो महामुनिः । चकार ब्रह्मसूत्राणि वेदांतज्ञानसिद्धये ॥ '७॥ दशोपनिषदश्चैव ब्रह्मसूत्रप्रबंधकं । तथा वै भगवद्गीतां दशगीतासु शंकर ॥ '८॥ स्थाप्य प्रस्थानत्रयत्वे त्वं तु स्थापय वैदिकं ॥ इत्यादि "

शिवाय त्यांनीं (शंकराचार्यांनीं) आपल्या सुरेश्वरादि प्रमुख शिष्यांकरवीं वैदिक षण्मतांची–षडद्वैतासिद्धांताची प्रवृत्ति करविली असल्याचें जें वर्णन त्यांच्या आर्ष चरीत्रांतून आलेलें आहे, त्यावरूनहि वरील गोष्ट लक्षांत येते अद्वैतसिद्धांताच्या रक्षणाकरितां, श्रीमच्छंकराचार्यांनीं स्थापन केलेल्या चतुर्धाम–मठापैकीं, मुख्य व श्रेष्ठ अशा शृंगेरीपिठावर श्रीसुरेंद्रपाद योगीन्द्रांची योजना झाल्याचें प्रसिद्धच आहे. त्याच वेळीं त्यांना श्रीमदाचार्यांनीं गाणेशद्वैतसिद्धांतबोधक अशा अद्वैतब्रह्मोपनिषदावर आणि श्रीमद्गणेशगीतेवर भाष्य करण्याविषयीं आज्ञा करून त्यांजकरवीं गाणेशाद्वैतसंप्रदाय प्रवृत्त करविला; श्रीमदाचार्यांच्या आज्ञेला अनुसरून श्रीसुरेश्वरांनीं श्रीमद्गणेशगीतादि ग्रंथावर गाणेशाद्वैतबोधक* भाष्य लिहिल्याचें प्रसिद्ध आहे. 'गुरोराज्ञानुसारेण सुरेन्द्रपाद पूर्वगाः । वैघ्नपंचार्चनोपेत-मेकार्णमंत्रसंयुताः ॥ भारते गाणपाद्वैतं स्थापयामासुरादरात् । अद्वैतब्रह्मोपनिषद्गीतयोश्च गणेशितुः । भाष्यं चकार योगीन्द्रः सुरेंद्रपाद-संज्ञकः ॥' इत्यादि–वर सांगितलेल्या ज्ञानामृतोक्त वचना-

---

* प्रस्तुत ( श्रीयोगीन्द्रमठांतच ) प्रवृत्त असलेला 'गाणेशाद्वैतसंप्रदाय, श्रीसुरेन्द्रपादांकडूनच तत्पीठस्थ श्रीचिंतामणियोगीन्द्रांच्या द्वारें, श्रीमत्‌गाणेशजगत्‌गुरु **श्रीमत्‌गणेश योगीन्द्राचार्य** यांना प्राप्त झालेला, त्यांच्याच कृपेनें यथाक्रमोपलब्ध असा आहे.

वरून वरील गोष्ट स्पष्ट सिद्ध आहे. श्रृंगेरीपीठस्थ आचार्यांना गणेशमंत्रोपासन अवश्य करावें लागतें; या प्रसिद्ध असलेल्या निबंधांतील बीजही वरील वचनावरून लक्षांत येतें ! याचप्रमाणें पद्मपाद, हस्तामलक, त्रोटकाचार्य, व आनंदगिरी यांनींहि श्रीमदाचार्यांच्या आज्ञेला अनुसरून, अनुक्रमें शैव, वैष्णव, शाक्त, सौरादि अद्वैतसिद्धांतांची प्रवृत्ति करवून, त्या त्या सिद्धांतग्रंथांवर भाष्यें लिहिलीं असल्याचें वर्णन आहे, तसेंच पूर्वीं वादांत पराजित केलेली जी भिन्न भिन्न मतवादी वैष्णवादि मंडळी होती, त्यांना त्यांच्या प्रार्थनेवरून वेगवेगळ्या उपासनामार्गांच्या प्रवृत्तिविषयीं श्रीमदाचार्यांनीं आज्ञा केली आणि तदनुसार त्यांच्या करवीं तशा अधिकाराच्या लोकांकरितां कर्मकांडोक्त वैदिक वैष्णवादि प्रतिकोपासनामार्ग प्रवृत्त केले. अर्थात् हे मार्ग अद्वैत सिद्धांताला परिपोषक व क्रमसोपान निदर्शक असेच होत; असो ! या मंडळींनींहि आपआपल्या ग्रंथांवर प्रतिकोसनाबोधक भाष्यें लिहिलेलीं आहेत; त्यांपैकीं गाणेशमार्गी गिरिजासुतयोगीन्द्रांनीं श्रीगणेशगीता व सहस्रनामादि ग्रंथांवर भाष्य लिहिल्याचें प्रसिद्ध आहे. येथें पुष्कळांची अशी शंका आहे कीं, श्रीमदाचार्यांनीं इतर गीता असतां ज्या अर्थीं श्रीभगवत्‌गीतेवर भाष्य लिहिलें, त्या अर्थीं तीच श्रेष्ठ असून मूलभूत होय; तर त्या शंकेचा परिहार असा:—आचार्यकालच्या परिस्थिती-प्रमाणें त्यांना सर्वत्र हिरण्यगर्भाद्वैत ( स्मार्त ) स्थापन करावयाचें होतें. त्यावांचून त्यावेळच्या मतोपमतवाद्यांचें एकीकरण होणें सर्वथा अशक्य होतें. त्याकरितांच त्यांनीं अद्वैत सिद्धान्तांत अद्वैतप्रवेशरूप अशा भगवत्‌गीतेचें ग्रहण करून भाष्य लिहिलें. त्यांचें अवतारकार्यहि द्वैतखण्डनपूर्वक-अद्वैत स्थापन हेंच होतें. पूर्वकर्मपरिपाकानुसार जे विशेषाधिकारी होते त्यांच्याकरितां इतर शिष्यांकडून बाकीच्या गीतांवर दोन भाष्यें करविलीं; आणि पूर्णाधिकारी लोकांकरितां मुख्य गीतेवर वार्तिककार आणि गिरिजासुतयोगीन्द्र यांजकडून भाष्यें लिहविलीं. श्रीगणेशगीता सर्वाभेद प्रतिपादक व केवळ अनुभवाचें शास्त्र असल्यामुळें ती सर्वसाधारणांचे उपयोगी नाहीं; हेंच तिजवर स्वतः भाष्य न लिहिण्याचें कारण होय. श्रीआचार्यांस जेव्हां श्रीगौडपादयोगीन्द्रांकडून-गोविंदपादद्वारा—ज्ञानदीक्षा झाली, तेव्हां त्यांस

उपदिष्ट झालेल्या शांतिप्रस्थानावर तरी त्यांनीं भाष्य कोठें लिहिलें आहे? तात्पर्य—त्याची इतरांकरितां फारशी गरज नव्हती. तोच प्रकार श्रीगणेशगीतेबद्दलचा होय. भगवत्गीतादि इतर गीतांवर आचार्यांपूर्वींचें आर्षभाष्य असल्याचा उल्लेख नसून गणेशगीतेवर आर्षभाष्य आहे; हें तिच्या प्राचीनत्वाचें व विशिष्टत्वाचें एक प्रमाण होय. असो; वर प्रमाणें श्रीआचार्यकालीं श्रीगणेशगीतेवर दोन भाष्यें झालीं. पुढें शालिवाहन शके ११०० च्या आरंभीं श्रीनामल क्षेत्रांत **श्रीब्रह्मानंदयोगीन्द्र** यांचें अवतरण होऊन, त्यांनीं तत्कालीन सर्वत्र प्रवृद्ध झालेल्या रामानुजादि मार्गस्थांचें खंडन करून, पुन्हा गाणेशमार्ग स्थापन केला आणि श्रीगणेशगीतेवर व्याख्यान राहिलें. त्यानंतर पुनः पूर्ववत् स्थिति झाली असतां पंधराव्या शतकांत श्रीयोगीन्द्राचार्यांचा अवतार झाला; व त्यांनीं श्रीगणेशगीतेवर पूर्णयोगप्रतिपादक भाष्य लिहून शुद्धमार्ग स्थापन केला. वरील श्रीगणेशगीतेवरील भाष्यें भिन्न भिन्न मतप्रतिपादक नसून, एकाच पूर्णसिद्धांताचें [ अधिकारी भेदानुसार ] प्रतिपादन करणारीं आहेत. अशी या श्रीगणेशगीतेची आरंभापासून ( प्राचीन कालची आर्ष व अर्वाचीन ऐतिहासीक ) परंपरा आहे. **श्रीमद्योगीन्द्राचार्य** महाराजांनीं श्रीमद्गणेशगीतेवर 'श्रीयोगेश्वरी' नामक विस्तृत टीका लिहिली आहे, तिचा उल्लेख मागें आला आहेच !

एतावता पूर्वप्रतिज्ञेप्रमाणें श्रीयोगामृतशास्त्राचें, श्रीगीताशास्त्राचें मूळ स्वरूप आणि विशेषतः श्रीमद्गणेशगीतेचें सर्वश्रेष्ठ व विशिष्ट स्वरूप, सर्व बाजूंनीं स्पष्टपणें दर्शविणारें जें विवेचन येथवर झालेलें आहे; त्या एकंदर विवेचनावरून **श्रीमद्गणेशगीतेचें** ( आणि अर्थात् तिजबरोबर इतर गीतांचेंही यथाक्रम असें ) **श्रेष्ठत्व, पुरातनत्व, विशेषतमत्व,** व प्रागल्भ्य, अगदीं निःसंशय सिद्ध झाल्यानंतर, "तथापि त्यांतील ( गणेशगीतादि गीतांतील ) प्रतिपादन बहुतेक **भगवद्गीतेवरूनच** घेतलेलें असल्यामुळें, त्यांत कांहीं नवेपणा वाटत नाहीं; म्हणून अखेर भगवत्गीतेच्या प्रगल्भ व व्यापक तेजापुढें मागाहून झालेल्या या **पौराणिक शिळ्या** गीतांचा टिकाव न लागतां, उलट भगवत्गीतेचीच महती या **नकली** गीतांनीं अधिक व्यक्त व स्थापित

झाली. " या गीतारहस्यांतील रहस्यकारांच्या म्हणण्यांत मुळींच तथ्यांश राहात नसून, तें म्हणणें केवळ भ्रांतिमूलक अतएव असत्य असल्याचेंच ठरतें! किंबहुना श्रीगीताशास्त्राच्या म्हणजे सर्वशास्त्रसिद्धांतरूप अशा श्री– ' योगामृत ' शास्त्राच्या यथार्थ ज्ञानाच्या अभावाचेंच तें निदर्शक असल्यानें, शास्त्रार्थसंप्रदायरहित–( त्यांच्यामतें संप्रदायनिरपेक्ष !–पण प्रमाणशून्य तर्काच्या बलावर उभारिलेलें अतएव असांप्रदायिक आग्रहाचें असें ते भ्रांतिमूलक अनुमान )–असा तो उपर्युक्त तर्क सर्वथा चुकीचा अतएव त्याज्य होय, यांत मुळींच संशय नाहीं ! ही गोष्ट कोणाच्याहि लक्षांत सहज येणारी आहे. उलट भगवत्गीतेंत किंवा शिवगीतादि इतर गीतांत जें कांहीं **विशेषत्व** दिसतें, तें श्रीयोगामृतशास्त्र अथवा श्रीयोगामृतार्थशास्त्र ( **श्रीमत्गणेशगीता** ) हे त्या इतर गीतांना **मूलभूत** असल्यामुळेंच आहे, असें म्हणणें प्राप्त होतें !

आतां केवळ तार्किक दृष्ट्याच पाहावयाचें झाल्यास, रहस्यकारांच्याच म्हणण्याप्रमाणें त्यांच्या उपक्रमोपसंहारसरणीनें श्रीभगवद्गीता ही मुख्यत्वें करून ' कर्मयोग ' प्रतिपादक असून श्रीगणेशगीता ही जर तिचीच ' हुबेहुब नक्कल ' आहे, तर जिचा म्हणजे भगवत्गीतेचा परिणाम अर्जुनाच्या ठिकाणीं, त्याला कर्म करावयास [ स्वधर्मप्राप्त असें युद्ध करावयास ] लावणारा, अतएव कर्मप्रवर्तक ( ! ) म्हणून इष्ट असाच झाला; तिचाच म्हणजे तिचीच ' हुबेहुब नक्कल ' असलेल्या [ अतएव कर्मयोगप्रतिपादक अशा ] श्रीगणेशगीतेचा परिणाम वरेण्य राजाच्या ठिकाणीं ' त्यक्त्वा राज्यं कुटुंबं च कान्तारं प्रययौरयात् । ' असा अनिष्ट अतएव सर्वथा कर्मनिवर्तक असा कां व्हावा ? दुसरें, थोड्याशा सादृश्याभासामुळेंच जर श्रीगणेशगीता ही श्रीभगवद्गीतेची ' हुबेहुब नक्कल ' आहे असें केवळ अनुमानानेंच म्हणावयाचें तर उलट श्रीगणेशगीतेच्याच एकांशाचा विस्तार श्रीभगवद्गीता आहे, असें तिच्यांतील ' निर्माय चैनमवदं ' ( ग. गी. अ. ३ श्लोक १ ) या प्रमाणभूत वचनावरून कां म्हणतां येणार नाहीं ? किंबहुना हें म्हणणेंच योग्य ठरणारें आहे. सारांश नुसता काल्पनिक तर्क–प्रमाणसूत्र असा तर्क

सर्वथा उपेक्षणीय असून, निर्णयाच्या कामीं तो कुचकामाचाच ठरतो; हें उघड आहे. अस्तु !

एवंच आरंभीं म्हटल्याप्रमाणें, गीतारहस्यांतील–इतर गीतांसंबंधीं व विशेषतः श्रीगणेशगीतेसंबंधीं वृथा अपकर्ष दर्शविणाऱ्या–टीकास्पद मुद्याच्या खण्डनाच्या मिषानें, श्रीयोगामृत शास्त्राचें [ सामान्यतः गीताशास्त्राचें व विशेषेंकरून श्रीमद्गणेशगीतेचें ] सांगोपांग स्वरूप, सुज्ञ व विचारी वाचकांपुढें अगदीं यथार्थ व स्पष्टपणें कथन केलेलें असल्यामुळें, श्रीगणेशगीतादिकांसंबंधें रहस्यकारांचें काल्पनिक मत, किती अयोग्य व कसें व्यर्थ आहे; हें तर कोणालाहि सहज कळून येईलच. पण शिवाय सांप्रत शुद्ध संप्रदायाच्या अभावीं, श्रीमद्गणेशगीतेसंबंधीं व गाणेश तत्त्वज्ञानासंबंधीं जें अत्यंत अज्ञान किंबहुना विपरीत ज्ञान, सर्वत्र–प्रायः गणेशभक्तांच्या ठिकाणींही पसरलें असल्याचें दिसून येतें, त्याच्या निरासालाहि सदरहु विवेचन पुष्कळच उपकारक होईल, यांत संशय नाहीं. वस्तुतः रहस्यकारांनीं जर श्रीगणेशगीतादि इतर गीतांना वृथा दोष दिले नसते, तर श्रीभगवद्गीतेची महती कमी झाली असती, अगर तिच्यांत कांहीं उणेपणा दिसून आला असता, असें मुळींच नाहीं ! परंतु ज्या अर्थीं त्यांच्यासारख्या असामान्य पुरुषानें त्या गीतांना वृथा दोष देऊन, श्रीभगवद्गीतेच्या तरफदारींत त्यांच्या विषयीं व त्यांच्या कर्त्यांविषयीं आपल्या अंतःकरणांतील अक्षम्य अनादर पूर्ण व्यक्त केला आहे, त्या अर्थीं ‘ अब्रुवन् विब्रुवन् वापि नरो भवति किल्बिषी ’ । या मन्वाज्ञेला अनुसरून. त्याचा यथायोग्य निषेध करणें अवश्य असल्यामुळें आणि त्यांच्या–त्या अनादराचा परिणामहि जनतेवर असामान्य असाच होणारा असल्यानें, त्याला आळा घालणें हें–आरंभीं सांगितल्याप्रमाणें–एक अवश्य असें प्राप्त कर्तव्यच असल्यामुळें, श्रीमद्गणेशगीतादि गीताशास्त्रसंप्रदायांसंबंधें जें कांहीं लिहिणें अवश्य, तें यथामति लिहिलें गेलें आहे. बाकी तो विमलतम वैदिक संप्रदाय सर्वथा अबाधित व स्वयंसिद्ध समर्थ असाच असल्यानें ‘ गुंजापुंजादि दह्येत नान्यारोपित वह्निना । ’ या न्यायानें त्याला कसलाच भंग–कशानेंही–प्राप्त होणारा नाहीं ! इत्यलम्–श्रीगणराजः ॥

[ प्रथम लेखन मिति—फाल्गुन वद्य ४ शके १८३७, श्रीक्षेत्र मोरेश्वर ]

॥ श्रीस्वानंदेशार्पणमस्तु. ॥

पूर्वी प्रसिद्ध झालेल्या या निबंधलेखांत, त्यावेळीं स्थलादिकांच्या अभावामुळें जो संक्षेप करावा लागला, व जो मजकूर सदरील निबंध विषयाचे स्वरूप स्पष्ट लक्षांत येण्यास अवश्य होता, तेवढा विस्तार प्रस्तुत प्रसंगीं करून वाढविलेला ' **श्रीगणेश गीतेचें श्रेष्ठत्व** ' हा निबंध क्रमशः प्रसिद्ध होऊन पूर्ण झाला आहे. सदरहू निबंधांत श्रीमद्गणेशगीतेच्या मुख्य प्रतिपाद्य विषयाचें स्वरूप, श्रोतृवक्तृगौरव, पुरातनत्व, प्रामाण्यादि विचार, वगैरे विषयीं साग्र विवेचन आलेलें असल्यानें, श्रीगणेशगीतेचें साकल्य स्वरूप दर्शविणाऱ्या एकाद्या पांक्त अशा टीकाग्रंथाची, तो एक प्रस्तावना होईल; असें म्हणावयास हरकत नाहीं. अस्तु ! [ मिति—श्रावण—वद्य अष्टमी मंगळवार शके १८४७ यो. श. ३४९. ]

श्रीमदंकुधारी-सद्गुरु-योगीन्द्र चरण किंकरः

—गा. **हेरम्बराज बालशर्मा** संपादक 'अंकुश'

## श्रीमद्गणेशगीता—स्तुति—पद १

जय जय गणनाथ—गीत—विग्रहाम्बिके । वेदशिरोगभधरे योगरूपिके ॥ध्रु.॥ श्रीगणेश पूर्ण ब्रह्म वर्णिती श्रुति । गूढ, परी बुद्धिरूढ हो न, वाग्गती — । कुंठित ती, म्हणुनि नैजनाथ सत्सती । धी प्रकटवि निजरूप त्वान्मिषें निकें ॥ १ ॥ गजमुख—मुखकमल—मधु—ब्रह्मभोग तो । पानगुंग हो वरेण्य भृंग रंगतो । ब्राह्मणस्पताख्य योग तोचि भोगतो । जो नर नृपराज सम त्वद्रसीं टिके ॥ २ ॥ कर्म—भक्त्युपास्तिमयी ज्ञानदायिनी । योगामृत पूर्णभोगदा रसायिनी । ब्रह्मभूय सिद्धि करी नैजपायिनी। **श्रीगीता** तूंचि एक सर्वनायिके॥ ३ ॥ शुभ्राम्बर—शुभांगी ब्रह्मशोधिनी । योग—भोग—मुक्चतुरा भुजचतुर्गुणी । त्रिविध शांति नेत्रमयी सर्व साक्षिणी । ब्रह्मदक्षिणाङ्कविभा, सत्प्रकाशिके ॥ ४ ॥ पंचविधा वृत्तिशोधिनीच तन्मयी । ब्रह्मार्पित—चित्तरसा लीनसन्मयी । योगशांतिदा च बुधां सत्य सत्यहि । तूंचि एक निज **बाला** योगदायिके ॥ ५ ॥ जय जय ॥ वेदशिरो० ॥

भजन—जय **गणेशगीते** निजसुखदे । गणपरमाणि मज योगशांति दे ॥ १ ॥

॥ **श्रीमद्गणेशार्पणमस्तु** ॥

( इति श्रीमद्गणेश गीता स्तुति संपूर्ण । भाद्र— व० ५ मंगळवार यो० श० ३४९ )

# गाणेश-ज्ञेय पुराणें दहा.

## श्लोक-शार्दूल विक्रीडित.

श्रीगाणेश्वर मौद्गलाभिध तसें ब्रह्मांड ही ब्राह्म तें ।
मारीचद्वय सौम्य अंकुश बरें ज्ञानाख्य आत्माख्य तें ॥
दोन्हीं भागवतें अशीं गणपति प्रीतीस देती दहा ।
पूर्ण ज्ञानद सत्य गाणपत हो हीं सत्पुराणें पहा ॥ १ ॥

## उपेन्द्रवजा.

महापुराणीं द्वय बोलियेलीं । कल्पांतरीं चारहि जाणिजेलीं ।
उपामर्घी चार तशीं पुराणें । विघ्नेशरूपा वदती पुराणें ॥ २ ॥

श्रीगणेशाचें स्वरूप पूर्णपणें स्पष्ट कळावें, गाणेश तत्त्वांचें ज्ञान व्हावें, आणि गाणेशोपासनामार्गाला अवश्य असलेली अवांतर साधनसंपत्ति यथापूर्ण मिळावी, या करितां गाणपत श्रेष्ठांनीं, गणेशोपासकांनीं, केवळ मोक्ष जिज्ञासा. पूर्ण अंतःकरणानें गणेशाची भक्ति करणाऱ्या गणेशभक्तांनीं, कोणत्या पुराण-ग्रंथाचें श्रवण-पठण-परिशीलनादि करावें, मुख्यत्वें करून कोणत्या पुराणांचा अवलंब करावा, अर्थात् कोणत्या पुराणांच्या द्वारें-केवळ त्यांच्याच परिपूर्ण ज्ञानानें-वरील प्रकारें गाणेशज्ञानाची सिद्धि मिळणारी आहे; अशा पुराणांचा उल्लेख वरील पहिल्या श्लोकांत आलेला आहे. श्रीगणेशपुराण, श्रीमुद्गल पुराण-ब्रह्मांड, ब्राह्म, बृहन्मारीच, लघुमारीच, सौम्यपुराण, अंकुशपुराण, ज्ञानभागवत आणि आत्मभागवत, अशीं तीं दहा पुराणें आहेत. आदिकल्प, महाकल्प, दिनकल्प, मनुकल्पादि काल व्यवस्था,प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष असलेलें उपनिषन्मूलकत्व, त्यामुळें येणारें प्रामाण्य तारतम्य, विषयगौरव व श्रोतृ-वक्तृ गौरव, इत्यादि इत्यादि कारणांना अनुसरून मूल पुराण-विद्या चार प्रकारांनीं प्रवृत्त झालेली आहे, आणि या प्रत्येक प्रकारांत अठरा अठरा पुराणांचें परिगणन केलेलें आहे. कल्पवृत्तबोधक कल्पपुराणें, मनुकल्प-बोधक मन्वंतर पुराणें अथवा महा पुराणें, कल्पपुराणांच्या उपत्वानें सांगितलेली उपपुराणें, आणि मनु-पुराणांच्या उपत्वानें सांगितलेलीं, तीं लघु पुराणें, असे हे चार प्रकार असून

एकंदर पुराणसंख्या बहात्तर झाली. यांच्या तारतम्य ज्ञानानें यथार्थ तत्त्वस्वरूप कळणारें आहे.

वरील दहा पुराणांपैकीं कांहीं कल्पपुराणांत आहेत, कांहीं कल्पोपपुराणांत आहेत, व कांहीं मन्वंतर पुराणांत परिगणित केलेलीं आहेत. लघु पुराणांत मात्र वरील पैकीं कोणतेंच नाहीं. सर्व प्रकारच्या कल्पांच्या आद्यंतकालांतील वृत्ताचें बोधन करणारें, साक्षात् उपनिषन्मूलक, व वैनायकसंज्ञक आदिकल्पांतच प्रकट झालेलें, 'श्रीमन्मौद्गल महापुराण'—मुख्यभूत असलेल्या सहा महाकल्पांपैकीं आद्य अशा गाणेश कल्पांत प्रवृत्त झालेलें 'श्रीमदादि गणेशपुराण'—तसेंच त्यांपैकींच मुख्य अशा 'सारस्वत' कल्पवृत्ताचें बोधन करणारें 'ज्ञानभागवत' अथवा 'गाणेश भागवत,' आणि तीस दिन कल्पांपैकीं मुख्य अशा एका सात्विक कल्पाचें वृत्त सांगणारें 'बृहन्मारीच' पुराण, अशीं चार पुराणें कल्प पुराणांत सांगितलीं आहेत. यांच्याच उपत्वानें वर्णिलेलीं म्हणजे त्यांच्या समीपवर्ति कल्पकालाचें बोधन करणारीं अशीं अनुक्रमें, मौद्गलाचें उपपुराण आत्मभागवत, गाणेशाचें अंकुशपुराण, ज्ञानभागवताचें सौम्यपुराण आणि मारीचाचें लघु मारीच, हीं चार पुराणें कल्पोपपुराणांत परिगणित केलेलीं आहेत, तीं उपदेशक्रमाला अनुसरून 'उप' शब्दालंकृत असली तरी, विषयगौरव व कालगौरवाच्या दृष्टीनें कल्पपुराणांशीं समानबल असल्याचेंच सांगितलें आहे. उरलेलीं दोन ब्राह्म व ब्रह्मांड हीं पुराणें महापुराणांत अथवा मन्वंतर पुराणांत कथिलीं असून, तीं तीस दिनकल्पांपैकीं कोण्या राजस कल्पांतील आद्यंतवृत्ताचें पण मन्वंतर प्राधान्यानें वर्णन करणारीं अशीं आहेत. वरील चारी प्रकारचीं पुराणें, पुनः विशिष्ट कालांतील वृत्तांचें बोधन करणारीं असून, तेवढ्या कालमर्यादेला अनुसरूनच त्यांची स्थिति व उत्पत्ति असते; अर्थात् त्यांत आलेले विषयसुद्धा त्या स्थितीला धरून असतात. या नियमान्वयें लघुपुराणें एकाद्याच मन्वंतराचें व तत्समीपवर्ति-कालांतील वृत्ताचें वर्णन करितात, व प्रत्येक मन्वंतरांत पुनः पुनः प्रकट होतात; यांची स्थिति एका मन्वंतरापुरतीच असते; तर महापुराणें वा मन्वंतर पुराणें एक किंवा अनेक मन्वंतरांतील वृत्तांचें कथन करून कोणत्या तरी एखाद्या मन्वंतरांत अथवा ब्रह्मदेवाच्या एका दिवसांतील म्हणजे दिनकल्पांतील चौदा मन्वंतरांपैकीं पहिल्या मन्वंतरांत प्रकट होत असतात; यांची

स्थिति सबंध दिनकल्पापर्यन्त असते. आणि कल्पपुराणें व कल्पोपपुराणें निरनिराळ्या प्रसंगांनीं निरनिराळ्या वेळीं प्रकट होत असलीं, आणि त्यांपैकीं कांहीं संपूर्ण एका अथवा अनेक दिनकल्पांचें वृत्त कथन करितात, कांहीं महाकल्पांतील साकल्य वृत्त सांगतात, आणि कांहीं आदि कल्पांतील कथांचें वर्णन करितात; अशा व्यवस्थेप्रमाणें त्यांतील विषयांची स्थिति असली, तरी तीं सर्व संबंध महाकल्पाच्या कालापर्यंत राहणारीं असून, आदि कल्पारंभीं वा आदिकल्पान्तर्गत महाकल्पारंभीं तीं प्रकट होत असतात; असा नियम आहे. अर्थात यांची उपस्थिति महापुराणापेक्षया दीर्घकालपर्यंत असते; यांतही पुनः तारतम्यभेद पुष्कळ आहेत, परंतु स्थलकालानुरूप ते पुनः केव्हां तरी सांगतां येतील. एवंच या उत्पत्ति व उपस्थितीला अनुसरून त्यांतील विषयांचें गौरव व त्यांचें प्रामाण्य बलाबल ठरलेलें असतें. हें उघड आहे. आतां वरील काल-क्रम व्यवस्थेला अनुसरून वेळो वेळीं प्रकट होणाऱ्या पुराणग्रंथांत क्वचित् प्रसंगीं श्लोकादिकांचा, श्रोत्या-वक्त्यांचा, अथवा क्वचित् कदाचित् कालभेदानुरूप कथाप्रसंगाचा, फेरबदल होत असला तरी मुख्य ज्या पुराणाचा जो विषय ठरलेला असतो, त्यांत मात्र फरक होत नाहीं; म्हणजे पुराणांत विषयभंग मात्र होत नाहीं; ही मुख्य नियति असून त्यांच्या सत्यासत्यतेची हीच कसोटी आहे. अस्तु !

तर या व्यवस्थेला अनुसरूनच अल्प कालपर्यंत राहणारी व विषयगौरव आणि प्रामाण्य यांच्या कसोटीनेंहि लघुत्वाला प्राप्त असलेली, जीं लघु पुराणें, त्यांत, प्रत्यक्ष ब्रह्मस्वरूप, केवळ औपनिषत्पुरुष, अशा स्वानंदेश गणेशाचे अथवा त्याच्या कार्यमूर्तिस्वरूप अशा श्रीगणेशाचें स्वरूप अथवा लीलावैभव,

---

१ निरनिराळ्या पुराणांमध्यें वेग वेगळ्या प्रकारांनीं, अठरा महापुराणें व अठरा उपपुराणें सांगितलेली असतात, त्यांचा परस्परांशीं मुळींच मेळ नसतो; यामुळें मोठा संशय उत्पन्न होतो ! पण तो व्यर्थ आहे. कारण त्या त्या पुराणांतील निर्दिष्ट अशा काल व्यवस्थेला अनुसरून, तिला पोषक अशीं वरील चारी प्रकारांपैकीं कोणती तरी निवडक पुराणें एकत्र करून सांगितलेलीं असतात; अर्थात् त्यांत फरक असणारच ! ज्या ठिकाणीं सबंध चारही प्रकारांचा म्हणजे बहात्तर पुराणांचा विचार करण्याचा प्रसंग असतो, तिथें मात्र यथार्थ निर्णय कळणें शक्य असतें; तशी व्यवस्था शास्त्रांत सांगितलेली आहेच.!

वर्णिलेलें नसल्यानें, आणि तें तसें असणें शक्य नाहीं म्हणून, श्रीगणेशाच्या दहा पुराणांपैकीं एकादेंही पुराण त्यांत—लघु पुराणांत-परिगणित केलें गेलें नाहीं. कारण श्रीगणेशाचे अथवा गुणेशाचे मुख्य वा कलांश अवतार, मुख्यत्वेंकरून आदिकल्प, महाकल्प अथवा मन्वंतर प्रचुर दिनकल्प, या कालांतच—आणि त्यांतही पुन्हां गाणेशवीर्यप्रकाशाला आवश्यक अशा अवांतर कालविभागांत—होत असतात; प्रतिमन्वंतर कालांत होत नसतात, अशी शास्त्रनियति आहे. श्रीगणेशाचीं एकंदर अवतारचरित्रें पाहिलीं असतां, हेंच तत्त्व लक्ष्यांत येतें. आतां लघु पुराणांतूनही कोठें कोठें जें श्रीगणेशाचें स्वरूप अथवा उपासनादि वैभव वर्णिलेले असतें, तें अर्थात्च श्रीगणेशाच्या अथवा गुणेशाच्या प्रत्यक्ष स्वरूपाचें प्रतिपादक नसून, गुणेशाचा एक अव्यक्त कलांश, जो विष्णु-शिव-शक्ति-सूर्य व ब्रह्मदेव यांच्या आत्मभूतत्वानें वर्णिला असून, त्यांच्या त्यांच्या सृष्टिविहार कार्याच्या प्रसंगीं निर्विघ्नत्वसिद्धीकरितां त्यांच्या पासूनच गजवक्त्रादि चिन्हांनीं व्यक्त रूप धारण करितो. अर्थात् त्यांचा अंश म्हटला जातो, असा जो पुष्टिविघ्नेश, व्योम तत्त्वाची अधिदेवता, लोकदेव महागणपती नांवानें प्रसिद्ध असलेला, त्याच्याच स्वरूपादिकांचें कथन (त्या त्या लघु पुराणांत) केलेलें असतें, असें समजावें. सारांश वरील दहा पुराणांत आलेलें, श्रीगणेशाच्या स्वरूपादिकांचें वर्णन, हेंच त्याच्या पूर्ण रूपादिकांचें वर्णन असून, इतरत्र पुराणग्रंथांत—मुख्यतः लघु पुराणांत वर्णिलेलें गणेशस्वरूप, लीला अथवा स्तोत्रादि उपासना प्रकार, वरील व्योमात्म्या लोक देवाचें, पुष्टिपति महागणपतीचें, ज्याची उपासना मतदेवत्वानें सांगितलेली नसून, केवळ लौकिक कर्मसिद्धिकरितांच ज्याच्या आराधनाची प्रवृत्ति आहे, अशाचे प्रतिपादक असून, त्याच्या प्रियत्वाकरितांच त्यांचा उपयोग आहे. प्रत्यक्ष गणेशाच्या वा गुणेशाच्या उपासनेशीं किंवा त्याच्या प्रियत्वाकरितां वगैरे कर्तव्यभूत अशा अनुष्ठानादिकांशीं त्यांचा संबंध मुळींच नाहीं! त्यांच्या अनुष्ठानानें गाणेशांच्या उपासनानिष्ठेची सिद्धि कदापि होणारी नाहीं. तसेंच त्या प्रकारांनीं गणेशाचे आराधन करणारे पुरुष, 'गणेशभक्त' या संज्ञेला व श्रीगणेशाच्या पूर्ण कृपेला पात्र होत नसून, तशा आराधनानें केवळ शिवादि देवांच्या आत्मभूतत्वानें असलेल्या, श्रीगणेशाच्या सर्वात्मरूपी किंचित् अंशाची तृप्ति, सर्वात्मसमष्टि अशा गुणेशाच्या द्वारें होत असल्यामुळें, अर्थात्

अशा परंपरेनें तें आराधन श्रीगणेशाच्या तृप्तीला कारण होत असल्यानें, ते पुरुष, त्या त्या पुराणदेवतांच्या भक्तांतच अंतर्भूत होतात; अशीच शास्त्र संप्रदायाची नियति आहे. तात्पर्य अशा कारणांकरितांच गणेशोपासकांनीं मुख्यतः वरील दहा पुराणांचेंच ज्ञान संपादन केलें पाहिजे, त्यांत सांगितलेल्या प्रकारांनीं व स्तोत्रादिकांनींच गणेशोपासनामार्गाची व्यवस्था अवलंबीली पाहिजे; एवंच त्याच्या सांगोपांग व सविस्तर परिशीलनानेंच गाणेशमार्गाची पूर्ण सिद्धि मिळणें शक्य आहे; अन्यथा नाना भ्रम व नाना शंकाचांच अधिक संभव असतो! हीच गोष्ट चांगली लक्षांत ठेविली पाहिजे, हें स्पष्ट आहे.

सांप्रत वरील प्रकारच्या विचारसरणीचा अवलंब कुठेंच केला जात नाहीं, किंबहुना तशा विचारपद्धतीचा गंधही असल्याचें कुठें दिसत नाहीं; यामुळें सर्वत्रच उपासनामार्गांत मोठा गोंधळ उडालेला दिसतो; योग्य काय, अयोग्य काय, विहित काय, निषिद्ध काय, इत्यादि विचार नाहीं व विचारसाधनांचा अवलंबही नाहीं; उलट निषिद्ध-वेदविरुद्ध अशा मार्गाचा झपाट्यानें स्वीकार केला जातो, इतकेंच नव्हे तर शास्त्रप्रमाण शुद्ध व सर्वथा शीघ्र सिद्धीला अनुकूल अशा मार्गाविषयीं नाना प्रकारच्या शंका-कुशंका, मिथ्या हेतुवादमूलक कुतर्क, उपस्थित केले जातात. साधारण सदसद्विवेचनशून्य अथवा परप्रत्ययनेय बुद्धीवर ते सहज रूढ होतात, आणि मग स्वधर्मच्युति आणि निषिद्धाचारांचा स्वीकार अशी अनर्थावह स्थिति साहजिकपणेंच प्रत्ययाला येते. असा प्रकार सर्व मार्गांतच झालेला आहे! त्यांतल्या त्यांत गाणेश मार्गांत असला आंधळा रोजगार फारच वाढलेला आहे. अशा स्थितींत गाणेशमार्गाच्या मुख्य सिद्धान्तग्रंथापैकीं पुराणविद्येची स्थिति कशी आहे, ही साधारण दिशा वर दर्शविली आहे; ती लक्षांत घेऊन, वरील प्रमाणांच्या साहाय्यानें प्रवृत्त झालेला गणेशोपासनामार्गच गाणेशमार्गजिज्ञासु समंजस भाविकांनीं अवश्य स्वीकारला पाहिजे. आणि तदितर दुसऱ्या कसल्या तरी–प्रमाणरहित अशा–मार्गाचा–मार्गाचा कसला, कोणत्या तरी मिषानें गणेशोपासनेच्या नांवाखालीं स्वीकारिलेल्या प्रकारांचा,–त्याग जरूर केला पाहिजे; तरच अपेक्षितसिद्धीचा मार्ग मोकळा होईल! आणि या हेतूनेंच प्रसंगोपात असें हें गाणेशमार्गाविषयींच्या प्रमाणशुद्धीचें संक्षेप विवेचन या ठिकाणीं केलें गेलें आहे! शेवटीं अशा शुद्ध मार्गाविरुद्ध

केवळ आपल्या भ्रामक कल्पनांच्या जोरावर, व आपल्या बुद्धीला तो मार्ग नवीन, अपूर्व, अथवा विचित्र वाटतो म्हणून, कसले तरी आक्षेप घेणाऱ्या आक्षेपकांनीं, आपण ज्या मार्गाविरुद्ध तसे आक्षेप घेत आहोंत, त्या मार्गाच्या प्रवृत्तीच्या मूळाशीं कोणतीं प्रमाणें आहेत, तीं आपणांस अवगत आहेत काय, आपण त्यांचा विचार केला आहे काय, सारांश अशा तऱ्हेचे आक्षेप घेण्याला आपली बुद्धि पात्र आहे काय, हा प्रश्न सोडवून मगच आक्षेप घेण्यास प्रवृत्त व्हावें; उदाहरणार्थ—प्रस्तुत संप्रदायशुद्ध अशा रूपानें क्वचित् कदाचित् प्रवृत्त होत असलेल्या गाणेशमार्गाविषयीं, वरील विवेचनांत दर्शविल्या प्रमाणें प्रमाणभूत असलेल्या त्या एकंदर पुराण ग्रंथांचें पठण—परिशीलनादि स्वतः करून अथवा जिज्ञासापूर्ण बुद्धीनें त्यांचें ज्ञान यथायोग्य संपादन करून, नंतर आपल्या आक्षेपांना, अशा आक्षेपकांनीं, पूर्णपणें अवसर द्यावा. तसेंच असल्या आक्षेपकांच्या आक्षेपांना सहसा बळी पडणाऱ्या अथवा त्यांनीं गांगरून जाणाऱ्या जिज्ञासु भाविकांनीं, प्रथम आपली विचारशक्ति जागृत ठेवून, अशा आक्षेपकांचें आक्षेपित विषयांसंबंधींचें ज्ञान कितपत आहे, त्यांनीं त्याच्या प्रमाणादिकांचा विचार कितपत केलेला आहे, आणि त्यांच्या आक्षेपांच्या मूळाशीं, सत्तत्वजिज्ञासा-सन्मार्ग स्वीकाराची कळकळ—प्रामाणिक बुद्धि-प्रांजलपणा कितपत आहे, किंवा वृथाहंता, आत्मप्रौढि इत्यादिमूलक उपेक्षा बुद्धि अथवा तिरस्कार बुद्धि आहे काय ? इत्यादि गोष्टींचा विचार करून, नंतरच त्यांच्या त्या आक्षेपांचा परिणाम आपल्या मनोबुध्यादिकांवर होऊं द्यावा ! अशा प्रकारचा इषारा आक्षेपकांना व त्यांच्या आक्षेपांना बळी पडणाऱ्या सर्वांनाच देऊन ठेवणें अत्यंत इष्ट असून त्याकडे प्रथम लक्ष देणें त्या उभयतांच्या हिताचें आहे. इत्यलम् ॥

॥ श्रीपुराणपुरुषाय स्वानन्देशाय नमोऽस्तु ॥

ग्रंथालय १८५५६

REFBK-0017756

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थळप्रत.
अनुक्रमांक ७१९५८ वि: ९.५.४
वर्गीक ९८० नों: दि: ९।६।६७०